UNIVERSAL
LIBRARY
OU_192061
UNIVERSAL
LIBRARY

# गांधीजींच्या सहवासांत एक आठवडा

★

लुई फिशर

★

अनुवादक
प्रो० सत्यबोध हुद्लीकर

पॉप्युलर बुक डेपो, लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

FIRST MARATHI EDITION, April 1945
with permission of Messrs. George
Allen and Unwin Ltd., London.

Printed by M. N. KULKARNI at the Karnatak Printing Press, Chira Bazar, Bombay 2, and Published by G. R. BHATKAL, for the Popular Book Depot, Lamington Road, Bombay 7.

# ग्रंथकर्त्याचे चार शब्द

हें पुस्तक प्रकाशित होत आहे यांत माझा कांहींएक अपराध नाहीं. गांधी-जींच्या सहवासांत एक आठवडा घालवीत असतां मी माझी दैनंदिनी अत्यंत काळजीपूर्वक ठेवीत गेलों. या दैनंदिनींतलीं माझीं टांचणें हरवूं नयेत किंवा नष्ट होऊं नयेत म्हणून अमेरिकेस पोहोंचल्यावर तीं सारीं ( टांचणें ) मी पुनः लिहून काढलीं. माझ्या कित्येक मित्रांनीं माझें हस्तलिखित पाहिलें आणि तें सारेंच्या सारें प्रसिद्ध करण्यासाठीं ते मला आर्जवूं लागले. माझ्या हिंदुस्थानच्या प्रवासाचा हा अत्यंत त्रोटक वृत्तांत होईल अशी मी त्यांच्याशीं हुजत घालीत होतों.

हिंदुस्थानांत माझ्या आणखी कितीतरी गांठीभेटी व मुलाखती झाल्या. त्या साऱ्या अत्यंत महत्त्वाच्या असूनसुद्धां त्यांची टांचणें यांत समाविष्ट केलेलीं नव्हतीं. फक्त गांधीजींसंबंधीच एखादें पुस्तक लिहिलें तर तें हिंदुस्थानसंबंधी विस्तृत माहिती देणारें पुस्तक होणार नाहीं असा माझा आग्रह होता. " अहो तें ठीक आहे हो! " माझ्या मित्रांचें म्हणणें. " मग तुम्हीं तसें आपल्या प्रस्तावनेंत लिहा म्हणजे झालें. " आणि तेंच मी आतां इथें करीत आहें.

गांधीजींच्याबरोबर झालेलीं माझीं संभाषणें म्हणजे अत्यंत समृद्ध व उत्साह-वर्धक अनुभवच होते. लॉर्ड लिनलिथगो–हिंदुस्थानचे व्हाइसरॉय मला नव्या दिल्लींत म्हणाले, " गांधी म्हणजे आज हिंदुस्थानचें बडें प्रस्थ आहे ! " हें अगदीं खरें आहे.

गांधी म्हणजे एक अपूर्व सृष्टिचमत्कारच आहे. त्यांचें व्यक्तिमत्व व मन यांच्याशीं संबंध आल्यानें मनुष्य अगदीं खळबळून जातो. त्यांच्याशीं माझें जें जें भाषण होई त्या सर्वांचें मी जवळ जवळ लघुलिपींत टांचणच करीत असें. आणि तीं टांचणें मी पुढील पानांत पुनः मांडीत आहे. गांधीजीविषयींच्या माझ्या टीपा अखेरच्या छोट्या प्रकरणांत पहायला मिळतील.

लुई फिशर

# गांधी ही व्यक्ति नसून चमत्कृति आहे !

सुप्रसिद्ध अमेरिकन पत्रपंडित लुई फिशर यांनीं लिहिलेलें 'गांधीजींबरोबर एक आठवडा' हें शंभर पानीं इंग्रजी पुस्तक ज्या क्षणीं माझ्या हातीं पडलें त्या क्षणींच तें वाचावयाला सुरुवात करून एका बैठकींत मी संपविलें. मला तें अतिशयच आवडलें. मी तें एकदांच वाचलें नसून पुन्हां मी त्याचीं दोन-चार पारायणेंही केलीं. तें पुस्तक वाचण्याचा मी माझ्या पुष्कळशा मित्रांना आग्रह केला आणि त्यांनाही पण तें पुस्तक फारच आवडलें. त्यापैकीं प्रा. स. बा. हुदलीकर यांना तें इतकें आवडलें कीं त्यांनीं त्या पुस्तकाचें तात्काळ मराठी रूपांतर करावयाचें ठरविलें आणि दोन चार दिवसाच्या आंतच आपला निश्चय पूर्ण केल्याचा पुरावा त्यांनीं माझ्यापुढें आणून ठेवला. आज मुद्रितस्वरूपांत तें हस्तलिखित मराठी वाचकांच्या हातीं देतांना मला त्याबद्दल दोन शब्द सांगण्याची त्यांनीं विनंति केली म्हणूनच मी वाचकांचा हा थोडासा वेळ घेत आहें.

मी स्वतः गांधीपूजक आहें. एक अगदीं आंधळा गांधीपूजक आहें म्हणानात ! मानवजातीच्या आरंभापासून ख्रिस्त, बुद्ध आणि गांधी यांच्याएवढ्या महान् विभूति या जगांत होऊनच गेल्या नाहींत असें माझें प्रांजळ मत आहे. आणि म्हणून ज्या कालखंडांत गांधी जगत आहेत, बोलत आहेत, चालत आहेत, लिहीत आहेत, लढत आहेत आणि आपलें अमर कर्तृत्व करून दाखवीत आहेत त्या कालखंडांत गांधींना बघण्याचा, ऐकण्याचा, वाचण्याचा, त्यांच्या नांवाचा जयजयकार करण्याचा आणि अतिशय लांबून का होईना, पण त्यांच्यामागून चालण्याचा आपल्याला 'चान्स' मिळतो आहे या जाणीवेनें माझें मन नेहमींच हर्षबधिर होत असतें ! भावी पिढ्यांनीं अनंतकाळपर्यंत आमचा हेवा करीत रहावें असें आमचें हें महान् भाग्य आहे. म्हणून गांधींचें महत्त्व आणि कर्तृत्व डोळे असून ज्यांना दिसत नाहीं, गांधींची अमर वाणी ज्यांना कान असूनही ऐकूं येत नाहीं, गांधींच्या राष्ट्रव्यापक आरोळींत तोंड असूनही ज्यांना आपला आवाज मिळवतां येत नाहीं, गांधींनीं चालविलेल्या स्वातंत्र्याच्या झगड्यांत ज्यांना आपल्या मनगटांतलें बळ झिजवितां येत नाहीं, उलट गांधींच्या नांवानें शंख करण्यासाठींच जे आपल्या मनगटाचा उपयोग करतात त्यांच्यासारखे दरिद्री, पंगू आणि करंटे तेच होत असें माझें मत आहे. गांधींच्या विचारांत, आचारांत

आणि प्रचारांत दोष आहेत कीं नाहींत हा प्रश्न आज तरी गैरलागू आहे. या गोष्टी उद्यां काळानेंच ठरवावयाच्या आहेत. कवितेची आणि जीवनाची शेवटची ओळ लिहिली गेल्यावांचून त्यावर जातिवंत टीकाकार आपलें मत देत नसतात. तुकारामाची वाणी अभंग आहे कीं नाहीं याविषयीं त्यावेळच्या मंबाजी, तुंबाजी आणि सालोमालोंना संशय असला तरी तो आज तुम्हांआम्हांला नाहीं, म्हणून गांधींच्या नांवानें आजच्या जगांतील गोऱ्या किंवा काळ्या तुंबाजी-मंबाजींनीं आपल्या दोन्ही हातांनीं कितीहि ठणाणा केला तरी त्याची बाधा जशी गांधींच्या आजच्या चारित्र्याला किंवा कार्याला होणार नाहीं तशी ती जगाच्या उद्यांच्या निर्णयालाहि होऊं शकणार नाहीं!

गांधींच्या माहात्म्याबद्दल आणि कार्याबद्दल निर्णायक मत आज देतां येणें अत्यंत कठिण आहे याचें कारण आजच्या जगापुढचें गांधी हें एक महान् उद्गार-चिन्ह आहे. गांधी हें जगाला पडलेलें एक मोठें कोडें आहे. म्हणूनच बर्नार्ड शॉ म्हणतो कीं गांधी ही व्यक्ति नसून चमत्कृति आहे! गांधी हे जितके सोपे आणि साधे दिसतात तितके ते नाहींत. लक्षावधि अशिक्षितांना ते ताबडतोब कळतात, पण मूठभर विद्वानांच्या टाळक्यांत ते शिरतां शिरत नाहींत. कित्येक वेळां गांधी हे जसें दुसऱ्यांना कळत नाहींत तसें कधीं कधीं आपण काय आहोंत हें त्यांचें त्यांनाही कळत नाहीं. हें मी चेष्टेनें म्हणत नाहीं, अगदीं आदरानें सांगतों. याचें कारण गांधी हे स्वतःच्या जीविताशीं एकसारखे सतत प्रयोग करीत आहेत. ते सत्याचें संशोधन करीत आहेत. चोरून करीत नाहींत, अगदीं चवाठ्यावर बसून सर्वांसमोर करीत आहेत. नवीन नवीन कल्पना, नवीन नवीन सिद्धांत, नवीन नवीन शस्त्रें ते शोधून काढीत आहेत. या दृष्टीनें ते ख्रिस्त आणि बुद्ध यांच्यापेक्षां निराळे आहेत. आत्मचिंतनांत मग्न किंवा संतुष्ट झालेले ते नुसतेच साधू नसून मानवजातीच्या शाश्वत शांतीसाठीं, सुखासाठीं आणि स्वातंत्र्यासाठीं सत्याचे प्रयोग करणारे ते एक महान् संशोधक आहेत. संशोधक चुकला रे चुकला ही आरडाओरड मूर्खपणाची आणि अडाणीपणाची आहे. पुष्कळवेळां जो चुकतो तोच शेवटीं बरोबर येतो! ज्यांना दम आहे, ज्यांना धीर आहे, त्यांनाच कळेल, गांधी बरोबर आहेत का चुकले!

बहुतेक सर्व गोरे लोक हे काळ्या लोकांच्या स्वातंत्र्याचे दुष्मन् आहेत! शिवरामपंत परांजपे म्हणतात तेंच खरें आहे. चांगला साहेब असणें शक्यच नाहीं!

केवळ हिंदुस्थान स्वतंत्र असावा असें गांधी म्हणत नाहींत; तर सार जग, सारी मानवता स्वतंत्र असावी असा त्यांचा आक्रोश आहे! पण असा उघड आक्रोश जगांतील साऱ्या मानवजातीबद्दल करणारे गोरे साहेब किती आहेत! स्टॅलीन-साहेबांनीं देखील आमच्या भ्रमाचा भोपळा फोडून टाकला आहे, मग इतर साहेबां-बद्दल काय बोलावें? तथापि प्रत्येक गोष्टीला अपवाद असतो. हिंदुस्थान देशाचा आणि त्या देशांतील जनतेचा मनापासून द्वेष करणाऱ्या चर्चिल, ॲमेरी, कॅथेरिन मेयो, बीव्हर्ले निकल्स या साहेबी मनोवृत्तीला रोमँ रोलँप्रमाणेंच लुई फिशर एक तेजस्वी अपवाद आहेत! ते हिंदी स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असून गांधींच्या माहात्म्याचे एक डोळस भक्त आहेत! हिंदुस्थानांत येऊन एक आठवडाभर ते गांधींच्या सहवासांत राहिले. आणि त्यांचें भाग्यही पण असें थोर कीं गांधींच्या माहात्म्याचें जें देदीप्यमान तेज ८ ऑगष्ट १९४२ ला साऱ्या जगाला पहाव-याला मिळालें, त्याच्या बरोबर दोन महिने आधीं, म्हणजे त्या विश्वदीपक तेजाच्या अरुणोदयकालींच त्यांना गांधींच्या अगदीं निकट सान्निध्यांत रहाव-याला मिळालें. गांधींचें माहात्म्य आणि सामर्थ्य काय आहे हें म्हणूनच त्यांना अचूक ओळखतां आलें. गांधी काय आहेत आणि कोण आहेत या वायफळ वादांत न शिरतां सरळ त्यांनीं गांधींच्या नाडीवरच बोट ठेवलेलें आहे. ते म्हणतात " "हिंदुस्थान स्वतंत्र करणें हेंच एक गांधींचें जीवितकार्य आहे!" कोट्यवधि हिंदी जनतेच्या मनावर आज गांधींचें एवढें वर्चस्व का आहे याचें कारण ते पंचा नेसतात, शेळीचें दूध पितात, दारिद्र्यांत रहातात, उपास करतात किंवा प्रार्थना करतात हें नसून परकी सत्ता या देशांतून उलथून टाकून जनता स्वतंत्र कशी करतां येईल या एकाच गोष्टीला त्यांनीं आपलें तन आणि मन वाहिलेलें आहे. म्हणूनच आज हिं दुसनामध्यें सर्वांत मोठी गोष्ट काय आहे तर गांधी, असें खुद्द लॉर्ड लिनलिथगोलाहि मान्य करावें लागलें.

'आठ आगष्ट'च्या' क्रांतिकारक माहात्म्याचें खाजगी दर्शन जगाला करून देणाऱ्या लुई फिशरच्या या तेजस्वी पुस्तिकेचें मराठींत मार्मिक रूपांतर करून प्रा. स. बा. हुदलीकर यांनीं मराठी वाङ्मयांत फारच मोलाची भर घातलेली आहे यात शंका नाहीं.

प्रल्हाद केशव अत्रे

## जून ३, १९४२

नव्या दिल्लीहून निघणाऱ्या द्रुतगति आगगाडीच्या डब्यांत, धूळ आणि उष्णता यांचा असह्य त्रास सहन करीत सत्तावीस तास घालविल्यानंतर, मी मध्य-हिंदुस्थानांतील वर्धा नांवाच्या गांवीं येऊन पोहोंचलों. त्या वेळीं रात्रीचे साडेआठ वाजले होते. त्याच्या अगोदर दहा दिवस माझी गांधीजींशीं मुलाखत ठरविण्याबद्दल मी जवाहिरलाल नेहरू यांना लिहिलें होतें. गांधीजी माझी भेट घेतील अशा अर्थाचें पत्र वर्ध्याहून नेहरूकडून मला थोड्या दिवसांनीं आलें. त्यांनीं गांधीजींचे सेक्रेटरी महादेव देसाई यांच्याशीं पत्र-व्यवहार करून वेळ ठरविण्याविषयीं मला सूचना दिलेली होती. कोणतीही वेळ ठरविली तरी ती मला सोईस्कर होईल अशा अर्थाचें पत्र मी देसायांना पाठविलें, आणि त्यांच्याकडून मला तारेनें उत्तर आलें "स्वागतम्—महादेव देसाई."

मी वर्धा स्टेशनवर गाडींतून उतरलों तेव्हां एक शुभ्र वस्त्रें परिधान केलेला तरुण माणूस माझ्याकडे येऊन विचारूं लागला. "आपणच कां फिशर?" मी होय म्हणून उत्तर दिल्याबरोबर तो सांगूं लागला : "गांधीजींनीं मला आपल्याला भेटण्याकरितां पाठविलें आहे." बाहेर टांगा उभा होता. टांगा म्हणजे एक घोड्याची दोन चाकी गाडी. त्यामध्यें बसणाऱ्या माणसाला गाडी हांकणाऱ्याकडे—म्हणजे घोड्याच्या पाठीकडे पाठ करून बसावें लागतें. आम्हीं काळोखांतून गाडींतून गांवाच्या बाहेरच्या भागांत आलों व एका कोट्याधीश राष्ट्रभक्ताच्या घरासमोर आम्ही टांग्यातून उतरलों. त्या गृहस्थानें हें घर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठीं कॉंग्रेस पार्टीला दान केलेलें होतें. मी पोर्चवरील उघड्या गच्चींत निजलों होतों. माझ्या उशाशीं कॉंग्रेसचा तिरंगी झेंडा रात्रभर फडफडत होता. त्याचा तो एकसारखा फडफडणारा आवाज ऐकून तो "कट्ट कड, कड कट्ट" असा कोणाला तरी सांकेतिक संदेशच पाठवीत आहे कीं काय असें मला वाटलें.

## जून ४, १९४२

मी सकाळीं लवकरच उठलों आणि गांधीजींच्या दंतवैद्याबरोबर टांगा करून सेवाग्रामकडे निघालों. सेवाग्राम म्हणजे गांधीजी तुरुंगांत नसले म्हणजे त्यांचें

निवासस्थान होय. इंग्लंड फार समजूतदार धनी आहे असें तो दंतवैद्य मला सांगूं लागला. पण त्यांनीं गांधीजींच्या विषयीं बोलावें अशी मी खटपट चालविली. तरी तो हट्टानें राजकारणावरच बोलूं लागला.

टांगा थांबला. मी खालीं उडी मारली तों माझ्यासमोर एक सफेत वस्त्रें परिधान केलेली गव्हाच्या रंगाची आकृति उभी राहिली. तेच गांधीजी होत. मी झपाझप टांगा टाकीत त्यांच्याकडे चालत गेलों. त्यांनीं आपले दोन्ही हात दोघा स्त्रियांच्या खांद्यावर आधारले होते. त्या दोघीही स्त्रिया त्यांच्या दोहोंबाजूनें चालल्या होत्या. त्यांचे बारीक पिंगट पाय धोतरापर्यंत उघडे होते. त्यांच्या पायांत चामड्याच्या चपला होत्या; अंगावर खादीचें हातविणीचें धोतर होतें. त्यांच्या डोक्यावर घडी केलेला पांढरा हातरुमाल होता. "मिस्टर फिशर" अगदीं अस्सल इंग्रजी पद्धतीच्या उच्चारांत गांधीजी उद्गारले. आम्हीं हस्तांदोलन केलें. त्यानीं दंतवैद्यालाही अभिवादन केलें व मागें फिरून आम्हीं लोखंडी सांखळदंडानीं टांगलेल्या लांकडी झोपाळ्याकडे आलों. गांधीजी त्यावर बसले, आणि फळीकडे बोट करून ते म्हणाले, " बसाना इथं ! "

" जवाहरलालनीं मला आपल्या पुस्तकाविषयीं सांगितलं आहे, आणि आपण कशा-प्रकारची व्यक्ती आहांत याविषयींही त्यांनीं मला माहिती करून दिली आहे. आपण इथं आल्यानं मला आनंद झाला आहे. आपण इथं किती दिवस रहाणार आहांत ? "

" मला इथं कांहीं दिवस रहायचं आहे " असें मी त्यांना सांगितलें.

" अरे वा ! मग आपल्याला खूप खूप बोलतां येईल, " ते उद्गारले.

एक तरुण गृहस्थ त्यांना भेटण्यासाठीं आले व वांकून त्यांच्या पायांना वंदन करून त्यांच्याभोंवती प्रदक्षिणा घालूं लागले. " बस्स बस्स," गांधीजी म्हणाले. पुरे, पुरे, असा त्याचा अर्थ असावा असें मला वाटलें. माझा तर्क बरोबर होता असें नंतर मला आढळून आलें. नंतर आणखी दोघा इसमांनीं तसेंच केलें. गांधीजींनीं त्यांनांही तसेंच बस्स करण्यास सांगितलें.

रहाण्यासाठीं हें खेडें कां पसंत केलें? असा मी त्यांनां प्रश्न केला. त्या—अमक्या—अमक्यानीं......ते म्हणाले. त्यांनीं मला एक नांव पण सांगितलें. तें नांव काय होतें हें मला बरोबर समजलें नाहीं. त्या व्यक्तीच्यासाठीं हें गांव पसंत केल्याचें गांधीजी सांगूं लागले. मी त्यावर कांहीं बोललों नाहीं. पण तें हिंदी नांव मला समजलें नसेल असा त्यांनीं तर्क केला. म्हणून त्यांनीं

खुलासा केला. मिराबेन म्हणजे पूर्वाश्रमींच्या मिस् स्लेड होत! या इंग्रज बाईचा व आपला फार पुरातन संबंध होता असें ते म्हणाले. कोठें तरी मध्य हिंदुस्थानांतल्या एखाद्या खेड्यांत मी रहावें असा त्यांचा विचार होता. असेंही त्यांनीं मला समजावून सांगितलें. त्यांनाच जागा शोधून काढण्यासाठीं गांधीजींनीं सांगितलें असल्याचें मला कळलें. खुद्द गांवाच्या वस्तींत रहाणें गांधीजींना पसंत नव्हतें कारण गांवांत रोगराई व गडबड फार. "गांवांच्या बाहेर इथं कसं छान आहे." दंतवैद्य कृत्रिम दांता विषयीं बोलूं लागला. या दांताच्या कवळ्यांनीं बरोबर चावतां येत नाहीं असें गांधीजी त्यांना समजावून सांगूं लागले. एका बाईनें तीन अलग अलग दांताच्या कवळ्या असलेलें एक पितळेचें भांडें आणलें. तेव्हां मी जाण्यासाठीं निघालों. गांधीजी म्हणाले, "रोज सकाळ संध्याकाळ माझ्याबरोबर फिरण्यासाठीं येत जा, म्हणजे आपल्याला आणखी खूप बोलायला अवसर मिळेल." त्यांना नमस्कार करून मी निघालों.

सेवाग्राममधील पाहुण्यांच्या निवासस्थानांत (पाहुणघरांत) माझी उतरण्याची सोय करण्यांत आली होती. हें एक लहानसें एकच खोली असलेलें मातीचें झोंपडें आहे. वरील छप्पर बांबूंचें असून जमीन मातीनें सारविलेली होती. या खोलींत किती तरी खाटा टाकलेल्या होत्या. या घरांतून बाहेर पडलें म्हणजे पलीकडे छोटेंसें स्वयंपाक घर लागतें. त्याचप्रमाणें खालीं फरशी असलेली एक आंघोळीची खोली लागते. या ठिकाणीं किती तरी लोखंडी व पितळी बादल्या असून धुण्यासाठीं दोन मोठ्या लोखंडी बादल्या होत्या. "बाई,"—एक वृद्ध मोलकरीण—खेड्यांतील विहिरीचें पाणी घागरी भरून डोक्यावरून आणी व या बादल्या भरून ठेवी. खुर्शेदबेन (बेन–भगिनी) माझ्यावर देखरेख ठेवून माझी सारी बरदास्त ठेवतील असें मला गांधीजीनीं सांगितलें होतें. कुमारी खुर्शेदबेन नवरोजी या अजमासें चाळीस वर्षांच्या पार्शी बाई आहेत. घरींच तयार केलेली हातविणीची केशरी रंगाची खादीची साडी त्या नेसल्या होत्या. त्यांनीं फ्रान्स व इटाली देशांत संगीत शास्त्राचा सहा वर्षें अभ्यास केला होता. पण पंधरा वर्षांपूर्वी त्यांनीं या आपल्या संगीतशास्त्राचा अभ्यास सोडून दिला असून तेव्हां पासून त्यानीं गांधीजींचें शिष्यत्व पत्करलें होतें. त्या बाई लक्षाधीशांच्या घराण्यांतल्या आहेत. त्यांचे आजोबा गेल्या महायुद्धाच्या सुमारास वारले तेव्हां

त्यांचें वय पंचाण्णव वर्षांचें होतें. ते ब्रिटिश पार्लमेंटचे पहिले हिंदी सभासद होते. सकलातवाला–आणखी एक पार्शी-कम्युनिस्ट–हे तिसरे व अखेरचे ब्रिटिश पार्लमेंटचे हिंदी सभासद होत.

खुर्शेदबेन फार बुद्धिवान असून खूप चलाख आहेत. हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्व वादावर फाजील भर दिला जातो असा मीं त्यांच्याशीं वाद केला. स्वतंत्र हिंदुस्थान फॅसिस्ट बनेल अशी मला भीति वाटते असेंही मी त्यांना समजावून सांगितलें. आणि दुर्दैवानें तसें झालें तर ब्रिटिश अमलाखालीं आहे त्यापेक्षांही कमी स्वातंत्र्य हिंदुस्थानला लाभेल असें माझें म्हणणें आहे, असें मी त्यांना बजावलें. हा माझा तर्क त्यांना अगदीं कुचकामाचा वाटला. आधीं ब्रिटिशांची हिंदुस्थानांतून हकालपट्टी करायची नि मग आम्हीं हिंदी लोकच आमचे सारे प्रश्न सोडवूं शकूं. "आम्हांला आतां मोकळीक हवी आहे." असें खुर्शेदबेन सांगूं लागल्या. "एखादी घरमालकीण असावी नि तिच्या घरीं खूप दिवस राहणाऱ्या पाहुण्यांचा सुळसुळाट झालेला असावा. ही पिडा केव्हां एकदां निघून जाईल असं तिला वाटूं लागतं. आणि हे आगांतुक पाहुणे ज्याक्षणीं पुढीलदारानें निघून जातील त्या क्षणापेक्षां इतर कोणत्या क्षणाची वाट पहात असेल बरं ती बिचारी !"

गांधी आश्रमांतील कित्येक आश्रमवासीयांची व माझी ओळख करून देण्यासाठीं खुर्शेदबेन मला घेऊन गेल्या. ते सारेजण गांधीजींचे कार्यवाह असून कॉंग्रेसचे प्रचारकार्य करणारे गृहस्थ आहेत, किंवा गांधीजींच्या पायाशीं बसून त्यांचा सहवास घडावा म्हणून कांहीं दिवसांसाठीं ते येथें येऊन राहिलेले पाहुणे आहेत. हे आश्रमवासी स्त्रीपुरुष साऱ्या हिंदुस्थानांतून आलेले आहेत. ते कधीं कधीं हिंदुस्थानांतील अगदीं भिन्नभिन्न भाषा बोलतात. म्हणून त्यांचा परस्पर वादविवाद किंवा बोलणें चालणें हें इंग्रजीमधूनच चालत असतें. येथील मुलें फारच देखणी आहेत. मी महादेव देसायांच्या झोंपडीपाशीं थांबलों. त्यांच्या डोक्यावर टक्कल पडलेलें असून पोट अंमळ सुटलेलें आहे. त्यांनीं फक्त एक धोतरच परिधान केलेलें होतें. ते खालीं जमिनीवर अंथरलेल्या चटईवर बसून ओबडधोबड चरख्यावर सूत कातीत होते. त्यांची बायको पलीकडे खोलींत होती. त्यांच्या साडीलाही खूप चुणी पडलेल्या असून त्याही आंत सूत कांतीत होत्या. देसाई रोज पांचशें यार्ड सूत कांततात. चरखा हें एक अगदीं साधें यंत्र आहे. तें दरेक शेतकऱ्याला बनवितां किंवा स्वस्तांत खरीदतां येणें शक्य

आहे. आपण दूरदूरचे प्रवास करीत असतों व प्रवासांत सुद्धां सूत कांतीत असतों असें देसायांनीं मला सांगितलें. पण आणखी कोणीही असें सूत काढलेलें आपण कधीं पाहिलें नाहीं असें ते म्हणाले. गांधीजींचें प्रचारकार्य व खुद्द गांधीजींचेंच उदाहरण पाहून हजारों–लाखों–हिंदी खेडुतांनीं चरखा चालवून सूत कांतण्याची विद्या पैदा केली होती व त्यायोगें खेड्यांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळून वस्त्रहीन, नागड्या, उघड्या लाखों खेडुतांना कापड मिळण्याची सोय झाली आहे. याबद्दल गांधीजींनाच धन्यवाद दिले पाहिजेत. "पण ही गोष्ट लोकांच्या फारशी अंगवळणीं पडलेली नाहीं अद्यापी," ही गोष्ट देसायांनीं कबूल केली. सूत कांतणें ही बाब अद्यापी हिंदी-राष्ट्रीय-आर्थिक जीवनाची घटक बनलेली नाहीं!

सकाळचे अकरा वाजतां मला चांगली चरचरून भूक लागल्यावर खुर्शेदबेन मला गांधीगृहांत घेऊन आल्या. हें घर पाहुण्यांच्या वसतिगृहापासून अजमासें शंभर यार्डांवर आहे. ही एकमजली झोंपडी असून तिच्या भिंती कुडाच्या आहेत व छप्पर तांबड्या कौलांचें आहे. माझ्या चपला मी दाराबाहेरच सीमेंटच्या पायऱ्या लगत सोडल्या. छोट्या खोलींत प्रवेश करून मी पलीकडच्या मुख्य खोलीकडे पहात तसाच उभा राहिलों. गांधीजी एक पांढरी चादर अंथरून खालीं जमिनीवरच पडले होते. त्यांचे एक शिष्य जमिनीवर त्यांच्या अंथरुणावर बसून छपराला टांगलेला पंखा खेंचीत होते. हा काळ्या कापडाचा केलेला पंखा विजेच्या पंख्याचें काम देत होता. या खेड्यांत वीज आलेली नाहीं. गांधीजी उठून मला म्हणाले, "आतां तुम्हीं पायांत बूट नि डोक्यावर टोपी घाला. या दोनही गोष्टी इथं अगदीं अपरिहार्य आहेत. नाहींतर तुम्हाला उन्हाची झळ लागेल." एक बाई त्यांच्यासाठीं खादी वस्त्राची ओली घडी घेऊन आली. ती घडी त्यांच्या डोक्यावर ठेवण्यासाठीं होती. नंतर अंमळ पुढें चालणाऱ्या खुर्शेदबेनच्या खांद्यावर हात टेकवून गांधीजी मला प्रेमळपणानें म्हणाले: "हं. चला आतां." दोन झोंपड्या ओलांडून आम्हीं सार्वजनिक भोजनगृहापाशीं आलों. हीसुद्धां कुडाच्या भिंती असलेली एक झोंपडी आहे. गांधीजींच्या प्रमाणेंच मी माझ्याही चपला बाहेर सोडल्या नि माझी टोपी खुर्शेदबेनच्या स्वाधीन केली. त्यांनीं ती भिंतीवरील एका खुंटीवर टांगून ठेविली. गांधीजींनीं दाखविलेल्या एका पाटावर मी बसलों. माझा पाट त्यांच्या पाटापासून तिसरा होता. त्यांच्या शेजारच्या पाटावर नरेंद्रदेव नांवाचे एक दमेकरी बसले होते.

कॉंग्रेसशीं संलग्न असलेल्या हिंदी सोशालिस्ट पक्षाचे ते प्रमुख होते. एक फूट औरसचौरस असलेल्या चटईच्या आसनावर मी बसलों. गांधीजी एका उशीवर बसले. त्यांच्या डाव्या हाताला त्यांच्या दंतविहीन पत्नी कस्तुरबा बसल्या होत्या. त्यांचें वय सत्तर एक वर्षांचें आहे. गांधीजींचें वय त्र्याहत्तर वर्षांचें आहे.*

या भोजनगृहाला दोन लांब भिंती असून त्यांना जोडून एक तिसरी भिंत आहे. ज्या ठिकाणीं आपण प्रवेश करतों ती जागा सताड उघडी आहे, कारण त्या ठिकाणीं भिंत वगैरे कांहीं नाहीं. प्रवेशद्वाराजवळ एक मेज असून त्यावर ताटें, वाट्या व पाणी पिण्याचीं भांडीं ठेविलेलीं होतीं. त्याचप्रमाणें अन्न भरलेल्या पराती व थाळ्या पण तेथें होत्या. स्त्रिया एका बाजूस अलग बसतात. मी कांहीं सुंदर डोळ्यांच्या व तरतरीत चेहऱ्यांच्या मुलांकडे अगदीं कौतुकानें पहात होतों. कांहींचीं वयें तीन वर्षांचीं असावींत, तर कांहींची पांच किंवा आठ वर्षांचीं असावींत. हीं सारीं आश्रमवासीयांचीं मुलें होत. लवकरच प्रत्येक इसमापुढें एकेक पितळेची थाळी ठेवण्यांत आली. किती तरी वाढपी पायांचा बिलकूल आवाज न करितां थाळींतून जेवण वाढीत होते. गांधीजींच्या समोर किती तरी भांडीं व वाट्या ठेवण्यांत आल्या होत्या. त्यांनीं स्वत: शेजाऱ्यांना वाढण्यास सुरवात केली. मला एक पाण्यानें भरलेलें धातूचें फुलपात्र देण्यांत आलें होतें. गांधीजींनीं मला एक कटोरा दिला. त्यांत सार होतें. पाले भाजी व शिजविलेल्या भोंपळ्याच्या फोडी होत्या त्यांत. त्यांनीं नंतर एका मोठ्या परातीवरील झांकण बाजूला केलें व मला त्यांनीं एक कडक पातळशी चपाती वाढली. एका बाईनें माझ्या ताटांत थोडेंसें मीठ वाढलें व माझ्यापुढें आणखी एक कटोरीभर सार ठेवण्यांत आलें. नंतर लगेच ती बाई माझ्या ताटांत दोन उकडलेले बटाटे वाढून गेली. त्यांच्यावरील साल तशीच होती. त्याचप्रमाणें ती चांगल्या भाजलेल्या कणकेच्या चपात्या वाढून गेली. गांधीजी माझ्याकडे वळून हंसत म्हणाले, "मी तुम्हांला वाढलं खरं पण प्रार्थना म्हटल्याशिवाय जेवायला सुरुवात करायची नाहीं बरं का!" ज्याअर्थीं लहान मुलेंसुद्धां अद्यापी आपल्या थाळीला हात लावीत नव्हतीं त्याअर्थीं मलाही थाळीला हात

---

* कस्तुरबांचें वय गांधीजींच्या पेक्षां थोड्या महिन्यांनीं अधिक होतें हें मिस्टर फिशर यांना माहीत नसावें. —अनुवादक.

लावतां कामा नये याची जाणीव मला आहे असें मी त्यांना सांगितलें. या खोलींतील तीस एक लोक शुभ्र वस्त्रें परिधान केलेले असून जमिनीवर मांडी घालून बसले होते. त्यांच्या पुढ्यांत अन्न वाढलेलें असतांही त्यांनीं अन्नाला अद्यापी स्पर्श केलेला नव्हता. जेवणास बसलेले लोक एकमेकांच्या पुढें अन्नाचीं भांडीं करून एकमेकांना वाढीत होते. घंटा वाजली, आणि एक उंच सशक्त दिसणारे, पायांत अर्धी विजार घातलेले गृहस्थ वाढप बंद करून हात जोडून व डोळे मिटून उभे राहिले. त्यांच्या डोळ्यांच्या पांढऱ्या कडा उघड्या दिसत असल्यानें ते आंधळे असावेत असा भास होत होता. त्यांनीं उंच सुरांत प्रार्थनागीत म्हणण्यास सुरुवात केली व त्या प्रार्थनेंत गांधीजींच्या सकट इतर सारे जण सामील झाले. "शांतिः शांतिः शांतिः "च्या घोषांत प्रार्थना संपली.

त्याचा अर्थ **शांतता** आहे असें मला देवांनीं सांगितलें.

वाटींतील आमटी घेण्यासाठीं मला एक चमचा देण्यांत आला होता. पण कित्येक जण ती आपल्या पोळीच्या चतकोराला लावून खात होते. माझ्या पोळीवर एका बाईनीं तूप वाढलें. अंमळ अधिक मीठ वापरल्यास हें जेवण कांहीं कमी रुचकर नव्हतें खास. उकळलेल्या गाईच्या दुधाचा वास घालविण्यासाठीं मी साखर मागून घेतली. (गांधीजींनीं बकरीचें दूध बंद केलें असून ते साऱ्या हिंदुस्थानभर गाईचें दूध घेण्याचा प्रचार करीत असतात. त्यायोगें सशक्त गुरांची चांगली निपज होईल अशी त्यांची अपेक्षा आहे.

गांधीजी एकसारखे जेवीत होते. ते मधून मधून आपल्या पत्नींना, खुर्शेदनां, देवांना, आणि मला वाढण्यासाठीं थांबत तेवढेच !

त्यांचे हात मोठे आहेत, त्याचप्रमाणें त्यांचीं बोटें पण मोठालीं आहेत, व त्यांचा आकारही प्रमाणशीर आहे. त्यांचे गुडघे मात्र मोठाले व पुढें आलेले आणि बटबटीत आहेत. त्यांचीं हाडें मोठीं असून भक्कम आहेत. त्यांची चामडी मऊ व स्वच्छ आहे. ते वाढण्यासाठीं भांड्यांत पळी घालीत असतां त्यांचा हात कांपत नाहीं. त्यांच्या पत्नी त्यांना मधून मधून गवताच्या पंख्यानें वारा घालीत होत्या. ते म्हणजे निस्वार्थीपणाचे शांत मूर्तिमंत प्रतीकच वाटतात.

मध्येंच थांबून गांधीजी म्हणाले: "तुम्ही रशियांत चौदा वर्षं राहिलां होतांत. तुमचं स्टॅलिनविषयीं काय मत आहे ?"

फारच उकडत होतं यावेळीं. त्यांतून माझे हात अन्नानें बरबरटलेले होते. म्हणून मी चटकन् एवढें म्हणालों; "फारच हुषार व फारच कठोर, निर्दय!"

"हिटलर इतका कठोर?" गांधीजींनीं विचारलें.

"जवळ जवळ," मी उत्तर दिलें.

कांहीं वेळ थांबून गांधीजी पुनः माझ्याकडे वळले व म्हणाले: "तुम्हीं व्हाइसरॉयनां भेटलांत कीं नाहीं?"

"होय!" मी म्हणालों. पण गांधीजींनीं तो विषय तेवढ्यावरच सोडला.

माझे घोटे हुडकण्याचा मी प्रयत्न करीत होतों. माझ्या चवड्यावर बराच भार पडल्यामुळें माझे पाय बधिर झाल्याचें मला आढळून आलें. शरीराचा सारा भार समतोल कसा वांटून द्यावा हें हिंदी माणसाला छान माहीत असतें, पण मी ही विद्या अद्यापि शिकलों नव्हतों. मी एक पाय उंच करून त्यावर सारा भार टाकला. त्यामुळें मला अंमळ बरें वाटूं लागलें. "गांधीजी मला म्हणाले: "तुमची सारी हालचाल थंडावल्यासारखी दिसते आहे!"

"नाहीं." इथलं अन्न फारच रुचकर आहे असं मला वाटतंय!"

"जेवढं लागेल तेवढं पाणी प्या. कांहीं हरकत नाहीं पाणी प्यायला." गांधीजी पुढें म्हणाले: "आम्हीं इथलं पाणी उकळण्याची छान खबरदारी घेत असतों. आतां तुम्हाला आमचा आंबा खायला हवा."

"दुसरे खाताहेत हें मी पाहतों आहें!" असें मी उत्तर दिलें, "आणि माझ्या आयुष्यांत अगदीं प्रथमच मी आंब्याचें उष्टावण करणार आहें." आंबा खाऊन झाल्यावर मला आंघोळ करावी लागेल असें खुर्शेद म्हणाल्या. मी आंब्याची साल काढण्यास सुरुवात केली. गांधीजी व इतर जण हसूं लागले. गांधीजी सांगूं लागले कीं पहिल्यानें आंबा हातांत घेऊन तो दाबून मऊ करावा लागतो, आणि मग आंतील मऊ गीर चोखायचा असतो. पण तो चांगला आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं तो सोलून पहाण्यांत माझा शहाणपणाच होता. ते म्हणाले: "आमच्या प्रमाणें तुम्हीं आंबा खायला तयार झालांत तर तुमच्या या अपूर्व धैर्याबद्दल आम्हीं तुम्हाला एक पदक बहाल करूं!" माझें जेवण झालें होतें. खुर्शेदनीं आपल्या डोळ्यांनीं खुणविलें कीं गांधीजी उठण्याच्या अगोदर तुम्हाला उठायला कांहीं हरकत नाहीं.

# जून ४, १९४२

हिंदी लोक बहुशः हस्तांदोलन करीत नसतात. ते एकमेकांना भेटले किंवा एकमेकांचा निरोप घेऊं लागले तर ते आपले हात जोडतात व ते आपल्या तोंडाच्या समपातळींत नेऊन, गोड स्मित करतात व मस्तक हलवितात. त्यावेळीं ते फारच प्रेमळ व निरागस दिसतात. मी गांधीजींना अभिवादन केलें त्यावेळीं त्यांनीं माझ्या हाताशीं हात मिळवून मला निरोप दिला.

मी घरीं गेलों, व बारा ते एकपर्यंत झोंप काढली. मी जागा झालों तों अगदीं घामानें दरदरून गेलों होतों. मी स्नानगृहांत आज तिसऱ्यांदा स्नान केलें. त्या खोलींत उभा राहून मी एका पितळेच्या तांब्यातून नुसतें डोक्यावरून पाणी ओतून घेतलें.

तीन वाजण्याच्या पूर्वीं कांहीं मिनिटें मी शंभर एक यार्ड गरम गोटे नि वाळूच्या रस्त्यावरून चाललों होतों. गांधीजींचें निवासस्थान आणि माझी झोंपडी यांमधील तें अंतर होतें. उन्हाच्या गरम झळीनें माझ्या डोक्यांत कसें अगदीं सुकल्यासारखें वाटूं लागलें होतें. मात्र उष्णतामान एकशेंदहा अंशावर आलेलें होतें. मीं गांधीजींच्या खोलींत प्रवेश केला त्यावेळीं सहा शुभ्र खादी वस्त्रें परिधान केलेले इसम जमिनीवर बसले होते. काळी साडी नेसलेली एक स्त्री पंख्याची दोरी ओढीत होती. त्या खोलींत फक्त एकच आरास दिसत होती. आणि ती म्हणजे काळ्या चौकटींत बसविलेली ख्राइस्टची छापील प्रतिमा होय. त्या चित्रावर खालील शब्द छापलेले होते. "तोच आमचा शांति ब्रह्म आहे!" गांधी आपल्या चादरीवर बसले होते. तेंच त्यांचें अंथरूण. त्यांच्या पाठीशीं एक पाट असून पाट आणि त्यांची पाठ या दरम्यान एक तक्क्या ठेवण्यांत आला होता. ते सोन्याच्या चौकटीचा चष्मा वापरीत होते, आणि फौंटनपेननें एक पत्र लिहीत होते. त्यांनीं कात्रीच्या पात्याप्रमाणें आपली मांडीची बैठक घातली होती. त्यांच्या मांडीवर एक फळी धरली असून त्यावर कोऱ्या कागदांचें एक पॅड होतें.

त्यावर ते लिहीत होते. हातांनीं तयार केलेल्या लांकडी घोड्यावर आणखी तीन फौंटनपेनें ठेवलीं होतीं. त्यांच्या आसनाच्या डाव्या बाजूस कांहीं नीट व्यवस्थेनें जमिनीवर एकमेकांवर रचून पुस्तकें ठेविलेलीं होतीं. ते मला म्हणाले: "या पंखा खेंचणाऱ्या स्त्रीच्या शेजारच्या अगदीं थंड जागीं बसा खालीं." मी एका कोंपऱ्यांत जाऊन बसलों. मी कुडाच्या भिंतीला माझी पाठ टेकविली. गांधीजी म्हणाले:

"तुमची हरकत नसेल तर या मंडळींना इथं बसूं द्यावं नाहीं? ते कांहीं एक बोलणार नाहींत. तुमची हरकत असेल तर ते इथून बाहेर जातील." देव होते, देसाई होते, आणखी किती तरी दुसरे आश्रमवासीही होते तिथें. त्यांच्यांत खुर्शेद ह्या होत्याच. एवढ्या मंडळींच्या समोर माझी गांधीजींशीं मुलाखत व्हावी अशी माझी इच्छा नव्हती फारशी. पण मी म्हणालों: "नाहीं!" आणि मी कामाला सुरुवात होण्यापूर्वी स्थिरस्थावर झालों.

"मी आतां पूर्णपणें आपल्या सेवेशीं हजर आहें," गांधीजी बोलले.

मी म्हणालों: "क्रिप्सचें मिशन म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासांतील स्थित्यंतर घडविणारी बाब होती असं माझं मत आहे. क्रिप्सचें मिशन थंडावल्याच्या महत्वाची आतां कदाचित देशाला जाणीव झाली असेल. आणि या जाणीवेपासून पुष्कळ चांगल्या गोष्टी निष्पन्न होण्याचा संभव आहे. आपल्यामतें क्रिप्सच्या मिशनचें कां दिवाळें निघालें यासंबंधीं मी थोडेंफार ऐकूं चहातों.'

"क्रिप्स येऊन पोहोंचले;" गांधीजी सांगूं लागले, "त्यावेळीं त्यांनीं मला एक तार पाठविली कीं तुम्ही मला नव्या दिल्लीस येऊन भेटावें. माझी जाण्याची इच्छा नव्हती. पण कांहीं तरी चांगलें निष्पन्न होईल असें मला वाटल्यावरून मी तिकडे जाण्यास निघालों. ब्रिटिश सरकारनीं देऊं केलेल्या ज्या कांहीं देणग्यासंबंधींचा खर्डा क्रिप्सनीं आपल्या बरोबर आणला होता त्याविषयींच्या गप्पा माझ्या कानांवर आल्या होत्या. पण त्या देणग्या काय होत्या हें मी प्रत्यक्ष पाहिलेलें नव्हतें. त्या देणग्यांचा खर्डा त्यांनीं मला दिला. तो थोडक्यांत वाचून पहातांच मी त्यांना म्हणालों, हेंच जर तुम्हांला द्यावयाचं होतं तर इथपर्यंत आलांत तरी कशाला? हिंदुस्थानला देऊं केलेल्या देणग्याचं स्वरूप जर एवढंच असेल तर मिळेल तें पहिलं विमान घेऊन तुम्हीं परत आपल्या घरीं पोहोंचलेलं बरं." क्रिप्सनीं उत्तर दिलें, "त्याचा मी अवश्य विचार करीन."

"क्रिप्सच्या देणग्यांसंबंधीं आपलं मत काय आहे?" मी विचारणा केली. "त्यांनीं तुम्हांला स्वायत्त स्वराज्य देण्याचं वचन दिलं होतं ना—व त्याचप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यांतूनही फुटून निघण्याचा अधिकार तुम्हांला त्यांनीं देऊं केला होताना?"

"सी. एफ्. अँड्र्यूज (हिंदुस्थानांत, ख्राइस्टचे अत्यंत विश्वासू अनुयाई प्रचारक म्हणून प्रसिद्ध असलेले गृहस्थ) हे नेहमीं ठासून सांगत असत कीं "स्वायत्त

स्वराज्य हें हिंदुस्थानाकरितां नाहीं." गांधीजी उत्तरले, "आमचे ब्रिटनशीं असलेले हितसंबंध हे इतर साम्राज्यांतर्गत स्वायत्त राष्ट्रांच्यासारखे नाहींत. तेथें गोऱ्यांची वसाहत असून त्यांतले बहुतेक लोक ब्रिटनचे निर्वासित आहेत किंवा त्यांचे वंशज तरी आहेत. आम्हांला कसल्याही प्रकारची स्वायत्तता नको आहे. आम्हीं ती मागतही नाहीं. आम्हांला जर कोणीही स्वायत्तता दान म्हणून बहाल केली तर आम्हीं स्वतंत्र रहाणार नाहीं. आतां फुटून स्वतंत्र होण्याविषयींची गोष्ट निघाली तर त्यामध्यें नाना तऱ्हांचे गुंतागुंतीचे बिकट प्रश्न उत्पन्न होतील. क्रिप्स योजनेंतील मुख्य दोष म्हणजे राजे महाराजांना देण्यांत येणाऱ्या हक्कासंबंधींचा होय. ब्रिटिशांचा असा आग्रह आहे कीं राजे महाराजे यांना संरक्षण देणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे आणि तें त्यांना संभाळायलाच हवें. कारण ब्रिटनच्या फायद्यासाठीं जे तह त्यांच्यावर लादण्यांत आले त्यांतच ही अट अंतर्भूत आहे. बिकानेरचे महाराज किंवा कोणी एक क्ष महाराजा ब्रिटिश इथें येण्याच्या पूर्वी येथें राज्य करीत होते आणि ते आतांपेक्षां केवढी तरी सत्ता गाजवीत होते. त्यांतील दुसरा दोष म्हणजे पाकिस्तानला दिलेली मंजूरी होय. हिंदू आणि मुसलमान यांच्यांतील झगडे हे ब्रिटिश राजसत्तेनें पेटविलेले आणि प्रज्वलित केलेले झगडे आहेत. त्यांना या क्रिप्स योजनेंत अगदीं पूर्ण मुभा देण्यांत आलेली आहे. लॉर्ड मिंटो हे व्हॉइसरॉय असतांना ( १९०९ ) त्यांनीं हे दोन अलग अलग धर्मीय मतदार संघ निर्माण करून या वितुष्टाला ठिणगी लाविली, आणि तेव्हांपासून आम्हांमध्यें वितुष्ट कसें अधिक वाढत जाईल इकडे ब्रिटिशांनीं विशेष लक्ष पुरविलें आहे. लॉर्ड कर्झन हा मोठा कार्यधुरंधर होऊन गेला. मी ज्याप्रमाणें चेम्सफर्ड, अर्विन ( हॅलिफॅक्स ) आणि लिनलिथगो यांना भेटलों त्याप्रमाणें त्यांना प्रत्यक्ष भेटलों नव्हतों. पण ते एका गृहस्थापाशीं एक गोष्ट बोलत व दुसरी दुसऱ्यापाशीं बोलत व आणखी तिसरीच तिसऱ्यापाशीं बोलून दाखवीत असत. सर सॅम्युएल होअरच्या बाबतींत मात्र मी कोणाशीं बोलत आहें याची मला पूर्ण जाणीव असे. त्यांचें काय म्हणणें असे हें मी पूर्णपणें जाणून असें. पण तसें कर्झनचें नव्हतें. कर्झननें घडवून आणलेली बंगालची फाळणी ही अगदीं आवश्यक सुधारणा होती. ती अगदीं योग्य उपाययोजना होती. पण त्यामुळें धर्माच्या पायावर उभारलेली ती इलाख्याची फाळणी होत होती. क्रिप्सनेंसुद्धां अगदीं हेंच तत्व आपल्या योजनेंत अंतर्भूत केलें होतें; आणि ही अत्यंत

मोठी दुसरी घोडचूक होती. म्हणून जोंपर्यंत ब्रिटिशांचं राज्य हिंदुस्थानांत आहे तोंपर्यंत हिंदुस्थानांत एकी होणं शक्य नाहीं."

"बरं," मी म्हणालों, "या क्रिप्सनीं दिलेल्या युद्धोत्तर तडजोडीचा आराखडा तुम्हांला आवडला नाहीं. पण मध्यंतर कालीन किंवा ताबडतोब दिल्या जाणाऱ्या सुधारणेंत इष्ट असं कांहींच नव्हतं का? तुम्हाला असं नाहीं वाटलं का कीं, भविष्यकालीन योजना कांहींही असल्या तरी, ताबडतोब दिल्या जाणाऱ्या सुधारणेंत कांहीं तरी फायदा आहे; त्यांच्यामुळं जनतेला ताबडतोब राज्यकारभार चालविण्याचा अनुभव मिळेल व हें युद्ध संपल्याबरोबर पूर्ण स्वातंत्र्य मागण्याचा तुम्हाला हक्कही प्राप्त करून घेतां येईल?"

"थोडक्यांत सांगायचं तर," गांधीजींनी उत्तर दिलं, "अगदीं याच बुद्धीनं मी या विषयाचा विचार केला, पण मी क्रिप्स योजनेची संहिता (text) पाहिली त्याबरोबर माझी खात्री झाली कीं त्यांत सहकारितेला बिलकुल वाव नाहीं. **संरक्षण** हा मुख्य वादविषय होता. युद्धकाळांत सरकारचं मुख्य कर्तव्य म्हणजे राष्ट्राचं संरक्षण हें होय.

प्रत्यक्ष युद्ध चालविण्याच्या बाबतींत मात्र मुळींच ढवळाढवळ करायची नाहीं. तें करण्यास मी असमर्थ आहें. पण रूझवेल्टनें कांहीं लष्करी डावपेचांच्या तंत्रांचा खास अभ्यास केलेला नाहीं, आणि केलाच असेल तर तो एकदेशीय आहे" ते क्षणभर थांबले. "किंवा मी चर्चिलचंच उदाहरण घेऊं?"

"नको," मी म्हणालों. "तुम्हाला रूझवेल्टचं उदाहरण घेण्याचा संकोच मुळींच वाटूं देऊं नका. हा मुद्दा आला ध्यानांत माझ्या!"

"मुद्दा असा आहे," गांधीजी आवर्जून सांगूं लागले, "कीं युद्धकाळांत फौजी सत्तेवर मुल्की सत्ता चालणं आवश्यक असतं; मुल्की जनता ही फौजी जनतेएवढी लष्करी डावपेंच वगैरे बाबतींत तालीम घेतलेली (तज्ञ) नसेलही कदाचित. जपानी विमानांना मार्गदर्शक होतील म्हणून जर ब्रम्हदेशांतील ब्रिटिश लोक तेथील सुवर्णमंदिरें (Golden pagodas) नष्ट करूं लागतील, तर त्यांचा नाश मुळींच करूं नका असं मी म्हणेन. कारण ज्यावेळीं तुम्हीं एखाद्या वस्तूचा नाश करतां त्या वेळीं तुम्हीं ब्रम्ही आत्म्याच्या (संस्कृतीच्या) कांहीं भागाचा नाश करतां. जेव्हां ब्रिटिश येऊन सांगूं लागतात कीं आम्हाला या ठिकाणीं विमानतळ बांधावयाचा

असल्यानं तुम्हीं येथून खेडूतांना उठवा–आणि या खेडूतांना आजच येथून निघून जायला हवं–तेव्हां मी म्हणेन, " तुम्हीं या गोष्टीचा काल कां नाहीं विचार केलात म्हणजे गरीब जनतेला तेथून निघण्याला अवकाश तरी मिळाला असता. त्याचप्रमाणं त्यांनीं अमुक ठिकाणीं जावं म्हणून त्यांच्यासाठीं जागा शोधून कां नाहीं देत दुसरी एखादी ?"

"या बाबी हाताळण्याचा अधिकार हिंदी जनतेच्या हातीं असावा असं जर तुमचें म्हणणें असेल," मी भर दिला "तर जनरल वेव्हेल यांना, ही युद्ध चालविण्याच्या कामांत ढवळाढवळ आहे असं वाटेल अशी माझी खात्री आहे."

"ब्रिटिशांनीं," गांधीजी स्मित करीत म्हणाले, " आम्हांला या युद्धकाळांत चहा-फराळाचीं व अन्नसामुग्रीचीं दुकानें चालविणें, लेखनसाहित्य छापणें, अशा तऱ्हांचीं सटरफटर किरकोळ कामें देऊं केलीं होतीं. मी जरी लष्करी डावपेचांत तरबेज नसलों तरी अशा कांहीं गोष्टी आम्हीं केल्या असत्या कीं त्यायोगें युद्धांत विजय मिळविण्याच्या कामीं त्या उपकारक ठरल्या असत्या. आमची मदत घेतली असती तर ब्रिटिशांची जी अतिपूर्वेला भंबेरी उडाली ती उडाली नसती."

" उघडपणें बोलायचं म्हणजे," मी समारोप केला, "संरक्षण या गोष्टीवर तुमचा मुख्य भर आहे." ते होय म्हणाले.

नेहरू आणि कॉंग्रेसचे इतर नेते यांचीही हीच विचारसरणी आहे का ?"

" हो. असें मला वाटतें." त्यांनीं उत्तर दिलें. " नेहरूनांही तसंच वाटतं अशी मला आशा आहे, आणि मौलाना साहेब ( मौलाना अबुल कलम अझाद–कॉंग्रेस पार्टीचे मुसलमान अध्यक्ष ) यांनाही तसंच वाटतं."

" थोडक्यांत सांगायचं म्हणजे," मी म्हणालों, " तुम्हांला क्रिप्स योजनेंत मुळींच कांहीं तथ्यांश आहेसं वाटत नाहीं तर मग ?"

" तुम्हीं हा अगदीं अचूक नि निश्चित सवाल मला केलात याबद्दल मला आनंद वाटतो," ते सांगूं लागले. " नाहीं. त्यामध्यें मुळींच कांहीं तथ्यांश नव्हता असं मला आढळून आलं."

" असं तुम्हीं क्रिप्सना सरळ सांगितलंत का ? मी पृच्छा केली.

" होय." त्यांनीं उत्तर दिलं. " मी क्रिप्सनां म्हणालों " तुम्हीं रशियांत अद्भुत घटना साध्य केलीत." " तुम्हीं असं त्यांना कां म्हणालांत ?" मी त्यांना

मध्यें थांबवून विचारलं, " सर स्टॅफर्ड क्रिप्सनीं कांहीं रशियाला या युद्धांत खेचलं नव्हतं, पण आडोल्फ हिटलर नांवाच्या इसमानं ! "

गांधी खूप हंसले, त्यांचे मित्रही हंसले. " पण मी व हजारों हिंदी लोक " ते आवर्जून सांगूं लागले, " यांचा असा विश्वास आहे कीं क्रिप्सनींच ही अद्भुत घटना साध्य केली."

" तुम्हीं असं म्हणालांत तेव्हां क्रिप्सनीं त्यावर हरकत घेतली नाहीं ?" मी विचारलें.

" नाहीं. " गांधी हंसत हंसत म्हणाले. " मी त्यांचा गौरव केला असं त्यांना वाटलं " रशियावर आक्रमण होण्यापूर्वी स्टॅलिननीं ब्रिटिशांची मदत मागितली होती असं आम्हांला वाटलं होतं. "

" नाहीं. तें बरोबर नाहीं," मी म्हणालों, " आक्रमण झाल्यावर रशियानें ब्रिटिशांची मदत मागितली आणि आतां त्याला अमेरिकेची व ब्रिटनची वाढत्या प्रमाणावर मदत होत आहे. पण हल्ला होण्यापूर्वी स्टॅलिनला हिटलरची भीति वाटत असल्यामुळं ब्रिटनची किंवा क्रिप्सची मैत्री जाहीर करणं शक्य झालं नाहीं. "

" कांहींही असलं," गांधीजी सांगूं लागले, " तरी मी क्रिप्सनां इथं सुद्धां कांहीं अद्भुत चमत्कार करण्यास सांगितलं, पण तें त्यांच्या आवांक्याबाहेरचं होतं. "

मी म्हणालों, " इंग्लंडच्या बहुजन समाजांत कांहीं तरी खळबळ उडालेली आहे असं मला वाटतं. गेल्या ग्रीष्मऋतूंत मी इंग्लंडांत विमानानें गेलों व तेथें नऊ आठवडे राहिलों. हें युद्ध संपल्यानंतर ज्या प्रकारच्या लोकांनीं युद्ध येण्यापूर्वी आपल्यावर राज्य केलें व आपल्यावर युद्ध ओढवून घेतलें त्या प्रकारच्या लोकांच्या हातीं आपलीं राज्यसूत्रें न जातील अशी खटपट करण्याचा त्यांनीं निश्चय केलेला आहे. क्रिप्स स्वतःच जनतेच्या या विरोधाचे मूर्तिमंत प्रतीक होऊं शकतील. त्यांनीं ऑफीसमध्यें मिळविलेलें उच्च पद म्हणजे एक प्रोत्साहनकारक चमत्कारच आहे नाहीं का ? "

" होय, " गांधीजी मध्येंच बोलले, " आणि मोठं निराशाजनक आहे; कारण क्रिप्समध्यें थोर मुत्सद्याचे गुण आहेत किंवा नाहींत याविषयीं मी साशंक आहें. आम्हांला हें अत्यंत निराशाजनक वाटतं कीं जो गृहस्थ जवाहरलालचा मित्र व हिंदुस्थानसंबंधीं कळकळ बाळगणारा इसम होता त्यानंच ही योजना इकडं आणण्यासाठीं तयार व्हावं ! "

# जून ४, १९४२

गांधीजींच्या डोक्यांत कांहीं तरी विचार चालले होते हें अगदीं स्पष्ट दिसत होतें—कदाचित माझ्यासाठीं त्यांनीं राखून ठेवलेली वेळ संपत आली होती—कारण ते म्हणाले—कांहीं विशिष्ट प्रसंग नसतां लॉर्ड सँकी एकदां मला " स्वतःची अंमळ काळजी घ्या, " असं मात्र म्हणाले होते. आणि मी त्यांना म्हणालों, " मी स्वतःची एवढी काळजी घेतली नसती तर आजच्याइतका मी वृद्ध झालों तरी असतों का? हाही एक माझ्यांतील दोष आहे. "

" तुम्हीं अगदीं पक्के आहांत, " मी स्मित करीत म्हणालों.

ते हंसत म्हणाले : " मी किती तरी कच्चा आहें. तुम्हांला इथून जाण्याच्या अगोदर माझ्यांत किती तरी दोष असल्याचं आढळून येईल. आणि तुम्हांला माझे दोष आढळले नाहींत तर ते शोधून काढण्यास मी तुम्हांला मदत करीन. " त्यांच्या कंबरेभोंवती लपेटलेल्या धोतराच्या सोग्याला साखळींत अडकविलेल्या निकलच्या मोठ्या घड्याळाकडे त्यांनीं पाहिलें व ते मला म्हणाले.

" मी तुम्हांला एक तास दिला. "

मी उठलों व त्यांना अभिवादन करून निघालों. या एका तासाच्या अवधींत फक्त एकदाच ती तोंडाचें बोळकें झालेली मुसलमान स्त्री त्यांच्या छातीवरील ओल्या फडक्याची घडी बदलण्यासाठीं आंत आली होती. त्यांनीं स्वतःच कैकवेळां आपल्या डोक्यावरील हात रुमाल काढून पाण्याच्या फुलपात्रांत बुचकळला होता, आणि तो पिळून पुनः आपल्या डोक्यावर ठेवला होता. प्रत्येक वेळीं जेव्हां ते आपल्या डोक्यावरील तो रुमाल काढीत तेव्हां मला त्यांच्या छोट्याशा चेहऱ्याचें व छोट्याशा वरील ओठावरच्या मिशांच्या छोट्या छोट्या काळ्या, बहुतेक पांढऱ्याच खुंटांचें दर्शन होत असे. त्यांचा वरचा ओंठ इतका अरुंद आहे कीं त्यांच्या मोठ्या नाकाचा शेंडा त्या ओठाला बहुतेक चिकटल्यासारखा दिसतो. त्यांचा खालचा ओंठ अत्यंत चैतन्यपूर्ण असून भावपूर्णही आहे. त्यांचा चेहरा म्हणजे भल्या मोठ्या डोक्याचें एक निमूळतें टोंकच असल्यासारखें दिसतें. आणि त्यांचे कान त्या डोक्याच्या दोन्ही टोंकांपासून बाहेर फुटल्यासारखे दिसतात.

त्यानंतर थोड्याच वेळानें मी माझ्या निवासस्थानीं येऊन पोहोंचलों. देव—समाज-समतावादींचे नेते—एका आश्रमस्थ इसमाबरोबर माझ्याशीं हिंदुस्थान, रशिया व युद्ध यासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं आले. ते ब्रिटनचे कट्टर विरोधी होते.

हें असें आहे याबद्दल देव यांनीं दिलगिरी व्यक्त केली पण इंग्लंडच्या हातून हिंदुस्थानचें अपरिमित नुकसान झालें होतें व त्यांचीं मतें राष्ट्रीय दुःखें अनुभवून झालेल्या प्रतिक्रियेच्या परिणामामुळेंच तशीं बनलीं होतीं यांत शंका नाहीं. गांधीजींशीं जी माझी मुलाखत झाली व जें जें गांधीजी माझ्याशीं बोलले त्याचीं समग्र टांचणें मला तयार करायचीं असल्यानें देव आणि त्यांचा मित्र हे तेथून गेल्याबरोबर मी गांधीजींच्या मुलाखतीसाठीं घातलेला निळ्या पट्टयांचा पायजमा सूटमधील सदरा काढून टाकला व माझीं टिपणें छापण्यासाठीं टंक यंत्रापाशीं बसलों. पांच मिनिटें झालीं नाहींत तोंच मला कंटाळा आला व मी घामानें अगदीं न्हावून निघालों होतों. अंघोळीच्या खोलींत जाऊन मी आणखी एकदां थंड पाणी अंगावर ओतून घेतलें. आगाशींत बसून मी टंक करीत असतां एक हिंदी स्त्री घरासमोर येरझारा घालीत असलेली मला दिसली. ती अनवाणी होती. तिनें आपल्या अंगांत एक घरीं तयार केलेली तंग खादी चोळी छातीखांद्यावरून परिधान केलेली होती; पाठ मात्र थोडीशी उघडी दिसत होती. तिच्या कमरेपासून तों थेट पायापर्यंत तिनें साडी परिधान केलेली असून तिच्या पदराचा एक सोगा तिनें आपल्या खांद्यामानेवरून एका हाताखालीं घेतलेला होता. ही साडी भडक पिवळ्या रंगाची असून तिचे कांठ रुंद व लाल रंगाचे होते. ती जेव्हां जेव्हां येरझारा घालतांना वळे तेव्हां तेव्हां टंक करीत असतांना मला लाल ज्वाळेचा भास होत होता. तिच्या डोक्यावर पाण्यानें भरलेला एक मातीचा लाल घडा होता. तिनें एका हातानें त्याला आधार दिलेला होता. हा हात उघडा असून तिच्या मनगटावर चकाकणाऱ्या धातूची फक्त एक बांगडी होती. समोरच्या घरांतील पाण्याच्या पिपांत पाणी ओतून ती पुनः परत आली. त्यावेळीं तो घडा तिच्या डोक्यावरील गोल चुंबळावर तिरपा ठेवलेला मला दिसला. बाहेर तळपणाऱ्या कडक उन्हांत बिचारीला हें खडतर काम करावें लागत होतें. एका छोट्याशा नळाची व्यवस्था केली असती तर बिचारीचे हाल व परिश्रम कमी झाले असते.

मी उन्हानें अगदीं थकून जाईपर्यंत टंक करीत बसलों होतों. नंतर मी खुर्शेदशीं गप्पागोष्टी करूं लागलों. पांच वाजतां जेवणाची वेळ होती, हें एका मधुर घंटेनें ध्वनित केलें. नेहमींच्या प्रार्थनेनंतर जेवणास सुरुवात झाली. एक आश्रमनिवासी गांधींच्या जवळ बसले होते. ते हिंदुस्थानींत बोलत असतां मधेंच त्यांच्या तोंडून एक इंग्रजी शब्द बाहेर पडला. मला त्यावेळीं उघड्या हवेंत भरलेल्या नव्या

दिल्लींतील कॉंग्रेसच्या विराट जानपद सभेच्या बैठकीची आठवण झाली असें मी म्हणालों.

त्याच्या आधल्याच दिवशीं मी हिंदुस्थानांत येऊन पोहोंचलों होतों. त्या वेळच्या मुख्य भाषण करणाऱ्या मिसेस असाफ अली ( कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळाचे मुसलमान सभासद डॉ. असाफ अली यांच्या हिंदू पत्नी ) यांचें होतें. त्यासुद्धां हिंदुस्थानींतच आपलें भाषण करीत होत्या. पण त्यांनीं वापरलेले इंग्रजी शब्द मी टिपून घेतलेले होते. ते म्हणजे "फॉरिन पॉलिसी, एक्स्प्लॉयटेशन, सोशल पोझिशन, एफीशिअन्सी, ब्रिटिश इंपीरियालिझम, नॉन कोऑपरेशन, इंडिया ऑफिस, आणि रेफ्यूजीज" ही यादी पाहून गांधीजी खूप खूष झाले होते. जवळ बसलेल्या आणखी एका इसमानें सांगितलें कीं आम्हांला आणखी एका शब्दप्रयोगाची ओळख झालेली आहे. आणि ती म्हणजे "स्टूडंट स्पाइज." सरकारनें कांहीं इतर विद्यार्थ्यांवर पाळत ठेवण्यासाठीं कांहीं विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांची गुप्तहेर म्हणून योजना केलेली होती. गांधीजी म्हणाले, "ब्रिटिशसरकारविरुद्ध हीहि एक माझी फिर्याद आहे."

गांधीजींनीं सोव्हिएट रशियांतील धाकदपटशाविषयीं मला विचारलें. माझ्या अनुभवांतील सविस्तर वृत्तांत मी त्यांना निवेदन केला. "मग माझ्या मतें फक्त इंग्लंड व युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिकाच कायतीं साऱ्या जगांत लोकसत्ताक राष्ट्रें उरलीं आहेत म्हणायचं?" गांधीजींनीं आपण होऊन पुस्ती जोडली. "हें आश्चर्यकारक आहे खरं," मी त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला. "युद्धकाळांतही इंग्लंड लोकसत्ताक कसं रहातं याचं मला आश्चर्य वाटतं; स्वीडनसुद्धां आहेच."

"होय," गांधीजींनीं गैरविश्वासात्मक टीका केली. "आणि स्वित्सरलंड, ब्रिटिश साम्राज्यांतील स्वायत्त राष्ट्रें." मी पुस्ती जोडली.

"गोऱ्यांच्या साठीं." गांधीजी मध्यें बोलले. "मला ठाऊक आहे. मी दक्षिण आफ्रिकेंत राहिलों आहें." त्यांनीं जेवण पुढें चालविलें.

मी आंघोळीसाठीं माझ्या झोंपडींत परत आलों. आंघोळीसाठीं तयारी करायची म्हणजे पायांतल्या चपला व पायजमा काढून ठेवायचा व उभ्यानें डोक्यावर तांब्यानें पाणी ओतून घ्यायचें, कीं झाली आंघोळ. अंमळ हुशारी वाटूं लागल्यावर मी पुनः गांधीनिवासाकडे निघालों. यावेळीं सव्वासहा वाजले होते. मी बाहेर एकच

मिनिट वाट पाहिली असेल तोंच गांधीजी बाहेर आले. त्यांच्या हातांत बांबूची एक भली मोठी काठी होती.

आश्रमांत रहाणारे डॉ. दास, गांधीजींचे वैद्य, व त्याचप्रमाणें आणखी अनेक तरुण स्त्रीपुरुष आम्हाला सामील झाले. गांधीजींनीं आपले दोनही हात तिथें जमलेल्या दोन स्त्रियांच्या खांद्यावर ठेवले होते. फिरायला जात असतांना गांधीजींचें दर्शन व्हावें म्हणून इतर खेड्यांतील कित्येक पाहुणे स्त्रीपुरुष गांधीआश्रमाच्या नजीक उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावर विस्मय व भक्ती यांच्या छटा स्पष्टपणें उमटलेल्या दिसत होत्या. आपल्या ओठाजवळ जोडलेले हात नेऊन कमरेपासून खालीं वांकून ते गांधीजींना नमस्कार करीत होते. गांधीजींनीं त्यांच्याशीं अंमळ विनोद केला व सारेजण हसूं लागले. पोक्तमंडळींचा आणखी एक घोळका– त्यांतील एक जण चांगलेच तुंदिलतनु होते–गांधीजी आपल्याला दर्शन देतील अशा उत्सुकतेनें बाजूला उभा होता. पण या कामीं त्यांची निराशा झाली. नांगरलेल्या शेतांना वळसा घालून जाणाऱ्या, धुळीनें भरलेल्या रस्त्यावरून आम्हीं निघालों होतों. "बरं मग ?" अशा तऱ्हेनें प्रस्तावना करून मी प्रश्न विचारावे अशी गांधीजींनीं सूचना दिली.

"पहिल्या जागतिक महायुद्धांत तुम्हीं ब्रिटिश सैन्यांत रंगरूट भरती करण्यासाठीं मदत केलीत," मी आरंभ केला. "आतांचें हें युद्ध सुरू झालें त्यावेळीं तुम्हीं मला ब्रिटिश सरकारला संकटांत ( पेचांत ) टाकायचें नाहीं असें प्रतिपादन केलेंत. आतां तुमची वृत्ती बदलली आहे हें अगदीं स्पष्टच आहे. याचं कारण काय ?"

"पहिल्या जागतिक युद्धाच्या वेळीं मी नुक्ताच दक्षिण आफ्रिकेंतून परत आलों होतों," ते समजावून सांगूं लागले, "माझे पाय अद्यापि स्थिर झाले नव्हते त्या वेळीं."

"माझ्या पायाखालच्या भूमीची मला स्थिरता वाटत नव्हती. याचा अर्थ असा नव्हे कीं माझ्या मनांत अहिंसावादाविषयीं श्रद्धा नव्हती. पण परिस्थितीनुरूप तिचा पूर्ण विकास व्हावयाचा असल्यानें माझ्या पायाखालील जमीन स्थिर असल्याची मला खात्री वाटत नव्हती. या दोन महायुद्धांच्या मधल्या काळांत मला कितीतरी अनुभव आले. तरी सुद्धां १९३९ च्या सप्टेंबरमध्यें व्हाइसरॉयशीं झालेल्या माझ्या कांहीं मुलाखतीनंतर मी जाहीर केलें कीं काँग्रेस युद्ध-प्रयत्नांच्या आड येणार नाहीं. मी म्हणजे कांहीं काँग्रेस

नव्हें. खरोखरी पहातां मी काँग्रेसमध्यें नाहीं. मी काँग्रेसचा सभासदही नाहीं कीं काँग्रेस पक्षाचा एखादा अधिकारीही नाहीं. माझ्यापेक्षां काँग्रेस ही अधिक ब्रिटन-विरोधी व युद्धविरोधी आहे, आणि मला तिच्या युद्धप्रयत्न-विरोधी इच्छेवर नियंत्रण घालणें भाग पडलें. आतां माझा कांहीं निश्चित निर्णय झालेला आहे. ब्रिटिशांचा पाणउतारा व्हावा असें मी इच्छीत नाहीं. पण ब्रिटिशांनीं इथून निघालें पाहिजे, ब्रिटिश हे जपान्यांपेक्षां अधिक वाईट आहेत असें माझें म्हणणें नाहीं."

"त्याच्या अगदीं उलट," मी उद्गारलों.

"त्याच्या अगदीं उलट असं मी कांहीं म्हणणार नाहीं," त्यांनीं उत्तर दिलें, "पण एक धनी सोडून दुसरा धनी करण्याची माझी इच्छा नाहीं. इंग्लंड स्वेच्छेनें येथून अगदीं नीटव्यवस्थेनें आपलें आसन गुंडाळील तर त्याचा त्यांत नैतिक विजय आहे असें मला वाटतें."

श्वासोच्छ्वास घेण्यासाठींसुद्धां न थांबतां गांधीजी एकसारखे बोलत होते. आम्हीं झपाट्यानें चालत होतों व खूप उकडत होतें याचा त्यांना कसलाही उपद्रव होत नव्हता. ब्रिटिशांचे बंगालमधील व इतर ठिकाणचे अत्याचार यावर गांधीजी बोलत होते. मला आजच पत्रें आलीं आहेत त्यावरून असें दिसतें कीं खेडुतांना आगाऊ ताकीत न देतां व कांहींएक नुकसानभरपायी न देतां विमान-तळ (एरोड्रोम) तयार करण्यासाठीं जागा मिळावी म्हणून आपापल्या खेड्यांतून हुसकून लावण्यांत येत आहे, असें त्यांनीं सांगितलें. "याच्या योगानें युद्धप्रयत्नांत अडथळे उत्पन्न होतात—जरी हाही एक युद्ध-प्रयत्नांचा अंगभूत भाग आहे असें वाटत असलें तरी." गांधीजींनीं टीका केली. "ब्रिटनला हिंदुस्थानांतून गाशा गुंडाळल्याशिवाय या महायुद्धांत यश मिळणार नाहीं अशी माझ्या मनाची आतां पहिल्यापेक्षां अधिक पक्की खातरी झालेली आहे."

गांधीजींच्या निवासाजवळ आम्हीं येऊन पोहोंचलों तेव्हां बराच अंधार पडला होता. ते अंगणांत एका लाकडी खाटेवर लेटले व जवळच्या दुसऱ्या खाटेवर त्यांनीं मला बसायला सांगितलें. मुसलमान स्त्रीनें छातीवर घेण्यासाठीं एक सुकें फडकें आणलें व ती त्यांचे पाय धुऊं लागली. मी "इंग्लंडनें हिंदुस्थानांत अनेक घोडचुका केल्या असतील" असें सांगूं लागलों, "आणि मधून मधून दडपशाही सुद्धां जारी केली असेल, पण परकी हुकूमशाही हिंदुस्थान जिंकून त्यावर सत्ता गाजवूं लागली तर

अधिक वाईट परिणाम भोगावे लागतील." याला उत्तर म्हणून ते खूप सविस्तरपणें बोलूं लागले व अमृतसर येथील १९१९ सालच्या कत्तलीविषयीं व ब्रिटिशांच्या इतर भयंकर दडपशाहीविषयीं अत्यंत कडक भाषेंत बोलूं लागले. इतर जनतेपेक्षां आपण अत्यंत सौम्य आहोंत असा त्यांचा आग्रह होता.

आणि कांहीं हिंदी गृहस्थ तर इतके ब्रिटिशद्वेष्टे आहेत कीं जपानला विजय मिळाला तरी त्यांची कांहीं हरकत नाहीं. गांधीजींनीं उठण्यासाठीं अंमळ हालचाल केली त्याबरोबर माझी निघण्याची वेळ झाली असें मी म्हणालों. ते म्हणाले, " जाऊं नका. प्रार्थनेसाठीं चला !"

आतां रात्र अगदीं काळी कुट्ट दिसत होती. त्यांच्या निवासापासून अंदाजें पन्नास यार्डांवर असलेल्या उघड्या मैदानांत मी गांधीजींच्या बरोबर गेलों. त्या ठिकाणीं सत्तर एक आश्रमनिवासी स्त्रीपुरुष पांढरीं शुभ्र वस्त्रें परिधान करून त्या चौकाच्या तीन अंगांस मांडी घालून जमिनीवर बसले होते. स्त्रिया चौकाच्या डाव्या अंगाला बसल्या होत्या, आणि पुरुष इतर दोन अंगाला बसले होते. गांधीजी म्हणाले, "कां हो फिशर, इथं तुम्हाला खालीं मांडी घालून बसतां येईल का?" या चौकाच्या चौथ्या अंगाच्या मध्यभागीं ज्या ठिकाणीं गांधीजी बसले होते त्या ठिकाणीं मी माझें आसन मांडलें. त्यांचें तोंड या मंडळींच्या समोर होतें. मुसलमान स्त्री त्यांच्या मागें बसून गवताच्या पंख्यानें त्यांना वारा घालीत होती. प्रार्थनेसाठीं जमलेल्या कित्येक माणसांनीं आपल्याबरोबर केरोसीनचे हात-कंदील आणले असून समोरच्या मंडळींच्या चेहऱ्यावर उजेड पडूं नये म्हणून त्यांनीं पुढच्या अंगास कागद लाविलेला होता. असलाच एक कंदील गांधीजींच्या पुढ्यांतही होता. गांधीजींनीं एक गीत म्हणण्यास सुरवात करतांक्षणीं प्रार्थनेला सुरवात झाली. सारेजण तें गीत गाण्यांत सामील झाले होते. गांधीजी त्यांच्या बरोबरीनें गात होते, तरीसुद्धां त्यांचा खडा आवाज इतर आवाजांतून अगदीं स्पष्टपणें ऐकूं येत होता. मग एक गवयांचा नेता गावूं लागला व त्यांच्या शेजारीं बसलेला दुसरा इसम टाळ वाजवून ताल धरीत होता. सारेजण कांहीं तरी शोकगीत गात असावेत असा मला भास होत होता. तें गाणें माझ्या कानाला चिनी गाण्या-सारखें लागत होतें, किंवा एकसुरी अरबी कलमा म्हटल्यासारखें. नंतर गांधीजींनीं जाडजूड हिंदू धर्मग्रंथांतून कांहीं भाग वाचून दाखविला. शांतता प्रस्थापित व्हावी या अर्थाचें गीत म्हटल्यावर प्रार्थना संपली.

जून ५, १९४२

मी पहांटे चार वाजतांच जागा झालों होतों. रात्रीं पांढरेंशुभ्र चांदणें आकाशांत पसरलें होतें व चांदण्याही चमकत होत्या. त्यामुळें हवा खूपच उत्साहवर्धक होती. मी एका लाकडी चारपायीवर निजलों होतों. या चारपायीला सुंभ विणून अंथरूण बनविण्यांत आलें होतें. रात्रीची हवा चांगली थंड होती. सुमारें सव्वासहा वाजतां माझे शेजारी डॉ. दास माझ्यापाशीं येऊन सांगूं लागले कीं आज गांधीजींना बरें वाटत नसल्यानें ते आज फिरावयास निघणार नाहींत. खुर्शेदनीं माझ्या न्याहारीसाठीं चहा व बिस्किटें आणलीं, त्याबरोबर लोणी, आंबे व मधही पण होता. मुंग्या व माशा माझ्याशीं स्पर्धा करीत असतांच मी झटपट न्याहारी उरकली. मी माझीं टिपणें टंक करीत होतों. पण देव, व आरण्यकम् या नांवाचे एक भले मोठे सिलोनी गृहस्थ माझ्याशीं रशियासंबंधीं वादविवाद करण्यासाठीं उपस्थित झाल्या-मुळें मला माझें टंकण्याचें काम अर्धेंच सोडावें लागलें. हे सिलोनी गृहस्थ एक सुप्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते असून शिक्षणतज्ञ आहेत. माझा पूर्वपक्ष मी त्यांच्यापुढें मांडला तो असा कीं " नुसतं स्वातंत्र्य मिळणं हें कांहीं राष्ट्राच्या दृष्टीनं पुरेसं नसतं, आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच खरी डोकेदुखी सुरू होणार आहे. " खुर्शेदनीं कालचेंच आपलें म्हणणें पुनः मांडलें कीं, हिंदुस्थान फॅसिस्ट बनलें तरी कांहीं हरकत नाहीं पण तें प्रथम स्वतंत्र झालें पाहिजे हें खास ! जर बोस ( सुभाषचंद्र बोस–१९३८ सालचे कॉंग्रेसचे अध्यक्ष–जे महायुद्ध सुरू झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं हिंदुस्थानांतून बाहेर निसटले, जर्मनींत जाऊन राहिले व ब्रिटिश सरकारा-विरुद्ध रेडिओवर प्रचार करीत असतात ) भलें मोठें हिंदी सैन्य बरोबर घेऊन हिंदुस्थानांत घुसले तर सारें राष्ट्र त्यांच्या बाजूला ओढलें जाईल. त्या आणखी असेंही म्हणाल्या कीं जपानी जेत्यांनीं हॉंगकॉंग, मलाया, सिंगापूर आणि ब्रह्मदेश या ठिकाणच्या हिंदी सैनिकांना व ऑफिसरांना स्वातंत्र्य दिलें असून त्यांना खासे सैनिक बनविण्याची तालीम दिली जात आहे व ॲक्सिस रेडिओवर असें सांगितलें जात होतें कीं या सैन्यानिशीं त्यांचा हिंदुस्थानांत कूच करून येण्याचा व ब्रिटि-शांना हांकून देण्याचा इरादा आहे. बोस हे लोकांमध्यें नेहरूंपेक्षां अधिक प्रिय आहेत असें त्यांचें म्हणणें आहे; आणि विशिष्ट बाबतींत गांधीजीपेक्षांही त्यांचा लोकांवर अधिक प्रभाव आहे. देव सांगत होते कीं गेल्या कांहीं वर्षांत नेहरूंच्या

व इतर कांहीं विचारी लोकांच्या दबावामुळें काँग्रेस आर्थिक व सामाजिक बाबींत अधिक लक्ष घालूं लागली होती. त्याचप्रमाणें काँग्रेसची एक साजाजिक योजना पण तयार झालेली होती. तिची एक प्रत हुडकून माझ्या अवलोकनासाठीं देण्याचें त्यांनीं मला वचन दिलें.

अकरा वाजतां दुपारचें भोजन झालें. मला जेवणाच्या वेळीं येण्याला उशीर झाला होता. गांधीजी अगोदरच येऊन भोजनगृहांत स्थानापन्न झाले होते. मी आलों तसे "यावें" असं म्हणून त्यांनीं माझें ममतेनें स्वागत केलें. मी त्यांना "बरे आहांत ना" असा कुशल प्रश्न केला. "होय." त्यांनीं उत्तर दिलें. "पण आज मला चालण्याचा भारी कंटाळा आला होता. इथं व्यायाम हा अत्यंत आवश्यक असल्यामुळें तुम्हाला एकटंच किंवा इतर कोणा मित्रांच्या संगतींत फिरायला जावं लागेल." "असल्या या भयंकर गरम हवेंत हिंडायला जाण्यास तयार व्हायचं म्हणजे फक्त आपल्याशीं संभाषण करण्यास सांपडावं म्हणूनच" मी उत्तर दिलें. ते खूप हंसले. त्यांनीं आपल्या थाळींतून एक उकडलेला कांदा मला वाढला. मी तो खालीं ठेऊन दिला व त्याच्या ऐवजीं कच्चा कांदा हवा म्हणून सांगितलें. त्यामुळें माझी रुची बहारली नाहीं तर सारं जेवणं सपक नि मिळमिळीत. खुर्शेदनें मला एक चहाचा चमचा दिला पण गांधीजींनीं मोठा चमचा माझ्यापुढें केला व म्हणाले, "तुमच्या आकाराला शोभेल हा चांगला." जेवण झाल्यानंतर मी आंबा खाण्यास सुरुवात करणार तों गांधीजींनीं एक घरीं तयार केलेलें खादी वस्त्र माझ्यापुढें केलें. मी म्हणालों, "रोममध्यें असलों कीं रोमन लोकांच्याप्रमाणें वागण्याचा माझा बाणा आहे. मी कांहीं इथंही अपवाद ठरूं इच्छीत नाहीं."

"तुम्हीं वागताहांत खरे तसे पण माझ्यापाशींही एक वस्त्र आहे बरं का ?"

दुपारचे तीन वाजतां गांधीजींच्या मुलाखतीसाठीं त्यांच्या घराकडे मी पायींच गेलों. देसाई आणि दुसरे एक सेक्रेटरी खालीं जमिनीवर बसून गांधींजींना आलेल्या पत्रांचीं उत्तरें लिहीत होते. खुर्शेदनीं हातीं पंखा घेतला होता. आतां मला या खोलींत आणखी एक आरास दिसली. भिंतीवर एका धार्मिक मिरवणुकीचें चित्र चितारलें गेलें होतें. पण त्याचे रंग मात्र अगदीं मिळमिळीत असलेले दिसत होते. त्याचप्रमाणें गांधीजींच्या पाठीशीं असलेल्या भिंतीवर एका नारळाच्या झाडाचें व नारळीच्या पानाचें चित्र रेखाटलेलें असून त्यावर ॐ असें चिन्ह

काढण्यांत आलें होतें. तें अरबी ३ प्रमाणें दिसलें मला. पण देसायांनीं मला सांगितलें कीं तें ॐ चें चिन्ह असून त्याचा अर्थ ग्रीक लोगोस ( ज्ञान ) प्रमाणें आहे. गांधीजी आंत आले. त्यांनीं माझें स्वागत केल्यावर ते आपल्या अंथरुणावर लवंडले. "पडल्या पडल्याच निमूटपणें तुमचे रट्टे खाण्याचा माझा विचार आहे," ते म्हणाले. मुसलमान स्त्रीनें त्यांच्या पोटावर चिखलाचा लेप लावला. ते म्हणाले, "याचा अर्थ असा कीं मातीशीं लवकरच मी संबद्ध होणार." मी कांहीं एक बोललों नाहीं. "तुम्हाला माझ्या म्हणण्याचा आशय बरोबर कळल्यासारखें दिसत नाहीं." "छे" मी म्हणालों, "मला आपला आशय अगदीं बरोबर कळला. पण अद्यापी मातीशीं मिसळून जाण्याइतके आपण कांहीं वृद्ध झालेला नाहीं असं माझं म्हणणें आहे. "आपली काया मातीस मिळून जाण्याची कल्पना सुचायला अद्याप बराच अवधी आहे." "कां बरं"! ते उद्गारले. "तुम्हीं, मी किंवा आम्ही सारेजण–कांहीं शेंसवाशे वर्षांत–पण इतर सारे थोड्या फार अवकाशांत धुळीस मिळणारच आहोंत." ते थांबले व "बरं मग ?" अशा प्रश्नार्थक सूचनेनें मला प्रश्न विचारण्यास त्यांनीं सूचना दिली.

"भावी काळांत एखादी योजना अंगिकारायची याविषयीं मी विचार करूं लागलों कीं ती प्रत्यक्ष अंगीकारीत असतां तिचें स्वरूप कशाप्रकारचें असलेलें दिसेल याविषयींच मी अधिक विचार करीत सुटतों." "मला खात्रीनं वाटतं कीं तुम्हींसुद्धां ब्रिटिशांनीं इथून चालतं व्हावं या सूचनेचाहि असाच विचार केला असला पाहिजे नाहीं का ?" ब्रिटिशांनीं इथून कसं जावे असं आपल्याला वाटतं ? आस्ते, आस्ते ?

"प्रथम," त्यांनीं विचारपूर्वक उत्तर दिलें, "राजेरजवाडे आहेत—त्यांचीं स्वतःचीं सैन्यें आहेत. ते आम्हांला त्रास देतील. पण ब्रिटिश इथून निघून गेले म्हणजे इकडं सारं कांहीं स्थिर-स्थावर होऊन जाईल असं मात्र वाटत नाहीं. कदाचित् ब्रह्मघोटाळाहि माजून रहाण्याचा संभव आहे. मी म्हणालों आहे कीं, 'ब्रिटिशांनीं इथून सुखासमाधानानं आपला गाशा गुंडाळावा व हिंदुस्थान देश ईश्वराच्या स्वाधीन करून टाकावा.'"

"अशात-हेची ही अवास्तव भाषा कदाचित् तुम्हांला रुचणार नाहीं. त्याला तुम्हीं वाटेल तर अराजकता म्हणा. फारच वाईट झालं तर एवढंच होईल ना ? पण ती अराजकता थांबविण्याचा किंवा होऊं न देण्याचा आम्हीं प्रयत्न करूं."

" हिंदी लोकांना ताबडतोब आपलें सरकार स्थापतां येणार नाहीं का ? " मी सुचविलें. " होय, " त्यांनीं चटदिशीं उत्तर दिलें, " या देशांतील राजकीय वातावरणांत तीन मुख्य बाबी आहेत. त्या म्हणजे, राजेरजवाडे, मुसलमान आणि काँग्रेस या तिघांना मिळून कामचलाऊ सरकार स्थापणें अशक्य होणार नाहीं. "

" कोणत्या प्रमाणांत ? " मी विचारलें. " सत्ता व अधिकाराच्या जागा बरोबर वांटल्या जातील का ? "

" मला तसं सांगतां येणार नाहीं. " त्यांनीं उत्तर दिलें. " काँग्रेस ही सर्वांत मोठी शक्तिमान बाब असल्यानें ती कदाचित् आपल्यासाठीं अधिक अधिकार मागेल. पण या साऱ्या गोष्टी गोडीगुलाबीनें ठरविणें शक्य आहे. " " मला असं वाटतं, " मी सांगूं लागलों " कीं ब्रिटिशांना इथून कायमचा गाशा गुंडाळणं शक्य होणार नाहीं. त्याचा अर्थच असा कीं, हिंदुस्थानचं खुशाल जपानच्या हातावर पाणी सोडावं, आणि इंग्लंड या गोष्टीला कधींच कबूल होणार नाहीं, किंवा संयुक्त संस्थानांनासुद्धां हें पसंत पडणार नाहीं. तुम्हीं जर अशी मागणी केलीत कीं ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांतून आपलें बाडबिच्छाड घेऊन निघून जावें तर तुम्हीं अशक्य गोष्टीची मागणी करीत आहांत; तुम्हीं झाडाची सालच ओरबाडून काढतां आहांत जणूं कांहीं. तुमचं असं तर मागणं नाहीं ना ?—कां खरोखरी तुमचं तेंही मागण आहे,–कीं त्यांनीं आपलं सैन्यसुद्धां इथून घेऊन चालतं व्हावं ? "

दोन मिनिटेंपर्यंत गांधीजी कांहींएक बोलले नाहींत. त्या खोलींतील प्रशांतता सुद्धां आतां अगदीं स्पष्टपणें ऐकूं येत होती. " तुमचं म्हणणं बरोबर आहे. खरं पाहूं गेलं असतां, " ते अखेरीस म्हणाले, " नाहीं, ब्रिटनला, किंवा अमेरिकेला किंवा इतर राष्ट्रांना आपापलीं सैन्यें इथं ठेवून हिंदुस्थानची भूमी ही लढाईच्या सैन्यांच्या हालचालींची प्रस्थानभूमी म्हणून वापरावी लागणार आहे. जपाननें हें युद्ध जिंकावं अशी माझी इच्छा नाहीं. ॲक्सिसला जयप्राप्ती व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. हिंदुस्थान—हिंदी जनता–स्वतंत्र झाल्याशिवाय ब्रिटनला हें युद्ध जिंकतां येणार नाहीं अशी माझी खात्री आहे. ब्रिटन कमी शक्तिमान आहे. आणि जोंपर्यंत ब्रिटन हिंदुस्थानवर राज्य करीत आहे तोंपर्यंत नैतिकदृष्ट्या ब्रिटनचें समर्थन करणें अशक्य आहे. इंग्लंडचा पाणउतारा व्हावा अशी माझी इच्छा नाहीं."

" पण संयुक्त राष्ट्रांना हिंदुस्थानची भूमी ही आपल्या सैन्यांची प्रस्थानभूमी म्हणून उपयोग करायची असेल तर त्यांमध्यें किती तरीं बाबींची गुंतागुंत झालेली आढळून येईल. सैन्यें कांहीं निर्वातजागीं बसून रहात नसतात. उदाहरणार्थ, संयुक्तराष्ट्रांना रेल्वेचा चांगला बंदोबस्त असणें हें अत्यंत आवश्यक वाटेल. "

" बरोबर" ते म्हणाले, " त्यांना रेल्वे वापरायला कांहीं हरकत नाहीं. त्याचप्रमाणें त्यांना बंदरांचा बंदोबस्तही नीटनेटका ठेवणें इष्ट आहे, कारण त्या ठिकाणीं त्यांना लागणारा माल मसाला उतरवावा लागणारच. मुंबईमध्यें किंवा कलकत्त्यामध्यें दंगे-धोपे झालेले पसंत पडणार नाहींत. याबाबीसाठीं त्यांनीं सहकार्य व सहप्रयत्न यांची आवश्यकता भासल्यावांचून रहाणार नाहीं."

" या साऱ्या सहकार्यांच्या अटी सलोख्याच्या तहनाम्यांत वर्ज करतां येतील असें मला वाटतें," मी जोर दिला. " होय " ते म्हणाले, " इंग्लंडशीं तसा आम्हीं लेखी करार करूं. "

" किंवा ब्रिटनशीं, अमेरिकेशीं किंवा इतर संयुक्त राष्ट्रांशीं. " मी समस्या पुरी केली.

होकारार्थी त्यांनीं आपली मान हालविली. " मग तुम्हीं आतांपर्यंत याचा उच्चार कां केला नाहींत ? " मी विचारलें. " मला हें कबूल करायला पाहिजे कीं तुम्हीं जेव्हां कायदेभंगाची चळवळ पुनः सुरू करणार असें मी ऐकलें तेव्हां माझें मन त्याच्याविरूद्ध दूषित झालेलें होतें, त्यामुळें युद्धाची प्रगती खुंटेल असा माझा विश्वास होता; कारण मला असें वाटतें कीं हे युद्ध लढलेंच पाहिजे नि जय हा मिळविलाच पाहिजे. विजयाची माळ ॲक्सिसच्या गळ्यांत पडली तर जगामध्यें सर्वत्र अंधःकार माजणार असें मला अगदीं स्पष्टपणें दिसतें आहे. पण आम्ही हें युद्ध जिंकले तर मात्र जग सुधारण्याला वाव मिळेल अशी माझी कल्पना आहे."

" इथें मात्र तुमचें आमचें जमणें शक्य नाहीं " ते वादविवाद करूं लागले. " ब्रिटन नेहमीं ढोंगीपणाची शाल आपल्या अंगावर परिधान करीत असतें. 'वचने किं दरिद्रता ' अशी त्याची वचनबाजी असते. दिलेलीं वचनें पाळणें हें त्याच्या स्वप्नींही नाहीं. पण लोकसत्ताक राष्ट्रांना विजय मिळाला तर जगाला चांगले दिवस येणें शक्य आहे अशी माझी मनोदेवता मला सांगते." " आम्हीं जशा प्रकारचा तह-नामा करूं त्यावर सारें अवलंबून राहील. " मी म्हणालों. " तुम्हीं या युद्धकाळांत जें

कांहीं कराल त्यावर सारं अवलंबून राहील." त्यांनीं माझ्या म्हणण्यांत दुरुस्ती केली.

"मला आपल्याला असं सांगायचं आहे कीं," मी सांगूं लागलों, "अमेरिकन मुत्सद्यांना तुमच्या स्वात्रंत्र्याविषयीं फार सहानुभूति वाटते आहे. ज्यावेळीं चर्चिलनीं अॅटलांटिक करार हा हिंदुस्थानला लागू होऊं शकत नाहीं अशी जाहीर घोषणा केली तेव्हां संयुक्तसंस्थानी सरकारनें त्यांनीं तसें भाषण न करण्याबद्दल त्यांचें मन बदलण्याचा खूप प्रयत्न केला. वॉशिंगटनमधील वजनदार माणसें पॅसिफिक करार हिंदुस्थानला लागू करावा या खटपटींत आहेत. पण या कामीं त्यांना अद्याप फारसें यश आलें नाहीं असें त्यांनीं मला सांगितलें. याचें कारण असें कीं हा पॅसिफिक करार हिंदुस्थानला लागू करायचा म्हणजे सम्राटशाहीचा अंत झाला असें जाहीर केल्यासारखेंच होणार आहे. आणि जोंपर्यंत इंग्लंड हिंदुस्थानला आपल्या काबूंत ठेवूं पहात आहे तोंपर्यंत आम्हाला अशी घोषणा कशी करितां येईल बरें."

"भविष्यकालीन वचनांवर माझा विश्वास नाहीं," गांधीजी आवर्जून म्हणाले. "युद्धानंतर स्वातंत्र्य देण्याच्या गोष्टीची मला पर्वा वाटत नाहीं. मला आतां स्वातंत्र्य हवें आहे. त्यायोगें इंग्लंडला हें युद्ध जिंकायला मदत होईल."

"मग तुम्हीं आपली ही योजना व्हाइसरॉयना कां कळविली नाहीं?" मी विचारलें, "आज हिंदुस्थान संयुक्त फौजी हालचालीसाठीं प्रस्थानभूमी म्हणून वापरली गेली तर तुमची कांहीं हरकत नाहीं असं तुम्हीं त्यांना सांगणं इष्ट आहे."

"मला कोणीही विचारलं नाहीं," गांधीजींनीं उत्तर दिलें, "मी जनतेला तयार करण्यासाठीं लवकरच कायदेभंगाची चळवळ सुरू करणार अशी मी घोषणा केलेली आहे. तुम्हीं मला यासंबंधीं कांहीं सरळ सरळ लेखी प्रश्न विचारलेत तर मी त्यांचीं उत्तरें "हरिजन" मध्यें देऊं शकेन. (हें गांधीजींचें इंग्रजी भाषेंतील साप्ताहिक आहे—हरिजन म्हणजे अस्पृश्य) फक्त प्रश्न लहान असूं द्यात म्हणजे झालें."

"माझ्या लिखाणासंबंधीं आपल्याला माहिती असेल तर आपल्याला आढळून येईल कीं मी नेहमीं सीधे, अल्प व पाणी पिळून काढलेले असेच प्रश्न विचारीत असतों." मी माझें घोडें पुढें दामटलें.

## जून ५, १९४२

" आपण इथें येण्यापूर्वी जवाहिरलालनीं मला आपल्याबद्दल सांगितलें होतें." गांधीजी सांगूं लागले. " तुम्हीं मोठे प्रामाणिक गृहस्थ असून कोणाचाहि पक्षपात करण्याची तुमची इच्छा नाहीं. हजारों गोष्टीत ढवळाढवळ करण्याची तुमची इच्छा नसून तुम्ही चांगले खंबीर गृहस्थ आहांत असें त्यांनीं मला तुमच्या-विषयीं सांगितलें आणि तें मी आतां प्रत्यक्ष पाहातोंच आहें म्हणा ! " ते हंसले " होय. खंबीर–निदान शरीरप्रकृतींत तरी. " मी म्हणालों.

" मी तुमच्याशीं अगदीं खुल्या दिलानें नि मोकळेपणानें बोललों आहें, " ते म्हणाले, " पण तुम्हीं म्हणजे साहेबलोक आहांत असें अजून माझें मत आहे. "

ते खूप हंसले. पण मी त्यांना मला बरोबर समजलें नाहीं म्हणून विचारलें. " तुम्हीं काय म्हणालांत साहेब–ब्लोक होयना ? ( एका माळेचे मणी ) म्हणजे तुम्हीं म्हणालात तो इंग्रजी शब्द ब्लोकच होताना ! " आतां मात्र सारेजण अगदीं खो खो हंसत सुटले व त्या हंसण्यानें सारें घर दणाणलें.

" नाहीं–लोक !–" ते हंसले. एका सेक्रेटरींनीं, **दोन सभ्य गृहस्थ** असा त्याचा सरळ अर्थ आहे असें सुचविलें. महादेव देसाई तेथेंच डोक्यावर चिखल थापून बसलेले होते. त्यांच्या डोक्यावरचा तो थापलेला चिखल थेट कोसाक्सच्या टोपीसारखा उठावदार दिसत होता. ते म्हणाले, त्याचा अर्थ " उच्चसंस्कृतीचे असा आहे.

हंसण्याची लाट ओसरल्यावर गांधीजी म्हणाले, " मिस कॅथरिन मेयो ( मदर इंडियाची लेखिका ) इथें आली आणि मी तिचा चांगला पाहुणचार केला; पण तिनें मात्र जें लिहिलं तें नुसतं गटार उपसलेलं. मी तिला उद्देशून काय लिहिलं आहे, हें तुम्हाला माहीत आहेच. "

" नाहीं. " मी उत्तर दिलें.

" गटार तपासणारी ! " गांधीजी म्हणाले.

" मी अत्यंत गरीब घराण्यांतला माणूस आहें, " मी म्हणालों. " भूक ही काय चीज असते याची मला चांगली जानपछान आहे. दलित व दरिद्री यांच्याविषयीं नेहमीं माझ्या अंतःकरणांत सहानुभूती वास करिते आहे. किती तरी अमेरिकन गृहस्थांना हिंदुस्थानबद्दल फार कळकळ वाटते. म्हणून मला वाटतें

कीं तुम्हीं जे थोड्या दिवसापूर्वी अमेरिकन जनतेच्या विरुद्ध बोललांत तें अनुदारपणाचें होतें. "

" तसं बोलणं अत्यंत आवश्यक होतं, " गांधीजी आवर्जून म्हणाले. " मला थोडासा धक्का द्यायचा होता. मला वाटतं कितीतरी अमेरिकन गृहस्थांच्या अंतःकरणांत माझ्याविषयीं अंमळ ओलावा आहे. मला त्यांना सांगायचं होतं कीं तुम्ही जर पैसा-देवतेची पूजा करीत रहाल तर तुमच्या हातून जग सुधारणं अशक्य आहे. मला खरोखरीच अशी भीति वाटते कीं लोकसत्ताक राष्ट्रें हीं ॲक्सिस राष्ट्रांचा पराभव करतील व स्वतः मात्र जपान किंवा जर्मनीसारखींच वाईट बनतील. "

" ही भीति सार्थ आहे खरी, " मी मधेंच बोललों. " पण इंग्लंड या महायुद्धांत सामील होईल तर तो देश फॅसिस्ट होईल असं पुष्कळ लोकांनीं बोलून दाखविलं आहे. पण खरं पहातां या महायुद्धांत सामील झाल्यानंतर इंग्लंड पूर्वीपेक्षांहि अधिक लोकसत्ताक बनलें आहे. "

" नाहीं. " त्यांनीं हें मत अमान्य केलें. " हें असं नाहीं हें आम्हांला आज हिंदुस्थानांत स्पष्टच दिसतंय कीं. "

" मग, खुद्द इंग्लंडमध्यें तरी ! " मी सुचविलें.

" खुद्द इंग्लंडमध्येंही खरं असणं शक्य नाहीं. गांधीजी विशेष जोर देऊन सांगू लागले. " साऱ्या साम्राज्यांतही शक्य नाहीं. हिंदी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं मी कैक दशकं ( दहा वर्षं ) झगडलों आहें. आतां यापुढं आम्हांला वाट पहात बसणं शक्य नाहीं. पण आमच्याविषयीं त्यांच्या अंतःकरणांत कळकळ आहे खास. "

ते थांबले. मला ते बरेच अस्वस्थ झालेले दिसले. " इंग्लंड, " ते विचारपूर्वक म्हणाले, "हिंदुस्थानमध्यें न उडालेल्या सुरुंगावर बसलें आहे. तो सुरुंग केव्हांहि उडण्याचा संभव आहे. आज इथं इंग्लंडच्या विरुद्ध एवढा त्वेष व एवढा द्वेष आहे कीं त्याला ह्या महायुद्ध-प्रयत्नांत हिंदुस्थानापासून कांहींएक मदत मिळणार नाहीं. हिंदी लोक इंग्रजांच्या सैन्यांत दाखल होतात ते फक्त पोटासाठीं, पण त्यांच्या अंतःकरणांत प्रेमाचा ओलावा मुळींच नाहीं. तो असता तर त्यांनीं इंग्लंडला खास मदत केली असती.

" आज आपण ज्या कांहीं गोष्टी हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्यें समेट घडवून आणण्यासाठीं आवश्यक आहेत असं म्हणालात, त्या साऱ्यांचं सार काढायचं म्हणजे,

मी म्हणालों, “ तुम्हीं क्रिप्स योजना फेंटाळून लाविलीत. क्रिप्सनीं तुम्हांला थोडेसे हक्क देऊं करून बरेचसे इंग्लंडच्या हातीं राखून ठेविले होते. आतां तुम्हीं इंग्लंडला थोडसं देऊं करून बरंचसं हिंदुस्थानच्या हातीं राखून ठेऊं चहाताहांत. ”

“ हें अगदीं बरोबर. ” त्यानीं कबूल केलें. “ मी क्रिप्सना उलथें-पालथें केलें खरें. ”

त्यांच्या घड्याळावरून पहातां माझ्या मुलाखतीचा अवधी संपत आल्याचें मला आढळून आलें. माझें स्वतःचें पुस्तक, “ जनता आणि राजकारण ” त्यांनीं वाचावें अशी सूचना करण्याचेंही धैर्य मला होईनां. हें पुस्तक देवांच्या जवळ होतें. ते स्वतः तें चाळून पहातील अशी मला उमेद होती. एका सेक्रेटरींनीं मला विचारलें, “ या तुमच्या पेजिंग थ्रू- या शब्दांचा अर्थ काय बरं ! ” त्याचा अर्थ असा गांधीजी म्हणाले, “ कीं शेवटचें पान पहिल्यानं पहायचं, नंतर पहिलं पान पहायचं, आणि मग मधलं पान पहायचं. ” “ आणि मग तें पुस्तक भिरकावून द्यायचं नि म्हणायचं कीं वा ! किती छान आहे हो हें तुमचं पुस्तक ! ” मी सुचविलें. “ आपण कबूल केलेला तास पुरेपूर संपला. ”

“ होय तुम्हीं संपविलांत खरा तो तास ” ते म्हणाले. “ आतां जाऊन टबांत बसा ! ”

मी या घरांतून बाहेर पडल्यावर स्वतःशींच विचार करूं लागलों. “ या म्हणीचा अर्थ काय असावा बरं ? गो अँड सिट ऑन ए टॅक्—आमच्याकडे म्हण आहे. तसा तर त्याचा अर्थ नसेल ना ? ” कांहीं कां असेना हा टबांत बसण्याचा विचार चांगला आहे खराच. मी फक्त त्यांत थोडीशी दुरुस्ती केली. माझ्या बिऱ्हाडीं पोहोंचल्यावर मी माझा जामानिमा उतरविला व पाणी असलेल्या धुणीं धुण्याच्या टबांत एक लाकडी पेटी ठेविली. त्यावर घडी करून एक टर्किश टॉवेल ठेवला. या टबाच्या बाहेर असलाच दुसरा एक खोका ठेवून त्यावर मी माझा (टाइप-रायटर) टंकयंत्र ठेवलें. हा एवढा बंदोबस्त झाल्यावर मी टबांतल्या खोक्यावर बसलों आणि या सबंध तासभर झालेला गांधीजींचा संवाद सारा टंक करून काढला. मधून मधून कांहीं मिनिटांनंतर मी घामाघूम झाल्यावर टबांतून पाणी घेऊन माझ्या खांद्यावर व पाठीवर ओतून घेऊं लागलों. या पद्धतीनुसार मला सबंध एक तास टंक करणें शक्य झालें, आणि थकवा तर मुळींच वाटला नाहीं.

जेवण संध्याकाळीं पांच वाजतां असे. मी यावेळीं गांधीजींच्या आधीं भोजन-घरांत पोहोंचलों. ते आंत आल्यावर मला म्हणाले, " हें कसं ठीक झालं. " मी दुपारच्या जेवणाला अंमळ उशीरा आलों होतों त्याच्यावर ही टीका होती. " आपण येण्याच्या आधीं इथं येणं हें अधिक सभ्य कीं आपण आल्यानंतर, या विचारांत पडलों आहे मीं " मी म्हणालों. " कृत्रिम सभ्यपणाला, " ते सांगूं लागले " या ठिकाणीं बंदी आहे. तुम्हाला वाटेल तेव्हां यायला हरकत नाहीं. "

त्यांनीं पुनः एकवार मी उकडलेला कांदा घ्यावा म्हणून खटपट चालविली. पुनः मी तो घेण्याचं निश्चयानं नाकारलं. " तुम्हीं इथं उपाशी मराल बरं का, " ते म्हणाले. " दोन मुख्य जेवणांच्या अवधींत मी कांहीं उपाशी नव्हतों " मी म्हणालों. " मी ताक आणि चहावर हात मारला होता. " त्यांनीं सांगितल्याप्रमाणें मी खात बसून वाचन केलें म्हणजे त्यांच्या सूचनेंत अंमळ दुरुस्ती केल्याचें सांगितलें. मी टबांत बसून वाचन केलें इतकेंच नव्हें तर लेखनसुद्धां केलें आणि मी माझ्या पद्धतीचें पद्धतशीर वर्णन करून सांगितलें. ते खूप मोठ्यानें हंसले. आज दुपारीं त्यांना अंमळ थकवा वाटत असल्यानें माझ्याबरोबर फिरण्यास येतां येत नाहीं याचें आपल्याला वाईट वाटतें, असें त्यांनीं मला सांगितलें.

माझें जेवण झालें आहे असें पाहिल्यावर ते मला म्हणाले, " फिशर तुम्हाला वाटेल तेव्हां उठायला हरकत नाहीं. शिष्टाचार म्हणून उगाच ताटकळत बसायचं कांहीं कारण नाहीं. " मी उठलों, व माझे बूट व टोपी चढविल्यावर मी भोजन-घराच्या बाहेर पडलों तेव्हां गांधीजी मला म्हणाले, " जवाहिरलाल इथं रविवारीं येणार आहेत हें तुम्हाला कोणी सांगितलें कीं नाहीं ! "

" नाहीं. " मी उत्तर दिलें. " आज कोणता वार बरं ? आज दिवस कोणता, याची इथं आठवणसुद्धां होत नाहीं. "

" शुक्रवार, " ते हंसत हंसत म्हणाले.

" माझ्याबरोबर फोटो काढून घ्यायला उभे रहाल का ? " मी विचारलें.

" फोटोग्राफर कोणी इथंच आजूबाजूला असेल तर माझी कांहीं ना नाहीं. तुमच्या बरोबर मी फोटोग्राफमध्यें असलों तर माझी कांहीं हरकत नाहीं. "

" म्हणजे, " मी म्हणालों, "या शब्दांनीं आपण माझा मोठाच गौरव केलात असं मी समजतों. "

“आपला गौरव करून घ्यायची इच्छा आहे वाटतं?” त्यांनीं प्रश्न केला.

“आपणा साऱ्यांनाच तसं नाहीं कां वाटत?” मी म्हणालों.

“होय.” त्यांनीं कबूल केलें. “पण कधीं कधीं तें आपल्याला बरंच महाग पडत असतं नाहीं?

मी घरीं जाऊन टबांत बसलों, व चार प्रश्न टंक करून काढले. त्या प्रश्नांचीं उत्तरें गांधीजींनीं **हरिजन**मध्यें देण्याचें कबूल केलें होतें.

आजच्या माझ्या गांधीजींशी झालेल्या मुलाखतीला ऐतिहासिक महत्त्व आहे असें मला वाटतें. आज हिंदुस्थानांत अत्यंत अवश्य असलेल्या बाबींसंबंधीं गांधीजींच्या मनांत पालट झालेला होता हें मला आढळून आलें. “ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडून चालतं व्हावं”, असें जें त्यांनीं मागें म्हटलें होतें त्याऐवजीं ते आतां मला म्हणाले, “ब्रिटिशांनीं इथं खुशाल रहावं आणि आपले युद्ध-प्रयत्न खुशाल चालू ठेवावेत.” म्हणजे याचा अर्थ असा कीं युद्ध-प्रयत्नांना त्यांची कांहीं हरकत नव्हती, आणि कांहीं विशिष्ट प्रसंगीं त्यांना मदत करण्यासही त्यांची तयारी होती. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळण्याबाबतच्या मुख्य बाबींत तडजोड करण्याची त्यांची पूर्ण तयारी होती, असा याचा अर्थ होता. माझ्या बिऱ्हाडाबाहेरच्या उघड्या जागीं माझें अंथरूण घातलें होतें. त्यावर जाऊन मी लोळलों. रात्री हातांत पेटविलेला हातकंदील घेतल्याशिवाय अंथरूणांतून बाहेर पडायचें नाहीं अशी खुर्शेदनीं मला ताकीद दिली होती. त्यांनीं तो कंदील पलीकडेच आगाशींत ठेविलेला होता. या ठिकाणीं विंचवांचा सुळसुळाट होता असें त्यांनीं मला बजावलें होतें.

लांब अंतरावरून प्रार्थनेचे मंजुळ स्वर माझ्या कानीं पडले आणि मग मी नवाच्या सुमारास झोपीं गेलों. आजची रात्र थंड होती.

जून ६, १९४२

मी सकाळीं पांच वाजतां उठलों व दाढी वगैरे करून मी लंडनहून बरोबर आणलेला एक निळ्या पट्ट्यांचा पायजामा सूट होता त्यापैकीं पायजमा चढविला व आरण्यकमूर्नीं दिलेलें एक खादी कुडतें अंगांत घातलें. तें कुडतें माझ्या गुडघ्यापर्यंत पोहोंचत होतें. सकाळच्या न्याहारीला आंबे, चहा व रोटी होती. नंतर मी गांधीजींच्या झोंपडीकडे निघालों. ते बाहेरच आपल्या आसनावर बसले होते व

एका मोठ्या टंबलरमधून आंब्याच्या फोडी पळीनें काढून इतरांना देत होते. त्यांची पत्नी त्यांना वारा घालीत होती. ते बारीकसा एक पंचा नेसले होते.

त्यांनीं माझें स्वागत केलें व माझ्या वेषाकडे पाहून, "अरे वा!" अशी टीका केली. त्यावर मी म्हणालों "हा पिकडिली नि खादी असा गंगाजमनी थाट कसा काय आवडतोय आपल्याला?"

"वाः फार छान दिसतोय!" ते म्हणाले. "मला वाटतं तुमच्यासाठीं स्पेशल माप घ्यावं लागलं असेल नाहीं?" त्यांनीं पुष्टी जोडली. मी हें कुडतें आरण्यकम् यांच्यापासून मागून आणल्याचें सांगितलें, गांधीजी म्हणाले; "त्यांनीं अमेरिकेच्या कोलंबिया विश्वविद्यालयांत अभ्यास केला होता हें तुम्हाला माहीत आहे ना?" "होय तें मला माहीत आहे," मी म्हणालों. कांहीं क्षण थांबून मी त्यांना विचारलें, "आपण माझे प्रश्न वाचून पाहिले ना!"

"हो, मी त्यांचीं उत्तरं आतां सकाळींच देणार आहें," ते म्हणाले.

नंतर थोड्याच वेळानें आम्ही सकाळच्या पायपिटीसाठीं निघालों. मी त्यांना प्रश्न केला, "आपण आठवड्यांतून एक दिवस मौन धारण करतां तें काय म्हणून? त्याच्या मागं कोणती विचारप्रणाली आहे!" "विचारप्रणाली? काय या शब्दाचा अर्थ!" त्यांनीं मला उलटा प्रश्न केला. मी म्हणालो, "म्हणजे तत्त्व, हेतू," मी उत्तर दिलें. ते हंसले. "तें असं झालं," ते सांगूं लागले; "कामाच्या ओझ्याखालीं माझ्या नुसत्या चिंधड्या चिंधड्या होत होत्या. मी प्रवास करायचा एकसारखा. गरमागरम झालेल्या आगगाड्यांतून प्रवास करावा लागे. किती तरी सभांतून व्याख्यानं द्यावीं लागत, आणि आगगाड्यांच्या डब्यासमोर व इतरत्रही हजारों लोकांच्या झुंडी मला भेटण्यासाठीं जमत, व प्रश्न विचारीत; आणि अनंत बहाणे करून माझ्याबरोबर प्रार्थनेंत सामील होण्यासाठीं परवानगी मागत. आठवड्यांतून एक दिवस पूर्ण विश्रांती घ्यावी अशी माझी इच्छा होती. त्यासाठीं मी ही मौनदिनाची युक्ति लढविली. पुढें मी त्याला पावित्र्याचें स्वरूप दिलें व त्याला सत्शीलपणाचें आवरण चढविलें. मला एक दिवस पूर्ण विश्रांती हवी होती याच्या पलीकडे हेतूबितू कांहींएक नव्हता."

आम्हीं चालतच होतों. त्यांनीं आपला हात एका तरुण युवतीच्या खांद्यावर टेकविला होता. ती युवती आश्रमांतील स्वयंपाकघरांत कामाला असे. "शांतीमुळं

किती विश्रांती मिळते नाहीं. " ते स्वतःशींच पुटपुटत होते. वास्तविक पहातां तशी ती विश्रांती खास नव्हे.. पण आपल्याला बोलायचं असून सुद्धां जेव्हां आपण बोलत नाहीं तेव्हां मात्र बरीच विश्रांती मिळते खरी. आणि विचार करायलाही खूप वेळ मिळतो. "

मी गांधीजींच्या अगदीं नजीकच चालत होतों पण त्या स्वयंपाकघरांतील तरुणीनें गांधीजीला ऊन्ह लागू नये म्हणून त्यांच्यावर काळी छत्री धरली होती. त्यांच्या छातीवर किंवा डोक्यावर कांहीं एक वस्त्र नव्हतें. दुसऱ्या बाजूनें येऊन डॉ० दासनीं दुसरी एक छत्री उघडून गांधीजींच्या वर धरली. वाटेंत पडलेल्या बांबूंच्या काटक्या पुढें पळत जाऊन दास उचलीत व पलीकडे शेतांत फेकून देत.

मी मि. राजगोपालाचारींच्या योजनेसंबंधानें गांधीजींना प्रश्न केला. त्यांनीं गेल्या एप्रिलमध्यें सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या बरोबर चाललेल्या वाटाघाटींत कॉंग्रेसचे एक प्रतिनिधी या नात्यानें भाग घेतला होता. राजाजी—त्यांना हिंदी जनता याच नांवानें ओळखते—हे हिंदुस्थानांतील एक अत्यंत शहाणे गृहस्थ आहेत. ते गांधीजींचे एक जुने स्नेही व सहकारी आहेत आणि गांधीजींच्या सर्वांत धाकट्या चिरंजिवांचे-देवदासचे ते सासरे आहेत. क्रिप्सची योजना फिसकटल्या-पासून, कॉंग्रेस-पार्टी व मुस्लिम लीग यांनीं एकत्र येण्यासाठीं राजाजींनीं अनेक व्याख्यानें दिलीं होतीं. कॉंग्रेसनें मुस्लिम लीगची पाकिस्तानची ( स्वतंत्र मुस्लिम संस्थानची ) मागणी मान्य करावी म्हणजे तडजोड होण्यास अवकाश लागणार नाहीं. पण मी राजाजींच्या कार्यक्रमाविषयीं गांधीजींना विचारलें तेव्हां ते म्हणाले "त्यांच्या योजना काय आहेत याची मला खरोखरी कांहीं माहिती नाहीं. त्यांनीं माझ्या विरुद्ध मतप्रसार करावा किंवा मी त्यांच्याशीं वादविवाद करावा ही खरोखरी दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यामुळें मी अशी आज्ञा देऊन ठेविली आहे कीं आम्हां दोघांमधील वादविवाद तूर्त तहकूब ठेविले जावेत. पण त्यांतली मख्खी अशी आहे कीं राजाजींची योजना काय आहे याची मला गंध-वार्ताही नाहीं."

"त्यांच्या योजनेचा मतितार्थ असा नाहीं का ?" मी विचारलें, "कीं हिंदू आणि मुसलमान या दोघांनींही गुण्यागोविंदानें नांदण्यासाठीं व एकजुटीनें कार्य चालविण्यासाठीं मार्ग शोधून काढावा ?"

" होय," गांधीजींनीं उत्तर दिलें, पण तें अशक्य आहे. जोंपर्यंत तिसरी सत्ता म्हणजे इंग्लंड–ही इथं आहे तोंपर्यंत आमची जातिविशिष्ट ( कॉम्यूनल. ) दुही ही चालूच रहाणार व आम्हाला छळत रहाणार ! पुष्कळ वर्षांपूर्वी त्या वेळचे व्हाइस-रॉय लॉर्ड मिंटो यांनीं तर घोषणा केली होती कीं हिंदू व मुसलमान यांना अलग अलग ठेवल्याशिवाय आमची हिंदुस्थानावरील सत्ता अबाधित रहाणार नाहीं."

हें मिंटोच्या भाषणांतील अवतरण मी पाहिलें आहे असें मी गांधीजींना सांगितलें.

" तेव्हांपासून ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं हें तत्त्व मान्य केलेलें आहे, " गांधी-जींनीं ठासून सांगितलें.

" मला असं सांगण्यांत आलं आहे " मी म्हणालों, " कीं ज्यावेळीं कॉंग्रेस मंत्रिमंडळें अलग अलग इलाख्यांतून स्थापन करण्यांत आलीं होतीं–म्हणजे १९३७, १९३८, १९३९ या सालीं, त्यावेळीं त्यांनीं मुसलमानांशीं पंक्तिप्रपंच केला."

" त्या त्या इलाख्यांतल्या ब्रिटिश गव्हर्नरांनीं तें तसं नव्हतं याबद्दल जाहीर रीतीनें ग्वाही दिलेली आहे " गांधीजींनीं जोरानें प्रतिपादलें.

" पण हें खरं नाहीं का, " मी आणखी विचारलें, " कीं संयुक्त प्रांतांत कॉंग्रेसला निवडून येण्याची खात्री वाटत नसल्यानें कॉंग्रेस व मुस्लीम यांनीं निवडणुकीसाठीं एकी घडवून आणली आणि त्यामुळें कॉंग्रेस प्रचंड बहुमतानें निवडून आली आणि मग मात्र त्यांनीं मुसलमानांशीं तडजोड ( Coalition ) करण्याचें अगदीं साफ नाकारलें ?"

" नाहीं." गांधीजींनीं खंडन केलें. " संयुक्त प्रातांत कॉंग्रेसनें स्थापन केलेल्या मंत्रिमंडळांत चार मुस्लीम मंत्रि घेण्यांत आले होते. ते मुस्लीमलीगचे प्रतिनिधी नसतील पण ते मुस्लीम होतेच कीं नव्हे. आम्ही नेहमीं मुसलमानांशीं सहकार्य करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. लोक असं म्हणतात कीं मौलाना ( मौलाना अबुल कलम आझाद–एक मुसलमान विद्वान महापंडित )–कॉंग्रेसचे अध्यक्ष हे आमच्या हातांतले बाहुले आहेत. खरें पाहतां ते कॉंग्रेसचे हुकुमशहा आहेत असं म्हणणं अधिक शोभेल. ते तिचे अध्यक्ष आहेत. पण क्रिप्स योजनेमुळें मात्र हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्यें पूर्वीपेक्षांहि अधिक फूट पडलेली आहे.

या दोन मुख्य समाजांतील तेढ वाढत गेली व फूट अधिक खोल झाली याचें श्रेय सर्वस्वी ब्रिटिश राजनीतीला दिलें पाहिजे. ”

“ ही फार दुःखाची गोष्ट आहे नाहीं का, ” मी मध्येंच म्हणालों, “ कीं क्रिप्सना भेटण्यासाठीं काँग्रेसचे प्रतिनिधि दिल्लीस आले. त्याचप्रमाणें मुस्लिम लीगचे प्रतिनिधी पण क्रिप्सनां भेटण्यासाठीं आले, त्यांच्याशीं बोलले पण ते एकमेकांशीं बोलूं शकले नाहींत.

“ ही फार दुःखाचीच गोष्ट नसून ती अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे;” गांधीजींनीं कबूल केलें पण हा सारा दोष मुस्लिम लीगचा आहे. हें जागतिक महायुद्ध सुरू झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं नव्या दिल्लींत व्हॉइसरॉय यांना भेटण्यासाठीं आम्हां दोघांनाही पाचारण करण्यांत आलें होतें. राजेंद्रप्रसाद ( काँग्रेस कार्यकारी समितीचे एक सदस्य ) आणि मी असे काँग्रेसच्या वतीनें बोलणें करण्यासाठीं गेलों होतों, आणि मि. जिन्हा मुस्लिम लीगच्या तर्फे आले होते. मी जिन्हांना ब्रिटिश राज्याधिकाऱ्याशीं एकजुटीनें बोलणें करावें म्हणून अगाऊ एकत्र वाटाघाट करण्याविषयीं सांगितलें. आम्हीं नव्या दिल्लींत भेटायचें ठरविलें. पण जेव्हां आम्हीं दोघेही हिंदुस्थानला पूर्ण स्वातंत्र्य हवें आहे अशी मागणी करणार असें सांगितलें तेव्हां ते म्हणाले, ‘ मला स्वातंत्र्य नको आहे. ’ अर्थात् आमचें जुळणें शक्यच नव्हतें. निदान एकीचं नाटक तरी करून दाखविण्यासाठीं आपण दोघेही व्हाइसरॉयांच्या इथें बरोबर जाऊं या असा मी निरोप दिला; मी म्हणालों कीं त्यांनीं माझ्या कारमधून चलावें किंवा मी त्यांच्या कारमधून जाण्यासही सिद्ध होतों. माझ्या त्यांच्या कारमधून जाण्यास त्यांनीं रुकार दिला. पण आम्हीं व्हॉइसरॉयशीं बोललों तें मात्र अगदीं वेगवेगळ्या स्वरूपांत व वेगवेगळे विचार व्यक्त करण्यांत आले. ”

एवढ्या वेळांत आम्हीं गांधीजींच्या घरापर्यंत येऊन पोहोंचलों होतों. मी बाहेर उभा राहिलों. मी एका बांबूच्या काठीला टेकून उभा राहून विश्रांती घेत होतों, पण गांधीजी गरजून वादविवाद करीतच होते. “प्रत्यक्ष जीवनांत आम्हांला एकमेकांपासून वेगळं करणं अशक्य आहे. आम्हीं कांहीं दोन राष्ट्रं नाहीं आहोंत. प्रत्येक मुसलमान ऐतिहासिक शोध करील तर त्याला आपलें नांव एका काळीं हिंदू होतें असें आढळून येईल. प्रत्येक मुसलमान हा खरा हिंदूच आहे. फक्त त्यानें इस्लामी धर्माचा स्वीकार केलेला आहे एवढेंच. त्यामुळें कांहीं आम्हीं अलग राष्ट्रें होऊं शकत नाहीं. आम्हीं खरोखरी दोन राष्ट्रें असलों तर कोणाही ख्रिस्ती

महात्म्यानें आम्हां साऱ्यांना ख्रिस्ती केलें तरी आम्हीं एक राष्ट्र होणार नाहीं. त्याचप्रमाणें या हिंदुस्थानांतील दोनही धर्म दोन अलग अलग राष्ट्रें निर्माण करूं शकत नाहींत. यूरप तर ख्रिश्चनच आहेना! मग जर्मनी व इंग्लंड हे भाषा व संस्कृति या दृष्टीनें अगदीं एक असतां एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यास कां सिद्ध होतात ? आम्हां साऱ्या हिंदवासीयांची एकच समायिक संस्कृति आहे. उत्तरेकडे हिंदुस्थानी आणि उर्दू या भाषा हिंदु व मुसलमान या दोघांना एकसारख्याच अवगत आहेत. मद्रासकडे हिंदू व मुसलमान हे दोघेही तामीळ भाषा बोलतात, आणि बंगालमध्यें तर ते फक्त बंगालीच बोलतात. तेथें उर्दू नाहीं कीं हिंदुस्थानी नाहीं. ज्यावेळीं जातिविशिष्ट कलह निर्माण होतात तेव्हां ते गाई किंवा धार्मिक मिरवणुकी यांच्यामुळेंच प्रोत्साहित केले जात असतात. त्याचा अर्थ असा कीं आमच्या धर्मभोळया समजुतीमुळेंच दंगेधोपे व कलह होत असतात, आम्हीं अलग अलग राष्ट्रें आहोंत म्हणून नव्हें.

"कारो ( परराष्ट्रीय राजकारण या शाखेंतील व्हॉइसरॉय यांचे सेक्रेटरी—ते पंजाबांत एक फार मोठे ब्रिटिश अधिकारी होते ) व जेंकिन्स ( पुरवठा-खात्यांतील एक उच्च ब्रिटिश अधिकारी ) मला सांगत होते कीं खेड्यापाड्यांतून हिंदु-मुसलमान यांच्यामध्यें तेढ मुळींच नाहीं. आणि मी इतर लोकांपासूनही ऐकिलें आहे कीं खेड्यापाड्यांतील या दोन्हीं विधर्मीय समाजांत पूर्ण संतोष व सलोखा वास करीत असतो. हें जर खरें असेल तर तें फार महत्त्वाचें आहे. कारण हिंदुस्थानांत शेंकडा नव्वद खेडी आहेत.

"हें अगदीं अस्सं आहे," गांधीजी म्हणाले, "यामुळें अर्थातच एवढं सिद्ध होतं कीं लोकांत दुही नाहीं व असं ही सिद्ध होतं कीं राजकारणी पुरुष आम्हांत फूट पाडीत आहेत."

मी गांधीजींना सांगितलें कीं मी दिल्लीमध्यें ज्या हॉटेलांत रहात असे तेथील नोकर मला सांगत होता ( तो मुस्लिम लीगचा सदस्य असून पाकिस्तानचा पुरस्कर्ता असतांही ) कीं हे जातिविशिष्ट तंटे नेहमीं ज्या ठिकाणीं मुसलमान हे अल्पसंख्याक असतात त्या ठिकाणींच होतात. अर्थात् ज्या ठिकाणीं हिंदू अल्पसंख्याक असतात त्या ठिकाणीं ते होत नसतात. "फिशर," गांधीजी समजावून सांगूं लागले. "तुम्हीं हिंदुस्थानांत फारच थोडे दिवस राहिला आहांत. तुम्हांला

सर्व गोष्टींचा अभ्यास करणें शक्य नाहीं. पण पूर्ण तपास करून आम्हीं चूक केली आहे किंवा आम्हीं गुन्हा केला आहे असें जर तुम्हांला आढळून आलें तर मात्र मोठ्यानें तसें ओरडून सांगायला बिलकुल अनमान करूं नका."

माझ्याशीं बोलत बोलत ते मला एका लांबच्या लांब इमारतीपाशीं घेऊन आले. "इथें माझे रुग्णाइत आहेत." ते म्हणाले. ते एका खाटेशेजारी थांबले. त्यावर एक बाई बसली होती. ती आजारी दिसत होती. गांधीजी तिच्याशीं पांच-एक मिनिटें बोलत होते. ती हंसत होती व तेही एकसारखे हंसत होते. "ती माझी फार चांगली पेशंट आहे," गांधीजी म्हणाले.

डॉ. दास आमच्याबरोबर होते. गांधीजींना अंमळ खिजविण्याच्या हेतूनेंच मी म्हणालों, "तिला डॉक्टराच्या स्वाधीन करणें अधिक चांगलें नव्हे का?"

"नाहीं." गांधीजींनीं साफ सांगितलें. "त्यांत भोंदूगिरीच फार असते." नंतर ते दुसऱ्या खोलींत गेले. ती खोली रिकामी होती. त्या ठिकाणीं एक लाल पाळणा होता. गांधीजी आंत आल्याबरोबर आईनें आपलें मूल पाळण्यांतून बाहेर काढलें. ते बोलत असतां त्याचे गालगुच्चे घेत होते. ते म्हणाले, "ही कांहीं माझी पेशंट नव्हे. ती माझी करमणूक आहे." ते बालक खूप खिदळत होते, व गांधींजी त्याला अधिकच थोपटत होते, त्याला चिमटे काढीत होते. गांधीजी म्हणाले, "या बालकाचे वडील नॉर्थवेस्ट (नैऋत्य) सरहद्दीच्या ब्रिटिश पलटणींत सार्जंट आहेत. त्यांना हिंदी माणसावर गोळ्या झाडण्याचा हुकूम करण्यांत आला होता. त्यांनीं साफ नाकारलें म्हणून त्यांना सोळा वर्षांची शिक्षा फर्मावण्यांत आली. आतां त्यांनीं सहा वर्षे सजा भोगिली. पण त्यांच्यावर दया दाखविण्यासाठीं इतके अर्ज करण्यांत आले होते कीं दोन वर्षांखालीं त्यांना सोडून देण्यांत आलें. ते आतां इथें आमच्याबरोबर रहात असतात." आम्हीं परत गांधीजींच्या घरापर्यंत चालत गेलों, आणि मी त्यांना तेथें सोडलें.

घराकडे परत जात असतां मी माझ्या समोरील घरापाशीं थांबलों. त्या ठिकाणीं गांधीजींचे एक सेक्रेटरी रहात असतात. माझ्या गांधीजींशीं मुलाखती चालत तेव्हां ते गांधीजींच्या शेजारींच बसत असत. ते अमळ काळसावळे असून बरेच ठेंगणे आहेत. पण चेहरा मात्र खूप मोठा आहे. ते गांधीजींच्या बरोबर आज चोवीस वर्षे काम करीत आले आहेत. ब्रिटिशांना हिंदुस्थानांत राहूं देण्याविषयींच्या माझ्या

गांधीजींशीं काल झालेल्या विवादासंबंधीं मी त्यांना त्यांचें मत विचारलें. तो विवाद मोठा मजेचा झाला असें त्यांचें मत पडलें. " हा वाद नवीन व अंमळ धक्का देणारा होता खरा. या युद्धापासून कांहीं एक निष्पन्न होईल असें मला वाटत नाहीं. कोणत्याही युद्धांत आम्हीं गुरफटले जातां कामा नये." हें त्यांचें म्हणणें त्यांनीं पुष्कळ वेळां बोलून दाखविलें. त्यांच्या विभूतितुल्य गुरूंच्या म्हणण्यावरही अगदीं मनमोकळी चर्चा होत होती. गांधीजींच्या निकटवर्ती सहकाऱ्यांवर त्यांचा दबाव होता असें मला मुळींच आढळलें नाहीं. नंतर मी या सेक्रेटरींचें नांव काय असें विचारलें. त्यांचें नांव किशोरलाल घनःशामलाल मश्रूवाला असें आहे. मधलें नांव हें एका देवाचें नांव आहे.

दुपारच्या भोजनवेळेपर्यंत मी टबांत बसून टंक करीत होतों.

जेवणाच्या वेळीं गांधीजी मला म्हणाले, " फिशर, मला तुमची कटोरी द्या पाहूं. मी तुम्हाला थोडी भाजी वाढणार आहें." " गेल्या दोन दिवसांत भोपळा व पालक यांच्या भाज्या चारवेळां खाल्ल्या असल्यानें मला आतां त्यांची गोडी राहिली नाहीं," मी म्हणालों. "म्हणजे तुम्हांला भाज्या आवडत नाहींत असंच ना तुमचं म्हणणं?" गांधीजींनीं विचारलें.

" या भाज्यांची मला चव पसंत नाहीं." मी उत्तर दिलें.

" अहो म्हणजे त्यांना अंमळ मीठ व लिंबाचा रस लावला कीं लागेल चव," त्यांनीं समजावून सांगितलें.

" म्हणजे मी माझी चव मारावी असेंच तुमचें म्हणणें आहे ना?" मी विचारलें.

" मुळींच नाहीं." ते हंसत हंसत म्हणाले. " रुची वाढवा."

" आपण एवढे भयंकर अहिंसावादी आहांत कीं एखाद्याच्या रुचीची हिंसा करण्याचेंसुद्धां आपल्या मनांत येत नाहीं."

" एवढ्या साध्या गोष्टीचीच जर लोक हिंसा करते तर माझी त्याला कांहीं हरकत नसती." गांधीजी म्हणाले.

मला खूप घाम आला होता. तो मी रुमाल घेऊन तोंडावरून व मानेवरून पुसून काढला. मग मी गांधीजींकडे वळून म्हणालों, " मी पुनः हिंदुस्थानांत आलों म्हणजे......" गांधीजी घास चावीत होते. त्यांचें लक्ष नसल्यानें मी स्वस्थ

बसलों. आपला चेहरा माझ्याकडे न फिरवितांच गांधीजी म्हणले, " बरं पुनः तुम्हीं हिंदुस्थानांत आलांत म्हणजे......"

" आपण एक सेवाग्रामांत समशीतोष्णी-करणाची ( Air Conditioning ) तजवीज केली पाहिजे किंवा व्हॉइसरॉयांच्या राजवाड्यांत तरी रहायला गेलां पाहिजे." मी बोलूं लागलों.

" ठीक तर मग. " ते म्हणाले. जसें कांहीं ते तसें करणारच होते.

दुपारचे जेवण झाल्यावर मी झोप काढली, नंतर मी माझी सकाळची गांधीजींशीं झालेली मुलाखत टंक करून काढली व मग सायमन कमिशनच्या जाडजूड रिपोर्टांतील कांहीं भाग वाचून काढले. हा रिपोर्ट पार्लमेंटपुढें १९३० च्या मेमध्यें सादर करण्यांत आला होता. पहिल्या पुस्तकांतील ५९ पानावर हा उतारा आहे :—

" सिंधमधल्या अल्पसंख्याक हिंदूंच्यामध्यें अशी कल्पना आहे कीं ब्रिटिश कमीशनरला दिलेलें स्वातंत्र्य हें फार व अनियंत्रित आहे, तर मुसलमानांना असें वाटतें कीं मुंबई इलाख्यांतून आपण फुटून निघूं तो सुदिन." अर्थात् ही विभक्त होण्याची मागणी कांहीं लोकांच्या घरांतून किंवा मुसलमान शेतकऱ्यांकडून आलेली नाहीं. ती आलेली आहे ती फक्त साऱ्या हिंदुस्थानांतील मुसलमान पुढाऱ्यांच्या कडून. कारण त्यांना असें वाटतें कीं एक नवीन मुसलमान इलाखा निर्माण झाला कीं आजूबाजूच्या मुख्यतः मुसलमान वस्ती असलेल्या बलुचिस्तान, नैऋत्य सरहद्दीवरील इलाखा, आणि पंजाब यांची एकी होईल व मग हिंदुराज्याच्या तटबंदीविरुद्ध कडेकोट बंदोबस्त व्हायला कांहीं हरकत पोहोंचणार नाहीं. "

आज दुपारीं मी हा वरील उतारा वाचूनच माझ्या गांधीजींच्या मुलाखतीस सुरुवात केली. मी म्हणालों कीं आपण जे सकाळीं म्हणालां कीं विभक्त होण्याची मागणी ही फक्त मुसलमान पुढाऱ्यांची असून ती जनतेची नाहीं याला हें वरील अवतरण पुष्टीच देत आहे. त्यांत मुसलमान जनतेला कांहींच गोडी नाहीं.

" अर्थातच." त्यांनीं जोर दिला.

"पण, " मी म्हणालों; "मुसलमान पुढाऱ्यांची भीति किती यथार्थ आहे नाहीं ? कदाचित् हिंदुराष्ट्र अधिक बलवान झालें तर आपलें किती नुकसान होईल हें मुसलमान जनतेपेक्षां या पुढाऱ्यांनाच अधिक चांगलें कळत असलें पाहिजे. हिंदूंनीं वरचष्मा केला नाहीं असें तुम्हीं निःपक्षपातीपणानें छातीठोक सांगूं शकाल का ? "

" कुठें कुठें असेल तसें. " गांधीजी म्हणाले, " कांहीं व्यक्ती तशा वागल्या असतील; त्यांचे विचार व कृति दोषार्ह असण्याचाही संभव आहे. पण मी असें खात्रीपूर्वक सांगूं शकेन कीं काँग्रेस किंवा सर्वसाधारण हिंदू जनता यांची सर्वाधिकार चालविण्याची मुळींच इच्छा नाहीं. दरेक इलाख्याला पूर्ण स्वायत्त स्वातंत्र्य मिळालेंच पाहिजे. मी स्वतः जबरदस्ती करणें व सत्ता गाजविणें यांच्या विरुद्ध आहें व प्रजेवर किंवा इतर संस्थानांवर जुलूम करणाऱ्या राज्यसत्तेवरही माझा विश्वास नाहीं. तेव्हां मी सत्ता गाजवूं इच्छितों हें शक्य तरी आहे का ? ही ओरडसुद्धां पुढाऱ्यांनींच निर्माण केलेली असून त्यामुळें जनतेवर अधिक सत्ता गाजवितां यावी अशी त्यांची इच्छा आहे. "

" मला काँग्रेसपार्टीसंबंधीं आणखी किती तरी प्रश्न विचारावयाचे आहेत. थोर थोर ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं मला सांगितलें आहे कीं काँग्रेस ही धनिक व्यापारी लोकांच्या ताब्यांत असून गांधीजींची चळवळसुद्धां याच मुंबईच्या गिरणीमालकांनींच उचलून धरलेली आहे. ते त्यांना लागेल तेवढा पैसा पुरवीत असतात. या म्हणण्यांत कितपत तथ्य आहे ? " मी विचारलें. " दुर्दैवानें ही गोष्ट खरी आहे. " गांधीजी साधेपणानें म्हणाले. " आपलें कार्य नेटानें चालविण्यासाठीं काँग्रेसपाशीं पुरेसा पैसा नाहीं. दरेक सदस्यापासून प्रतिवर्षी चार आणे ( जवळ जवळ आठ सेंट ) घ्यायचें आम्हीं ठरविलें होतें, आणि त्यावर चळवळ चालवायची; पण ही योजना चालू शकली नाहीं. "

" काँग्रेसच्या जमाखर्चाच्या पोटीं श्रीमंत हिंदी माणसांचा कितवा हिस्सा आहे ? " मी विचारलें. " खरें पाहातां साराच्या साराच. " ते म्हणाले, " या आश्रमांत सुद्धां—उदाहरणार्थ, आम्हीं रहातों आहोंत त्यापेक्षां कितीतरी अधिक गरिबीनें आणि काटकसरीनें आम्हाला रहातां येणें शक्य आहे. पण आम्हीं तसें करीत नाहीं आणि खर्च होणारा सारा पैसा हा आमच्या श्रीमंत मित्रांच्याकडूनच येत असतो. " " श्रीमंत व द्रव्यनिष्ठ वर्गापासूनच काँग्रेसला पैशाचा पुरवठा केला जातो यावरून असें म्हणतां येणार नाहीं का कीं काँग्रेसच्या राजकारणांत त्यामुळें बिघाड येतो ? " मी विचारलें. " एक प्रकारचा नैतिक दबाव निर्माण नाहीं का होत त्यामुळें ? "

" हं ! एक प्रकारचें मूक ऋण निर्माण होतें खरें त्यामुळें. पण श्रीमंतांच्या मतांचा मात्र आमच्या चळवळीवर कांहीं एक परिणाम होऊं शकत नाहीं. आम्हीं कदाचित् पूर्ण स्वातंत्र्य मागूं अशी त्यांना कधीं कधीं भीतीहि वाटते. "

"परवां," मी सांगूं लागलों, "मी हिंदुस्तान टाइम्समध्यें वाचलें कीं बिर्लांनीं आपल्या कापड गिरण्यांतील कामगारांचे आणखी पगार वाढविले आहेत. जीवनाचा खर्च अधिक वाढला असल्यानें त्यांनीं हा उपाय योजला आहे. तें वृत्तपत्र पुढें असें म्हणतें कीं इतर कोणत्याही गिरणीमालकांनीं अशी तरतूद अद्यापी केलेली नाहीं. हिंदुस्तान टाइम्स हें काँग्रेसचें वृत्तपत्र आहे."

"नाहीं," गांधी ठासून म्हणाले, "हें वृत्तपत्र सर्वस्वी बिर्लांच्या मालकीचें आहे." ते हंसले. "मला माहीत आहे," ते पुढें म्हणाले, "कारण माझा सर्वांत धाकटा मुलगा त्याचा संपादक आहे म्हणून होय!" त्यांतली दिलेली हकीकत अगदीं खरी खरी आहे. तरी पण हें पत्र कांहीं काँग्रेसचें पत्र खास नव्हे. काँग्रेसनें श्रीमंतांच्या पैशावर आपला व्यवहार चालू ठेवावा हें तुम्हीं म्हणतां त्याप्रमाणें दुर्दैवी आहे खरें. मी दुर्दैवी असा शब्द मुद्दाम वापरतों. त्यायोगें आमच्या धोरणाला कांहीं बाध येऊं शकत नाहीं." "ही बाबसुद्धां त्याचाच एक परिणाम आहे असें नाहीं का आपल्याला वाटत, कीं राष्ट्रीयत्वावर सर्वस्वी केंद्रीभूत झाल्यानें सामाजिक व आर्थिक बाबींना बगल मारण्यांत आली आहे." "नाहीं" गांधीजी म्हणाले, "काँग्रेसनें वेळोवेळीं आणि मुख्यतः पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालीं दीर्घदर्शी सामाजिक कार्यक्रम हातीं घेतले आहेत; त्याचप्रमाणें आर्थिक योजनाही हातीं घेतल्या गेल्या आहेत. या योजना तुम्हांला आणवून देण्याविषयीं मी तजवीज करवितों."

"पण हें सत्य नाहीं का?" मी चिकाटी न सोडतां म्हणालों, "पण या साऱ्या सामाजिक योजना प्रथम पूर्ण स्वातंत्र्याचा लाभ झाला म्हणजेच अंमलांत आणण्यासाठीं तयार केलेल्या आहेत त्या!"

"नाहीं." ते म्हणाले. "जेव्हां–म्हणजे (१९३७–३९ सालीं) काँग्रेस ही इलाख्याइलाख्यांतून अधिकारारूढ होती तेव्हां काँग्रेस मंत्रिमंडळानें कितीतरी सुधारणा अंमलांत आणल्या होत्या. आतां त्या ब्रिटिश राज्याधिकाऱ्यांनीं फेटाळून लावल्या आहेत. आम्हीं खेड्यापाड्यांतूनसुद्धां सुधारणा अंमलांत आणल्या होत्या, शाळांतून, शेतांतूनसुद्धां!"

"मला असें सांगण्यांत आलें आहे, आणि मी असें सायमन रिपोर्टांत वाचलें आहे कीं," मी म्हणालों, "हिंदुस्थानांतील हजारो शापांपैकीं एक

मुख्य शाप म्हणजे खेड्यापाड्यांतील सावकारांचा होय. खेडुत जन्मापासून तों मरेपर्यंत सावकारांच्या ऋणांतून मुक्तच होऊं शकत नसतो. युरोपियन राष्ट्रांमध्यें अशा सावकारांच्या उपद्रवापासून गरीब जनतेला सोडविण्यासाठीं खाजगी दानधर्म, व सरकार यांनीं खेडूत पेढ्या ( Land banks ) निर्माण केल्या. त्यांनीं सावकारांचें उच्चाटण केलें आहे. आपल्या किती तरी श्रीमंत मित्रांपैकीं कोणी अशा बँका कां नाहीं काढीत ? त्यांचें धोरण पक्कें व्यापारी असावें. पण फरक एवढाच कीं दरसाल दरशेंकडा चाळीस ते सत्तर टक्के व्याजाऐवजीं त्यांना दोन किंवा तीन टक्के व्याजावर संतुष्ट रहायला हवें ! त्यांचा पैसा नेहमीं सुरक्षित राहील, त्यांना थोडकाच फायदा मिळेल, पण त्यांना आपल्या राष्ट्राला मदत केल्याचें श्रेय मिळेल."

" अशक्य, " गांधीजी आवर्जून म्हणाले. " सरकारी कायद्याशिवाय हें साध्य होणें शक्य नाहीं. "

" कां बरें ?' मी जाब विचारला.

" कारण खेडूत हा उसना घेतलेला पैसा परत देणार नाहीं " ते म्हणाले.

" पण खात्रीनें," मी विचारूं लागलों, "खेडुताला कळून चुकेल कीं कर्जाऊ काढलेला पैसा परत करणें हें अधिक चांगलें, आणि आपलें जीवितच सावकाराला गहाण ठेवण्यापेक्षां दोन किंवा तीन टक्के व्याज देणें अधिक श्रेयस्कर असें ! "

" पैसा कर्जाऊ लावणें हा फार पुरातन धंदा आहे " ते सांगूं लागले, "आणि खेड्यापाड्यांतून त्याचीं पाळेंमुळें खूप खोल रुजलेलीं आहेत. आम्हीं स्वतंत्र झाल्याशिवाय तुम्हीं जें आम्हाला सांगतां तें साध्य करतां येणार नाहीं. "

" हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यास काय काय गोष्टी साध्य होतील बरें ?" " मी विचारलें. "गरीब खेडुतांचें जीवन सुधारावें याविषयीं आपल्यापाशीं काय काय योजना आहेत बरें ? "

" खेडुतांना आपापल्या जमिनी हव्या आहेत." त्यांनीं उत्तर दिलें. " त्या तुम्हीं घ्या असें सांगण्याची आवश्यकता रहाणार नाहीं. ते जमीन घेऊं शकतील."

म्हणजे शेतीच्या मालकांना जमिनीबद्दल मोबदला देण्यांत येईल ना ? " मी विचारलें.

" नाहीं," त्यांनीं उत्तर दिलें, "ही गोष्ट सरकारी तिजोरीच्या दृष्टीनें अशक्य आहे. "

" असें पहा " ते हंसत हंसत म्हणाले, " आमच्या कोट्याधीश मित्रांचे आम्ही ऋणी असल्यानें आम्हाला अशा गोष्टी बोलून दाखवायला दिक्कत वाटत नाहीं. दरेक खेडें म्हणजे एक स्वयंसिद्ध व स्वयंशासित घटक होईल. तें आपलें जीवन सुखासमाधानानें कंठूं शकेल."

" पण मग अर्थातच राष्ट्रीय सरकारही प्रस्थापित होईल कीं नाहीं ? " मी विचारलें.

" नाहीं, " त्यांनीं उत्तर दिलें.

" पण खात्रीनें तुम्हाला राष्ट्रीय सरकारची आवश्यकता भासणारच, म्हणजे रेलरस्ता चालू ठेवण्यासाठीं, तारायंत्रांच्यासाठीं, इत्यादि इत्यादि बाबींसाठीं." मी मुद्दा न सोडतां म्हणालों.

" हिंदुस्थानांतून रेलगाड्या हद्दपार झाल्या तर माझ्या डोळ्यांतून टिपूससुद्धां बाहेर पडणार नाहीं, " ते म्हणाले.

" पण त्यामुळें बिचाऱ्या खेडुतावर मात्र संकटपरंपरा कोसळेल." मी म्हणालों. " त्याला शहरांतील जिनसांची जरूरी पडेल, आणि त्याला आपलें धान्यधुन्य शहरांत नेऊन विकावें लागेल–दूर दूर अंतरावर नेऊन. खेड्यापाड्यांतून वीज आणि पाणी यांची सोय झाली पाहिजे. एखाद्या व्यक्तिजीवी खेड्याला **जलनिर्मित वीज** ( hydro electricity ) निर्माण करणें, किंवा सिंधमधील सक्कर बराजसारखी पाणीपुरवठ्याची प्रचंड योजना अंगिकारणें कसें शक्य होईल बरें ? "

" आणि ती योजना तरी काय ओंफसच झालेली आहेना ? " गांधीजी मध्येंच म्हणाले. " त्यामुळें सारा इलाखा कर्जबाजारी झाला आहे. "

" तें मला माहीत आहे, " मी म्हणालों, " पण त्यामुळें किती तरी नव्या जमिनी शेतीच्या कामीं उपयोगिल्या जात आहेत. आणि लोकांचा त्यापासून फायदाच झालेला आहे. "

" मला आतां पटूं लागलंय कीं, मी किती जरी विरुद्ध असलों तरी मध्यवर्ती सरकार निर्माण झाल्याशिवाय रहाणार नाहीं, " गांधीजी म्हणाले, " मला तुमची चालू असलेली पाश्चिमात्य लोकसत्ताक पद्धती बिलकूल पसंत नाहीं. त्याचा अर्थ एवढाच कीं, पार्लमेंटच्या प्रतिनिधीसाठीं सर्वत्र मतें गोळा करणें हा होय. "

मला हा वादविवाद पुढें चालविण्याची फार इच्छा होती म्हणून मी म्हणालों, " हिंदुस्थाननें या बाबतींत काय करावें असें आपलें म्हणणें आहे ?" मी विचारलें.

" हिंदुस्थानांत ७,००,००० ( सात लाख ) खेडीं आहेत. दरेक खेड्यांतील लोकांच्या इच्छेनुसार त्याचा बंदोबस्त करण्यांत येईल. त्या साऱ्यांना मतदानाचा अधिकार असेल. म्हणजे चाळीस कोटी मतांऐवजीं फक्त सात लाखच मतांची नोंदणी होईल. म्हणजे सोप्या भाषेंत सांगायचें तर दरेक खेड्याला एक मत मिळेल. हीं खेडीं आपलें जिल्हासरकार नेमील आणि जिल्हासरकारें इलाखासरकार नेमतील, आणि हीं इलाखासरकारें आपल्या परीनें एक अध्यक्ष नेमतील आणि हा अध्यक्षच राष्ट्रीय सरकारचा मुख्य कार्यवाह ( executive ) होईल.

" म्हणजे ही बहुतांशीं सोव्हिएट पद्धतीच झाली म्हणायची. " मी म्हणालों.

" मला हें माहीत नव्हतें," गांधीजींनीं कबूल केलें.

" माझी त्याला कांहीं हरकत नाहीं. "

" बरें मग गांधीजी, मला आपल्याला काँग्रेससंबंधीं आणखी एक प्रश्न विचारायचा आहे. विचारूं ? काँग्रेस ही एक **हुकुमशाही** ( authoritarian ) अधिकार गाजविणारी संस्था आहे असा तिच्यावर आरोप आहे. दोघा ब्रिटिश ग्रंथकारांनीं शुस्टर आणि विंट यांनीं " हिंदुस्थान व लोकसत्ताक पद्धती " यावर नवीन ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांनीं असा आरोप केला आहे कीं जे १९३९ सालीं काँग्रेस मंत्रिमंडळांनीं भराभर राजीनामे दिले ते त्यांनीं स्वतःच्या इच्छेनुसार दिलेले नसून काँग्रेसच्या जिल्हानिहाय हुकुमशहांच्या हुकुमानें दिले होते. "

" हा शुद्ध गाढवपणा आहे. " गांधी ठासून म्हणाले, " तुम्हाला असें वाटतें काय कीं साऱ्या प्रश्नांचे निर्णय हाउस ऑफ कॉमन्समध्यें घेतले जात असतात किंवा पार्टी सभांत किंवा लंडनच्या क्लबांतून घेतले जात असतात म्हणून ? काँग्रेसचे अधिकारी हे काँग्रेस सभासदांकडून निवडून दिले जातात आणि काँग्रेस मंत्री हे काँग्रेसचे सभासद असल्यानें त्यांचें काँग्रेसच्या तत्त्वानुसार वर्तन घडत असतें. सर सॅम्युएल होअर यांनीं मला ब्रिटनमधील लोकसत्ताक कार्यपद्धतीच्या कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत. "

" ते तुमचे अगदीं लाडके ब्रिटिश मुत्सद्दी आहेत वाटतें," मी खोंच मारली. यामुळें खूपच हंशा पिकला.

" निदान एवढें खरें," गांधीजी म्हणाले, "कीं ते काय म्हणतात हें मला चांगलें समजतें. पार्लमेंटची लोकसत्ताक पद्धती कांहीं लांचलुचपतीपासून अलिप्त नाहीं. तुम्हाला सुद्धां टॅमाने हॉल व शिकॉगोचा मेयर यांची हकीकत माहीतच आहे कीं; तुम्हांला हें कांहीं नवीन नाहीं!"

"मला नाहीं वाटत कीं स्वतंत्र हिंदुस्थान जगांतील इतर राष्ट्रांप्रमाणें वागेल असें. आम्हाला आमची अशी कांहीं स्वतंत्र रूपरेखा आहेच."

मला सुभाषचंद्र बोसविषयीं कांहीं थोडें बोलावयाचें आहे असें मी सांगितलें. ते हिंदी पुढारी हिंदुस्थानांतून निसटून गट राष्ट्रांना जाऊन मिळाले होते. गांधीजींनीं बोसच्या आईला ते हवाई जहाजाच्या अपघातांत वारल्याची बातमी आल्यानंतर दुखवट्याची तार केली होती, ती हकीकत वाचून मला फार वाईट वाटल्याचें मी त्यांना सांगितलें. अर्थात् ही बातमी आतां खोटी ठरली म्हणा.

" म्हणजे मी खोट्या बातमीवर विश्वास ठेवला असें तुमचें म्हणणें आहे कीं काय?"

" नाहीं," मी म्हणालों. "आपला देश सोडून जो फॅसिस्ट जर्मनीला जाऊन मिळाला तो वारल्याबद्दल आपल्याला दुःख झालें म्हणून."

" बरोबर." गांधीजी आवर्जून म्हणाले, 'याचें कारण असें कीं मी बोसनां साऱ्या राष्ट्रवीरांचा वीर समजतों. त्यांचा मार्ग चुकला असेल. त्यांचा मार्ग चुकला अशी माझी खात्री आहे. मी किती वेळां तरी बोसनां विरोध केला होता. दोन वेळां त्यांना मी कॉंग्रेसचे अध्यक्ष होऊं दिलें नाहीं. माझे विचार त्यांच्या विचारांहून भिन्न असले तरी अखेरीस ते अध्यक्ष झालेच. पण समजा ते रशियांत किंवा अमेरिकेंत गेले असते,–हिंदुस्थानला मदत मागण्यासाठीं–म्हणजे तें त्यांचें करणें आतांच्यापेक्षां अधिक चांगलें झालें असतें का?"

" होय, अर्थातच " मी म्हणालों. " आपण कोणाकडे जातों यांत फरक आहेच कीं नाहीं. "हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं मला कोणाच्याही मदतीची अपेक्षा नाहीं." गांधीजी घोषणा करीत म्हणाले. "हिंदुस्थाननें आत्मसंरक्षण करावें हें मला हवें आहे."

" साऱ्या इतिहासभर," मी आठवण देत म्हणालों, " राष्ट्रांनीं आणि व्यक्तींनीं परराष्ट्रांना मदत केलेलीं उदाहरणें आढळून येतात. लफायेत हा फ्रान्समधून अमेरिकेला ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामीं मदत करण्यासाठीं धावलाच.

हजारों अमेरिकन व परदेशी लोक स्पेनमध्यें स्पॅनिश लोकसत्ताक राष्ट्र वांचविण्या-साठीं कामास आले."

"व्यक्तींनीं; कबूल!" गांधीजी म्हणाले. "पण अमेरिका इंग्लंडचा स्नेही बनून आम्हाला गुलामगिरींत दडपीत आहे. हीं लोकसत्ताक राष्ट्रें फॅसिस्ट राष्ट्रांचा पराभव करून जगाची सुधारणा करतील अशी मला खात्री वाटत नाहीं. ते स्वतःच फॅसिस्ट सारखे बनण्याचा संभव अधिक."

मी म्हणालों, "या ठिकाणीं, मी परवांच आपल्याला सांगितल्याप्रमाणें आपल्याशीं असहमत होण्यासाठीं आपण सहमत झालें पाहिजे. हिंदी लोकांनीं आपल्या स्वातंत्र्यावर केंद्रीभूत होऊन इतर सामाजिक प्रश्नांची त्यांनीं हेळसांड करावी हें मला अत्यंत निराशाजनक आहे असें वाटतें. हा एक दोष आहे. बोस हे तरुण गृहस्थ असून अद्भुत नाटयक्रिया घडवून आणण्याकडे त्यांचा कल असणें अगदीं स्वाभाविक आहे. पण समजा ते स्वतः जर्मनीच्या फॅसिस्ट भुलावणीला भुलून जाऊन फॅसिस्ट बनले आणि ते हिंदुस्थानांत परत येऊन त्यांनीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळ-वून दिलें तरी मला वाटतें कीं ब्रिटिश राज्यव्यवस्थेंतल्यापेक्षां तुमची स्थिति अधिक केविलवाणी होईल."

"ब्रिटिश राज्यव्यवस्थेंत जोरकस फॅसिस्ट महातत्त्वें आहेतच," गांधीजी सांगूं लागले, "आणि हिंदुस्थानांत या तत्त्वांचा उपयोग केलेला आम्हीं रोजच्या रोज अनुभवीतच आहोंत. जर ब्रिटिशांना हें महायुद्ध जिंकण्यासाठीं आपले हक्क प्रस्थापित करावयाचे असतील किंवा त्यांना जग सुधारावयाचें असेल तर त्यांनीं आपली सत्ता हिंदुस्थानच्या सुप्रत करून आधीं आत्मशुद्धि करून घ्यावी. तुमचे अध्यक्ष," गांधीजी हलक्या आवाजांत सांगूं लागले "चार प्रकारच्या स्वातंत्र्याविषयीं बोलत असतात, या स्वातंत्र्यांत स्वतंत्र होण्याची बाब सामील आहे का? आम्हाला जर्मनींतल्या, इटालींतल्या आणि जपानांतल्या लोकसत्तेसाठीं लढायला सांगतात. जी गोष्ट आमच्या स्वतःपाशीं नाहीं तिच्यासाठीं लढत सुटायचें म्हणजे काय?"

या सुमारास इंटरनॅशनल न्यूजसर्वीसचे चॅप्लिन व टाइम अँड लाइफचे बेल्डेन हे अगाऊ वेळ ठरविल्याप्रमाणें येऊन दाखल झाले. हे किती तरी वर्षे चीनमध्यें राहिले असून जनरल स्टिलवेलबरोबर ब्रह्मदेशांतून रखडत रखडत हिंदुस्थानांत

येऊन पोहोंचले होते. ते झोंपडींत आले त्यावेळीं त्यांच्या अंगावर शर्ट, शॉर्ट (अर्धी) विजार व पायांत बूट असा त्यांचा वेष होता. गांधीजींशीं मुलाखत घेण्यासाठीं ते वेळ ठरवून आलेले होते. त्यांचें संभाषण ऐकावयाचें असेल तर खुशाल थांबा असें गांधीजींनीं मला सांगितलें. नंतर ते त्यांच्याकडे वळून म्हणाले, "तुम्हांला जमिनीवर बसतां येईल ना ?" ते खालीं जमिनीवर बसल्यावर गांधीजी म्हणाले, "एक अमेरिकन माझी चिरेफाड करतोच आहे. आतां मी आपल्या सेवेला हजर आहें." ते त्यांच्याशीं अर्धा एक तास बोलले असतील. नंतर मी त्यांना माझ्या झोंपडीकडे बरोबर घेऊन निघालों. त्यांना मी गार पाणी पिण्यास दिलें, आणि त्यांनीं माझ्या टबांतलें गार पाणी अंगावर शिंपडून घ्यावें म्हणून गळ घातली.

दुपारच्या वेळीं महादेव देसाई–म्हणजे गांधिजींचे अत्यंत प्रमुख सेक्रेटरी यांनीं गांधीजींनीं माझ्या प्रश्नांना दिलेलीं उत्तरें आणलीं. हे प्रश्न मी काल त्यांच्याच विनंतीवरून दिलेले होते. हीं उत्तरें दोन मोठ्या तावावर टंक केलेलीं होतीं. त्यांवर गांधीजींनीं स्वहस्तें शोध केलेले होते.

माझ्या पुढील पत्रांत हे प्रश्न सामील करण्यांत आलेले होते.

" प्रिय मिस्टर गांधी,

गेल्या कांहीं दिवसांच्या आपल्या संभाषणाच्या आधारावर मी पुढील कांहीं प्रश्न आपल्यापुढें मांडण्याची मोकळीक घेत आहें. त्यांना आपण सविस्तरपणें उत्तरें द्याल अशी मी आशा करतों.

१. आपण ब्रिटिश गव्हर्मेंटला इथून ताबडतोब चालते व्हा अशी मागणी करीत आहांत. त्यानंतर हिंदी जनता राष्ट्रीय सरकार निर्माण करील काय ? मग कोणते गट किंवा पक्ष असल्या या हिंदी सरकारांत सामील होतील ?

२. हिंदी राष्ट्रीय सरकार संयुक्त राष्ट्रांना हिंदी भूमीचा जपानच्या आणि इतर गट राष्ट्रांच्या विरुद्ध चालू होणाऱ्या युद्धासाठीं प्रस्थानभूमी म्हणून उपयोग करूं देईल काय ?

३. आणखी कोणकोणती मदत संयुक्त राष्ट्रांना गट राष्ट्रांच्या विरुद्ध युद्ध चालविण्यासाठीं देण्यास हिंदी राष्ट्रीय सरकार तयार होईल !

४. आपला असा विश्वास आहे का, कीं हिंदुस्थान आणि संयुक्त राष्ट्रें यांचें सहकार्य साधावयाचें असल्यास तो सख्यसंबंध ( Alliance ) तहानें ठरविण्यांत यावा किंवा एकमेकांना मदत करण्याच्या करारानें ठरविण्यांत यावा ?

लुई फिशर कडून

अत्यंत आदरयुक्त मांडले गेले आहेत.

गांधीजींच्या उत्तरावर महत्त्वाचे प्रश्न असा शेरा मारण्यांत आला होता. त्यांचीं उत्तरें अशीं होतीं :

माझे एक मित्र माझ्या नव्या योजनेच्या अर्थाविषयीं मला विचारीत होते. पण नुस्ता वादविवाद शुष्क व अव्यवस्थित होऊं लागला तेव्हां मी त्यांना प्रश्न व्यवस्थितपणें मांडण्यास सांगितलें. त्यांचीं उत्तरें मी हरिजनमध्यें देईन असें मी वचन दिलें होतें; त्यांना माझें म्हणणें कबूल झालें आणि त्यांनीं खालीलप्रमाणें प्रश्न विचारले.

**प्रश्न १.** आपण ब्रिटिश गव्हर्मेंटला इथून ताबडतोब चालतें व्हावें अशी मागणी करीत आहांत. त्यानंतर हिंदी जनता राष्ट्रीय सरकार निर्माण करील काय ? मग कोणते गट किंवा कोणते पक्ष असल्या या हिंदी सरकारांत सामील होतील ?

**उत्तर :**—माझी मागणी एकतर्फी आहे. म्हणजे हिंदी लोक कांहींही करोत वा न करोत, त्यांच्याकडे मुळींही न बघतां ब्रिटिशांनीं ताबडतोब कार्यास सुरुवात करावी. ते इथून निघून गेल्यावर कांहीं काळपर्यंत येथें अराजकता माजेल हेंही गृहीत धरायला मी तयार आहें. पण त्यांनीं नीट व्यवस्थेनें येथून पाऊल उचललें तर त्यांच्या पश्चात इथें आजच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांमधून कामचलाऊ सरकार निर्माण होईल हें संभवनीय आहे. पण दुसरी एक गोष्ट होण्याचाही संभव आहे. ज्या कोणाला राष्ट्रीयत्वाची बिलकूल कल्पना नाहीं पण स्वार्थ मात्र ज्यांचा चांगलाच बोकाळलेला आहे, अशीं माणसें अधिकाराच्या जागा बळकावण्यासाठीं पुढें सरसावतील. ते भांडकुदळ लोकांना एकत्र गोळा करतील व त्यांच्या साहाय्यानें कुठें तरी आणि कशी तरी आपली सत्ता प्रस्थापित करतील. पण मला अशी उमेद आहे कीं, ब्रिटिश सत्तेचें शेवटचें पाऊल प्रामाणिकपणें बाहेर पडलें म्हणजे शहाण्यासुर्त्या राष्ट्रीय पुढाऱ्यांना आपल्या अंगावरील जबाबदारी पूर्णपणानें ओळखणें शक्य होईल, ते आपसांतले मतभेद तात्पुरते तरी विसरून जातील व तेच ब्रिटिश

सत्तेनें मागें सोडलेल्या मालमसाल्यांतून चलाऊ सरकार स्थापन करतील. कोणाही एखाद्या गटाला किंवा पक्षाला किंवा व्यक्तीला लोकसभेंत येऊं देणें किंवा न देणें या गोष्टींचें योग्य नियंत्रण करणारी कोणतीही शक्ति प्रस्थापित झालेली नसल्यानें संयमनच पुढील मार्ग दाखवूं शकेल. तें तसें झालें तर काँग्रेस, [मुस्लिम] लीग आणि संस्थानांचे प्रतिनिधी यांना राज्य चालविण्यास सांगण्यांत येईल आणि हेच प्रतिनिधी चलाऊ सरकार निर्माण करण्याविषयीं कांहीं तरी निर्णय ठरवितील. तूर्त तरी हे सारे कल्पनातरंग आहेत, यापेक्षां अधिक कांहीं नाहीं, हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

**प्रश्न २.** हिंदी राष्ट्रीय सरकार संयुक्त राष्ट्रांना हिंदी भूमीचा जपानच्या आणि इतर गट राष्ट्रांच्या विरुद्ध चालू होणाऱ्या युद्धासाठीं प्रस्थानभूमी म्हणून उपयोग करूं देईल काय?

**उत्तर :**—राष्ट्रीय सरकार निर्माण झालें आणि तें माझ्या अपेक्षेप्रमाणें तयार झालें असें आपण गृहीत धरलें तर त्या सरकारचें पहिलें कार्य म्हणजे चढाई करून येणाऱ्या राष्ट्रांच्या विरुद्ध, संरक्षक युद्ध चालविण्यासाठीं संयुक्त राष्ट्राबरोबर तहनामा करायचा. हिंदी राष्ट्रांचा फॅसिस्ट राष्ट्रांशीं कसल्याही प्रकारचा संबंध नसल्यानें हें सार्वजनिक कार्य आहे म्हणून संयुक्त राष्ट्रांना मदत करण्याची नैतिक जबाबदारी हिंदुस्थानावर आपोआपच येऊन पडते.

**प्रश्न ३.** आणखी कोणकोणती मदत संयुक्त राष्ट्रांना गट राष्ट्रांच्या विरुद्ध युद्ध चालविण्यासाठीं देण्यास हिंदी राष्ट्रीय सरकार तयार होईल?

**उत्तर :**—या काल्पनिक राष्ट्रीय सरकारचीं राज्यसूत्रें हलविण्याच्या कामीं माझा जर हात असला तर संयुक्त राष्ट्रांना हिंदी भूमीवर राहूं देण्याच्या कामीं कांहीं विवक्षित बंधनाखालीं सहिष्णुता दाखवायची यापेक्षां अधिक मदत मिळणार नाहीं. त्यामध्यें अर्थातच एखादा इसम व्यक्ति या नात्यानें मदत करण्यास तयार झाल्यास—जसे लढाईंत शिपायी म्हणून किंवा द्रव्य देऊन—राष्ट्रीय सरकारची त्याला कांहीं हरकत असणार नाहीं. ब्रिटिश सत्ता इथून अस्त झाल्याबरोबर हिंदी सैन्य बरखास्त करण्यांत येईल हें निर्विवाद समजावें. राष्ट्रीय हिंदी सरकारच्या कार्यकारी मंडळांत मला कांहीं अधिकार असेल तर तिची सारी शक्ति, तिचें सारें वजन आणि तिची सारी द्रव्यसंपत्ती या साऱ्यांचा उपयोग जगांत सलोखा व शांतता प्रस्थापित कर-

ण्यासाठीं केला जाईल. पण अर्थातच राष्ट्रीय सरकार निर्माण झाल्यानंतर माझा आवाज कदाचित् अरण्यरुदित होण्याचाही संभव आहे आणि राष्ट्रीय हिंदुस्थानच्या डोक्यांतही युद्धाचें वेड थैमान घालूं लागण्याचा संभव आहे.

**प्रश्न ४.** हिंदुस्थान आणि संयुक्त राष्ट्रें यांचें सहकार्य साधावयाचें असल्यास तो सख्यसंबंध ( Alliance ) तहानें ठरविण्यांत यावा किंवा एकमेकांना मदत करण्याच्या करारानें ठरविण्यांत यावा ?

**उत्तर :** मला वाटतें कीं हा प्रश्न फारच अकालिक ( Premature ) आहे. तरीसुद्धां दोहोंचे हितसंबंध तहानें किंवा करारानें जोडले गेल्यास माझी कांहींच हरकत नाहीं. मला त्यांत मुळींच कांहीं फरक दिसत नाहीं. मला माझे विचार संकलित करून मांडूं द्या. मला फक्त एकच गोष्ट पोक्त व टिकावू अशी वाटते. एवढ्या मोठ्या तेजस्वी राष्ट्राची शरणागती आतां थांबविलीच पाहिजे. हा राष्ट्रांचा प्रश्न नाहीं कीं लोकांचा प्रश्न नाहीं.–तरच संयुक्त राष्ट्रांना खात्रीनें या महायुद्धांत यशःप्राप्ती होईल. त्यांच्याकडे नैतिक भूमिकेचा अभाव आहे. फॅसिस्ट, नात्सी किंवा हीं संयुक्त राष्ट्रें यांच्यामध्यें मला मुळींच कांहीं फरक दिसत नाहीं. सारेच लुटारू आहेत. सारेच दंडेलीचा अवलंब करतात. आपला हेतु साध्य करण्यासाठीं ते वाटेल तो अन्याय करण्यास मागें पुढें पहात नाहींत. अमेरिका आणि ब्रिटन हीं अत्यंत मोठीं राष्ट्रें आहेत पण त्यांच्या मोठेपणाची किंमत आफ्रिकन किंवा एशियाटिक मूक जनतेला गुलामगिरींत डांबून ठेवल्यानें कवडीमोल ठरत आहे. त्यांच्याच हातीं आपण केलेल्या चुकांचें परिमार्जन करण्याची शक्ति आहे. जोंपर्यंत त्यांनीं आपले स्वतःचे घाणीनें बरबटलेले हात स्वच्छ धुतले नाहींत तोंपर्यंत त्यांना मानवी स्वातंत्र्याविषयीं बोलण्याचा हक्क पोहोंचतच नाहीं. आणि या हात धुण्यानेंच त्यांना या युद्धांत खात्रीनें यश मिळण्याचा संभव आहे. कारण कोट्यावधि मूक एशियाटिक किंवा आफ्रिकन जनतेचे आशीर्वाद–अनुच्चारित पण अंतःकरणपूर्वक–त्यांना मिळूं शकतील.

तेव्हांच–पण तोंपर्यंत नव्हे–जगांत नवयुग प्रस्थापित करण्यासाठीं युद्ध करणें शोभेल. ही वास्तवता आहे. इतर साऱ्या गोष्टी म्हणजे सट्टेबाजी आहेत. माझ्या सदिच्छेची परीक्षा म्हणूनच मी या गोष्टींचा विचार केला आहे. माझी योजना मूर्तस्वरूपांत मांडावी हाही एक उत्तरें देण्यांत माझा हेतू होताच.

**मो. क. गांधी**

# जून ६, १९४२

( हीं प्रश्नोत्तरें जून १४, १९४२ च्या हरिजनांत प्रसिद्ध झालेलीं आहेत. )

आज जेवण्याच्या वेळीं गांधीजींनीं मला विचारलें, अप्टन सिंक्लेअरची ओळख आहे का म्हणून. सिंक्लेअर काय करीत असतात हें जाणण्याची त्यांची इच्छा होती. अधून मधून सिंक्लेअरनीं लिहिलेलीं पुस्तकें त्यांना वाचण्यासाठीं पाठविलीं जातात. पण तीं वाचण्यास त्यांना बिलकुल वेळ मिळत नाहीं. त्यांचा एकमेकांचा पत्रव्यवहारही होता. अमेरिकन सामाजिक विचारप्रणालीवर सिंक्लेअरचें एक प्रकारचें हितकारक वजन असावें असें गांधीजींचें मत होतें.

माझ्या जेवणाकडे गांधीजींचें लक्ष होतें. ते म्हणाले, "अजूनसुद्धां तुम्हाला आमच्या भाज्या आवडत नाहींत ना?"

"मला आपल्याबद्दल, एक माणूस, पुढारी, आणि मुत्सद्दी या नात्यानें फारच आदर वाटतोय खरा पण बल्लवाचार्य म्हणून नव्हे." प्रत्येक जेवणाला ही भोपळ्याची आणि पालकची भाजी माझ्या पानांत वाढली जात होती मी सेवाग्राममध्यें असेतों-पर्यंत. पण मला ती पालेभाजी खाऊन खाऊन अगदीं वीट आला होता.

माझ्या दोन मुलांविषयीं त्यांनीं मला प्रश्न विचारला. त्यावरून मला वाटलें कीं ते माझें "मेन् अँड पॉलिटिक्स" ( जनता व राजनीति ) हें पुस्तक वाचीत असले पाहिजेत. कांहीं मांजरें येऊन टेबलाखालीं खेळूं लागलीं होतीं. या टेबलावर खाद्य-पदार्थांनीं भरलेलीं उघडीं भांडीं ठेवण्यांत आलीं होतीं. मी गांधीजींना म्हणालों, "मी सन १९३८ सालीं मि. लॉइड जॉर्ज यांना चर्ट येथें भेटलों तेव्हां त्यांनीं मला आपल्याविषयीं सांगितलें."

"होय?" गांधीजी मोठ्या उत्सुकतेनें विचारूं लागले, "काय म्हणाले ते तुम्हाला?"

"आपण त्यांना चर्ट येथें भेटण्यास गेल्यावेळीं त्यांच्या कोचावर आपण मांडी घालून बसलांत. आणि कोठून तरी एक काळें मांजर तिथें आलें नि आपल्या मांडीवर बसून गेलें."

"अगदीं बरोबर आहे," गांधीजी म्हणाले. "आपण तेथून गेल्यावर, लॉइड जॉर्ज म्हणाले," मी सांगूं लागलों, "तें मांजर एकाएकीं अदृश्य झालें नि पुनः कोणालाही तें दिसलें नाहीं."

"अरे वा !" गांधीजी म्हणाले. "हें मला माहीत नव्हतें."

"लॉइड जॉर्ज सांगूं लागले," मी म्हणालों, "मिस स्लेड मला चर्ट येथें भेटायला आल्यावेळीं पुनः आपलें तें मांजर तिथें हजर !"

"हें सुद्धां मला माहीत नव्हतें," गांधीजी म्हणाले. त्यांनीं लॉइड जॉर्जविषयीं अत्यंत गौरवपर शब्द वापरले. मी त्यांना सांगितलें कीं, लॉइड जॉर्जनीं मला सिगारेट किंवा सिगार ओढण्याविषयीं आग्रह केला. पण मीं तंबाखू ओढीत नसल्यानें मी त्यांच्या देणगीचा स्वीकार केला नाहीं. तेव्हां त्यांनीं मला अलकोहोल पिण्याविषयीं पाचारण केलें; पण मी दारू घेत नसल्यानें त्याचाही मी स्वीकार करूं शकलों नाहीं. तेव्हां मला लॉइड जॉर्ज म्हणाले, "कोणतेंही व्यसन नाहीं ?" मी उत्तर दिलें, "निदान बाहेर दिसेल असलें तरी नाहीं." लॉइड जॉर्ज म्हणाले, "मला सर्व प्रकारचीं दृश्य, अदृश्य व्यसनं आहेत. आणि त्याचमुळें वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी मी असा टणटणीत आहें." गांधीजी खूप वेळपर्यंत हंसले. नंतर मी गांधीजींना सांगितलें कीं दुपारचें जेवण झाल्यावर मी लॉइड जॉर्ज यांच्याबरोबर कॉरिडोरमधून चालत दिवाणखान्यांत येऊन पोहोंचलों. या कॉरीडोरमध्यें गेल्या जागतिक युद्धांत फ्रान्समध्यें ब्रिटिश सैन्याचे मुख्य सेनापति असलेल्या जनरल हेग यांच्या फोटोचें मोठें केलेलें चित्र टांगण्यांत आलें होतें. हेगच्या बुटांकडे बोट दाखवून लॉइड जॉर्ज म्हणाले, या इथंच ( बुटांचीं ) हेगची मोठी चमक दिसत असे. गांधीजी पुनः हंसले. चर्चिलबद्दल लॉइड जॉर्जांचें काय म्हणणें होतें हें त्यांनीं मला विचारलें. मी सांगितलें कीं मी जेव्हां १९४१ च्या उन्हाळ्यांत त्यांना पुनः भेटलों तेव्हां हा प्रश्न मी लॉइड जॉर्जनां केला होता. मी चर्चिलच्या अंगांत धडाडी कां नाहीं असा सरळ सवाल केला. धडाडी नाहीं, कीं एखादें अचाट कृत्य करण्याचीही त्यांची तयारी नाहीं. लॉइड जॉर्जनीं एका शब्दांत त्याचें उत्तर दिलें. "गॅलिपोली." त्या ठिकाणच्या भयंकर आघातानें त्यांच्यांतील अचाट कृत्याविषयींची रुचीच पार नाहींशी झाली, असें लॉइड जॉर्जनीं उत्तर दिलें. पहांटेच्या एक वाजेपर्यंतच्या संभाषणानंतर—कारण त्यांना मला भेटण्याला रात्रीशिवाय मोकळा असा वेळच नव्हता—लॉइड जॉर्जनीं घरांतील यच्चयावत नोकर-मंडळींना माझ्या भेटीसाठीं आणून मला अभिवादन करण्यासाठीं माझ्यापुढें उभें केलें. त्याचें मला फार कौतुक वाटलें असें गांधीजी म्हणाले.

## जून ७, १९४२

कालचें वर्तमानपत्र वाचून झाल्यावर मी रात्रीं आठ वाजतांच झोपीं गेलों. या ठिकाणच्या लोकांना वर्तमानपत्रें वाचण्याचें फारसें महत्त्व वाटत नाहीं आणि सेवाग्राममध्यें रेडिओसुद्धां नाहीं. हिंदी लोकांत नेहरूसारखे कांहीं अपवाद आहेत हें खरें—ते आपल्या देशांत आंतल्या आंतच रहात असतात. महायुद्ध आणि बाहेरचें जग त्यांच्यापासून फारच दूर आहे. हाही एक ब्रिटिश राज्यव्यवस्थेचा अपराधच आहे असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. हिंदी लोक पहिल्यानें इंग्लंडकडे पहातात आणि मग अर्थातच हें चित्र त्यांच्या नित्यनजरेखालीं असल्यानें बाह्यजग नि युद्ध याकडे लक्ष पुरविण्यास त्यांना अवकाशच मिळत नाहीं. मी खूप वेळपर्यंत झोंपून गेलों. रात्र बहुतेक थंडच होती व बरीच उत्साहवर्धक होती. चवथीच्या चंद्राची कोर आणि खूप लखलखीत आकाशगंगा!

### जून ७, १९४२.

गांधीजींचा पुतण्या कनु देसाई यांनीं काल घेतलेलीं छायाचित्रें (फोटोग्राफ्स) चांगलीं निघालीं नाहींत. कारण फिल्म फार जुनी झालेली होती. म्हणून मी दाढी करून गांधीजींच्याकडे जाण्यास निघालों. ते पुनः अंब्याचा रस एका भांड्यांतून पळी पळी भरून वाढीत असलेले मला आढळले. त्यांची पत्नी त्यांना वारा घालीत होती. रात्रीं झोंप कशी काय लागली असा त्यांनीं मला प्रश्न केला. रात्रीं फार छान झोंप लागल्याचें मी त्यांना सांगितलें, व आपल्याला कशी काय झोंप लागली असा मी त्यांना उलट प्रश्न विचारला. ते म्हणाले मी नेहमीं साडेनऊ ते पहांटे साडेचार वाजेपर्यंत झोंप काढतों.

"अगदीं कांहीं एक अडथळा न येतां?" मी विचारलें.

"नाहीं," त्यांनीं उत्तर दिलें. एक दोन वेळां मधून मधून थोडीशी जाग येते. पण पुनः झोंप लागण्यास फारसा अवधि लागत नाहीं. त्यांतून मी नेहमीं दुपारचा अर्धा एक तास झोंप काढतोंच. चर्चिलसुद्धां असेंच करीत असतात असें मी त्यांना सांगितलें. "मी असें ऐकलें आहे," ते सांगूं लागले "कीं युरोपमध्यें याची आस्ते आस्ते प्रथाच पडत चालली आहे. वृद्धपणीं त्याची फार आवश्यकता असते खास." "लोक असें सांगतात कीं," मी सांगूं लागलों "रुझवेल्ट यांना अंथरुणावर पडतां-

क्षणींच गाढ झोंप लागते." रुझवेल्टची प्रकृती कशी आहे व मिसेस रुझवेल्ट यांचा स्वभाव वगैरे कसा काय आहे वगैरे गोष्टींचें वर्णन करून सांगण्यास त्यांनीं मला विनंती केली.

अमेरिकन राजकारणावर त्यांचा कांहीं प्रभाव आहे किंवा नाहीं, असाही त्यांनीं मला प्रश्न केला. मी एकंदर सामाजिक कायद्यांची प्रगती, ट्रेड यूनियन ऑर्गेनायझेशन आणि सामाजिक विचारसरणी **न्यू डील** ( नव्या प्रथे )च्या प्रभावानें कशी बनली याचें वर्णन केलें. मीं याही गोष्टीवर भर देऊन सांगितलें कीं अमेरिकन सरकार परदेशीय सरकारांना द्रव्यसहाय्य करीत असून स्वदेशांतील युद्धविषयक उद्योगधंद्यासही सढळ हातानें द्रव्यसहाय्य करीत आहे. गेल्या जागतिक महायुद्धाच्या वेळीं खाजगीरीत्या परदेशीय सरकारांना व अमेरिकन उद्योगधंद्यांना होणारें द्रव्यसहाय्य यांचें तुलनात्मक चित्रही मी रेखाटलें.

" निग्रोच्या विषयीं आपलें काय म्हणणें आहे ? " गांधीजींनीं प्रश्न केला.

उत्तरेकडे व दक्षिणेकडे चालू असलेल्या निग्रो चळवळीविषयीं मी त्यांना सविस्तर हकीकत सांगितली. मी अर्थातच म्हणालों कीं निग्रोशीं होत असलेल्या वागणुकीसंबंधीं मला गौरवपर बोलतां येणार नाहीं, तरी पण हिंदुस्थानांतील अस्पृश्य लोकांपेक्षां निग्रोंची स्थिति खास वाईट नाहीं, एवढें मी सांगूं शकेन.

" तुम्हाला माहीत आहेच," गांधीजी सांगूं लागले, " कीं आज गेलीं कित्येक वर्षें मी अस्पृश्यतानिवारणासाठीं कसून प्रयत्न करीत आलों आहें. या आश्रमांतच आज किती तरी अस्पृश्य आहेत. या आश्रमांतील बहुतेक सारीं कामें अस्पृश्यांच्या कडूनच केलीं जात आहेत, आणि जो कोणी हिंदु या आश्रमांत येईल त्याला अस्पृश्यांच्या हातचें खाल्लें पाहिजे व त्यांच्या सान्निध्यांत राहिलें पाहिजे असा निर्बंध आहे."

" अस्पृश्यांना अलग ठेवण्याबाबत आतां बरीच सुधारणा झाली असेल नाहीं ? " असा मी प्रश्न केला. " होय तर " त्यांनीं उत्तर दिलें, " तरीसुद्धां अजून स्थिति भारी वाईट आहे. " खुर्शेद आल्या आणि त्या कांहीं तरी हिंदुस्थानींत म्हणाल्या. तेव्हां गांधीजी खूप हंसले. तें काय आहे असें मी विचारलें तेव्हां त्यांनीं " मी आपल्या पायाला वंदन करते," असें सांगितल्याचें मला निवेदन केलें. मी म्हणालों, व्हिएन्नामध्यें लोक असं नुस्तं म्हणतात, " मी तुझ्या हाताचें चुंबन घेतें " पण

घेत मात्र नसतात, तसलाच हा प्रकार दिसतोय. गांधीजी हंसले. इतक्यांत गांधीजी उठूं लागले त्याबरोबर दोन लहान मुलगे पुढें घुसले व गांधीजींनीं चालतांना त्यांच्या पाठीवर रेलून चालावें म्हणून त्यांनीं मधून घुसून स्वत:साठीं जागा करून घेतली.

हा मान आपल्याला मिळावा म्हणून लोकांमध्यें खूपच अहमहमिका चालते. एके दिवशीं संध्याकाळीं आम्हीं फिरून येत असतां पलीकडच्या खेड्यांतून एक मुलगी आम्हा मंडळींना भेटण्यासाठीं आली व तिनें मोठ्या खुबीनें गांधीजींच्या बाजूला घुसण्याचा प्रयत्न केला, त्यामुळें तेथें आधींच उभ्या असलेल्या मुलीला तिच्यासाठीं जागा करून देणेंच भाग पडलें.

आम्हीं पुन: सकाळीं फिरावयास जाण्यासाठीं निघाल्याबरोबर मी पुन: अस्पृश्यतेच्या विषयावर बोलणें सुरू केलें. मी म्हणालों, "मोठमोठ्या विचारी व इतर सर्व दृष्टीनें सुधारणावादी लोकांनींसुद्धां, उदाहरणार्थ वरदाचारियर (हिंदुस्थानच्या सुप्रीम कोर्टचे एक सदस्य—उच्चवर्गीय ब्राह्मण) यांच्यासारख्या लोकांनीं माझ्याशीं बोलतांना अस्पृश्यता असणें अगदीं योग्य आहे असें प्रतिपादलें आहे. मला वाटतें आत्मा हा अविनाशी असून तो एका देहांतून दुसऱ्या देहांत प्रवेश करीत असतो या कल्पनेवर ही विचारसरणी आधारलेली असली पाहिजे. वास्तविक पहातां हिंदुधर्मांतील हा एक महत्त्वाचा भाग आहे नव्हे? आत्म्याच्या कायांतरावर (पुनर्जन्मावर) आपला विश्वास आहे का?" मी विचारलें.

"अर्थातच," त्यांनीं ताबडतोब उत्तर दिलें. "आत्म्याचा शरीराबरोबर नाश होतो ही गोष्ट मला मान्य नाहीं. एकाद्याचें झोपडें उडून गेलें तर तो आपल्यासाठीं दुसरें झोपडें बांधतो. त्याचें शरीर नाहींसें झालें तर त्याचा आत्मा दुसऱ्या शरीराचा शोध करूं लागतो. त्याचप्रमाणें शरीर जमिनींत पुरलें गेल्यानंतर आत्मा त्याच्याभोंवतीं जजमेंट-डे (अखेरचा न्यायाचा दिवस)पर्यंत लोंबकळत राहातो हाही विचार मला मंजूर नाहीं. त्या जजमेंट-डेच्या दिवशीं म्हणे त्याला न्यायासनासमोर उभें करण्यांत येऊन त्यानें केलेल्या गुन्ह्यांचा निवाडा केला जातो—नव्हे, आत्मा ताबडतोब आपल्यासाठीं दुसरी काया शोधून काढतो."

"म्हणजे मनुष्य हा जो अमरत्व पावण्यासाठीं धडपडत आला आहे त्याचाच हा एक दुसरा प्रकार आहे म्हणायचा!" मी विचारण्याचें धाष्टर्य केलें. "या

सगळ्या गोष्टींच्या मुळाशीं नेभळा माणूस मरणास भीत असतो हेंच सत्य आढळून येत नाहीं का?" टॉलस्टॉय हे आपल्या जीवनाच्या अखेरपर्यंत अधार्मिकच राहिले पण अखेरी अखेरीस त्यांना मरणाची भीति वाटूं लागली.

"मला मरणाची भीति वाटत नाहीं." गांधीजी मुद्दाम जोर देत म्हणाले. "मरण आलें तर सुटका झाली या विचारांत मला समाधानच वाटेल. पण मरण म्हणजे माझा **अंत** आहे असें समजण्यास मात्र मी तयार नाहीं. मला यासाठीं पुरावा देतां येणार नाहीं. मेलेल्या माणसाचा आत्मा आपल्यासाठीं दुसरी काया शोधीत असतो हें सिद्ध करण्यासाठीं लोकांनीं प्रयत्न केलेले आहेत. यासाठीं पुरावा पुढें करणें शक्य आहे असें मला वाटत नाहीं. पण माझा त्यावर विश्वास आहे."

म्हणजे हें असें आहे. हा कांहीं विवाद्य विषय नव्हे हें मला माहीत होतें, पण माझे विचार पुढें मांडावे असें वाटलें म्हणून मी पुनः म्हणालों.

"आपल्याला अमरत्व मिळावें म्हणून प्रत्येकजण धडपड करीत असतो. फरक इतकाच कीं कोणाला वाटतें कीं आपण आपल्या चिरंजिवांच्या रूपानें अमर रहात असतों किंवा आपल्या कृतीनें अमरत्व पावत असतों, तर कांहींना असें वाटतें कीं आपण जनावरांच्या किंवा इतर प्राण्यांच्या कायांतरित स्थितींत अमर रहात असतों. कांहीं लोकांच्या कृति चिरकाल टिकणाऱ्या असतात म्हणून ते चिरकाल जिवंत रहातात असें आपण समजतों. पण आपल्या कृतींतील अमरत्वापेक्षां आपल्या स्वतःच्या अमरत्वावर एखाद्याचा विश्वास असेल तर तो मात्र मरणाच्या भीतीपासून उत्पन्न झालेला आहे असें समजलें पाहिजे किंवा तो मायेच्या भ्रमांत सुखाचा शोध करीत असला पाहिजे."

गांधीजींनीं अत्यंत सुंदर इंग्रजी गद्यभाषेंत मोठ्या जोमानें आपल्या विचारांचें पृथक्करण केलें. ते नेहमींच अत्यंत सुंदर व ब्रिटिश विश्वविद्यालयांतल्या उच्चार पद्धतीनुसार इंग्रजी भाषा बोलतात.

मी म्हणालों, "विद्यार्थी मला असें सांगतात कीं आजकालची हिंदुस्थानांतील पिढी उच्चवर्णीय हिंदु किंवा अस्पृश्य किंवा हिंदु व मुसलमान असा भेदभाव करीत नाहींत—व त्यांचा कोणत्याच धर्मावर विश्वास नसतो. "यापैकीं पहिला भाग बरोबर आहे," त्यांनीं कबूल केलें. "पण हिंदुइझम हा कांहीं धर्म नव्हे. विद्यार्थी धार्मिक

पूजाअर्चा करीत नसतील. पण हिंदुइझम म्हणजे **जीवन** आहे. तो जीवनाचा एक प्रकार आहे. जे कोणी धार्मिक पूजा वगैरे विधी करीत नसतील ते असल्या विधी करणाऱ्या-पेक्षां या हिंदुइझमच्या अधिक निकट आहेत." "अस्पृश्यतेमुळें मला अत्यंत व्यथा होते" ते म्हणाले; "पण स्वतंत्र हिंदुस्थानला या बाबतींत चांगलेंच कार्य करतां येईल असें मला वाटतें." यावरून बोलतां बोलतां ते आपल्या आवडत्या विषयावर आले. आणि तो म्हणजे ब्रिटिशांना इथून निघून जाण्याचें आव्हान होय. तसें पहातां तें एक प्रकारचें आव्हानच नव्हतें का ? ते इथून गाशा गुंडाळून निघून जातील तर त्यांची आत्मशुद्धि होऊन जगाला निराळें स्वरूप प्राप्त करून देण्याच्या कामीं ते अधिक लायक ठरतील. नाहीं तर त्यांची प्रत्येक क्रिया म्हणजे निव्वळ ढोंग आहे असें म्हणावें लागेल. या सुमारास आम्हीं बोलत बोलत गांधीजींच्या झोंपडीपर्यंत येऊन पोहोंचलों होतों. मी त्यांची आतां रजा घेतली.

नरेंद्र देव—एक समाजवादी पुढारी—हे गांधीजींच्या झोंपडीशेजारींच एका मांडवांत रहातात, व ते भलेमोठे सिलोनीज गृहस्थ आरण्यकम् हे आज सकाळीं माझ्या झोंपडींत आले आणि त्यांनीं फॅसिझम व इम्पीरियालिझम यांवर वादविवाद करण्यास सुरुवात केली. हिंदुस्थानामध्यें वारंवार आपल्याला ब्रिटिश फॅसिझम पाहण्यास मिळतें असें त्यांचें म्हणणें आहे. पण त्यांना जर्मन फॅसिझमविषयीं फारशी ऐकीव किंवा प्रत्यक्ष कांहींएक माहिती नाहीं. होय. बुद्धिवान लोकांना नात्सीवाद किती भयंकर स्वरूपाचा आहे याची कल्पना आहे पण जनतेला त्यांच्याविषयीं कांहींएक माहिती नाहीं. " प्रिन्स ऑफ वेल्स " आगबोट बुडविली गेली याचें जनतेला मोठें कौतुक वाटतें, आणि " रिपल्स " सुद्धां. ब्रिटिश आरमाराचा हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारला मोठाच आधार होता. ब्रिटिशांच्या अतिपूर्वेकडे झालेल्या अनेक पराभवां-मुळें जनतेच्या मनांवर आश्चर्यानें पगडा बसविला होता. आरण्यकम् म्हणाले कीं जपानी आत्मघातकी वैमानिक ( Suicide pilots ) ब्रिटनच्या लढाऊ जहाजावर हिरीरीनें तुटून पडत असतात. पण ब्रिटनची तसें करण्याची मुळींच छाती नाहीं. ब्रिटनपाशींसुद्धां आत्मघातकी वैमानिक आहेत असें मी त्यांना सांगितलें. पण आपण त्याविषयीं कधींहि ऐकलें नसल्याचें त्यांनीं बजावलें. ब्रिटिश रॉयल एअर फोर्समधील स्वोर्डफिश ( तलवार मासा ) वैमानिकांनीं ग्नासेनाउ व शॉर्नहोर्स्ट या जर्मन लढाऊ जहाजांवर तुटून पडून इंग्लिश चॅनेलमधून खुशाल वावरणाऱ्या या

लढाऊ जहाजांचा चक्काचूर उडविला ही हकिकत मी त्यांना सांगितली. हे वैमानिक जपानी वीरांप्रमाणेंच मृत्यूला आव्हान देण्यास कधींही कचरत नसतात, असें मी त्यांना समजावून सांगितलें. जगांतील प्रत्येक सशस्त्र सैनिकांत असले वीरशिरोमणी असतातच, मी म्हणालों; आणि लोकसत्ताक राष्ट्रांतही अशा वीरांची मुळींच वाण नाहीं असें दिसून येतें असें माझें मत मी प्रतिपादिलें.

आमचें संभाषण संपल्यानंतर मी समारोप केला कीं हिंदी फॅसिस्ट विरोधी लोकांना दोन आघाडीवर लढण्याची आवश्यकता आहे. एक गटराष्ट्रांच्या विरुद्ध आणि दुसरें ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध ( British Imperialism ).

"एका आघाडीवरसुद्धां लढण्याची जिथें मारामार तिथें दुसऱ्या आघाडीची गोष्टच कशाला ?"

"आमच्यापाशीं शस्त्रास्त्रें नाहींत," देव म्हणाले, "म्हणून आम्हांला जपान-विरोधी युद्धांत लढतां यावयाचें नाहीं. ब्रिटिशांनीं मुद्दामच आम्हाला निःशस्त्र ठेविलें आहे. शिवाय आम्हाला पायाखालीं तुडविणाऱ्या ब्रिटिशांच्या बाजूनें लढणें मोठें कठीण आहे. ते आम्हाला सशस्त्र करण्यास नकार देतात. आणि ते आम्हाला स्वातंत्र्य देण्यासही नकार देतात."

डॉ. दासच्या पुतणीचा एक मोठा चलाख मुलगा आहे सहा-एक वर्षांचा. तो नेहमीं पाहुणघराच्या आवती-भोंवतीं खेळत असतो. त्याला इंग्रजीचे थोडे शब्द येतात. तूं आपल्या संवगड्यांबरोबर कोणत्या भाषेंत बोलत असतोस असा मी त्याला प्रश्न केला. मी बंगालींत बोलत असतों असें तो म्हणाला. त्याला हिंदी येतें नि गुजराती पण येतें. आश्रमांतलीं बहुतेक सारीं मुलें दोन किंवा तीन भाषा बोलतात.

देव व आरण्यकम् हे निघून गेल्यानंतर थोड्या वेळानें राजा नांवाचे गृहस्थ मला भेटण्यासाठीं आले. ते हिंदू असून त्यांनीं फ्रेंच बाईशीं लग्न लावलें आहे. किती तरी वर्षें ते फ्रान्समध्यें राहिले होते, आणि त्यांचें फ्रेंच त्यांच्या इंग्रजीपेक्षां किती तरी छान होतें. त्यांचा चेहरा सुंदर असून हॉलिवुडमध्यें सहज शोभण्यासारखा आहे. त्यांचे केस कानाजवळील गालावर खूप खालपर्यंत आलेले असून त्यांच्या कमानदार भुंवया त्यांच्या काळ्याभोर डोळ्यांवर लोंबकळल्यासारख्या दिसतात. ते फ्रान्सच्या दुःस्थितीविषयीं बोलत होते. आपला पूर्वीचा उत्साह पुनः

प्राप्त व्हावा म्हणून ते गांधी आश्रमांत किती तरी आठवडे रहात होते. ते स्वतः मुसलमानांच्या संगतींत वाढले असून त्यांचें शिक्षण सुद्धां मुसलमानी शाळेंतच झालें होतें. हिंदूंच्यापेक्षां मुसलमानांमध्यें अधिक पौरुष्य आहे असें त्यांचें म्हणणें आहे. ते अधिक **चळवळे** ( Dynamic ) असून ते अधिक क्रांतिकारक असतात. अर्धाअधिक हिंदी कम्युनिस्ट गट हा मुसलमानांचा बनलेला आहे. हिंदुस्तानचे अत्यंत थोर कवि हे मुसलमानच आहेत. हिंदू हा अगदीं निरुपद्रवी, गरीब व कमी कल्पक आहे. हिंदू व मुसलमान यांच्यामध्यें वंश-भेद नसतांना त्यांच्या वैयक्तिक स्वभावगुणांत हा विलक्षण फरक कां आढळून यावा असा मी प्रश्न केला. " त्यांच्या खाद्यामुळें ? " मी विचारलें. त्यांच्या जीवनाकडे पहाण्याच्या दृष्टींतच फरक आहे असें त्यांनीं सांगितलें. मुसलमानांना जीवन हें सुखमय आहे असें वाटतें. खाद्य हें कारण असूंच शकणार नाहीं. कारण उत्तरेकडे हिंदूसुद्धां मांसाहार करतात. मुसलमान डुक्कर खात नाहींत पण गाई खातात. " हिंदू, " ते सांगूं लागले. " हा नेहमीं विचारमग्न असतो. त्याची स्मरणशक्ति दांडगी असते, व्यापारांत तो मोठा पटाईत असतो. पण तुम्हांला जर जिवाची चैन करायची असेल, चमचमीत जेवायचें असेल, नाचरंगांत दंग व्हायचें असेल तर " त्यांनीं मला उपदेश केला, " एखादा मुसलमान गांठा ! "

आज दुपारच्या जेवणाच्या वेळीं गांधीजी खूप खुषींत होते. ते जेवणघरांत आले व दोन लहान गोजिरवाण्या मुलांकडे डोळे मिचकावूं लागले. त्यांचीं वयें फार झालें तर दोन किंवा तीन वर्षांचीं असावींत. ते अगदीं शांतपणें दाराच्या जवळच आपलें ताट वाढून येण्याची वाट पहात बसले होते. गांधीजींनीं खालीं बसण्याच्या अगोदर प्रत्येकाची कांहीं चेष्टा चालविली होती, व ते स्मित करीत होते किंवा मोठ्यानें हंसत होते. आम्हीं जेवण्यास सुरवात केल्यानंतर बॅटलक्रीक-मिशिगन येथील डॉ. केल्लोगची ओळख आहे का असा त्यांनीं मला प्रश्न केला. केल्लोग फुड कंपनीची मला माहिती असल्याचें मी सांगितलें, पण डॉ. केल्लोगची नाहीं. अन्न या विषयावर त्यांच्याशीं पत्रव्यवहार केल्याचे गांधीजींनीं सांगितलें. पण गांधीजी म्हणाले, " नेहमीं असें होतें पहा कीं माणसांना परकी लोकच स्वदेशच्या लोकांपेक्षां अधिक ओळखीत असतात. लायपत्सिश शहरांत एक कूने नांवाचे अन्नतज्ञ रहात असत. त्यांचीं सारीं पुस्तकें मूळ जर्मनमधून हिंदुस्थानांतील

बहुतेक भाषांत भाषांतरित झालीं होतीं, आणि त्यांच्या शेंकडों आवृत्त्या पण निघाल्या होत्या. पण मी या कूने नांवाच्या गृहस्थाचा लायपत्सिश येथें तपास करण्यासाठीं एका मित्राला पाठविलें असतां मला आढळून आलें कीं या नांवाच्या गृहस्थाला कोणीही ओळखीतसुद्धां नव्हतें. आणि खूप खटपट केल्यानंतर या गृहस्थांचे चिरंजीव आम्हाला भेटले. कूने स्वतः कधींच मरून गेले होते."

आश्रमामध्यें तुम्हांला पोटभर अन्न मिळतें कीं नाहीं, असा मला गांधीजींनीं प्रश्न विचारला. मी कधींच उपाशी नसतों असें मी उत्तर दिलें पण येथील अन्नांत बदल नसतो व नजर व चव यांचें जेवणांत अत्यंत महत्त्व असतें असें मीं त्यांना सांगितलें. " मी जें अन्न आतांपर्यंत इथें खात आलों तें अगदीं तेंच तेंच असलेलें मला आढळून आलें. " मी तक्रार केली, " मी तुमच्या अन्नावर चांगली सडकून टीका करणार आहें."

याचवेळीं जवाहिरलाल नेहरू आंत आले. त्यांनीं अंगांत एक पांढरें शुभ्र खादी कुडतें घातलें असून त्यांचा चेहरा अत्यंत सुंदर व हंसरा होता. लोकांचें त्यांच्यावर किती विलक्षण प्रेम होतें हें कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें होतें. ते माझ्या शेजारीं जमिनीवर बसले व आपल्या हातांनीं हिंदी पद्धतीनुसार भोजन करूं लागले. यावेळीं मला पॅरिसच्या एका अत्यंत फॅशनेबल रेस्टॉरांमध्यें आम्हीं दुपारचें जेवण घेतलें होतें त्याची आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं.

दुपारच्या जेवणापूर्वी नेहरूंचें गांधीजींशीं थोडेंसें संभाषण झालें होतें. कांहीं वेळानें गांधीजी माझ्याकडे वळले व म्हणाले कीं उद्यां मला जवाहरलालशीं बोलायचें असल्यानें—सोमवार हा त्यांचा मौन दिवस असतो,—सोमवारीं सबंध दिवस मौन धारण न करतां आज दुपारपासूनच मौन धारण करण्याचें मी ठरविलें आहे. पण त्यामुळें माझ्या दुपारच्या एका तासाच्या मुलाखतींत व्यत्यय येत असल्यानें ते दुपारीं २ वाजून ४० मिनिटांनंतर मौन स्वीकारतील, आणि माझ्याशीं दीड ते अडीच वाजेपर्यंत वादविवाद करतील, असें त्यांनीं मला कळविलें.

दुपारचें जेवण झाल्यावर मी व नेहरू पाहुणघरांतल्या समोरासमोरच्या आपापल्या खाटेवर बसलों. तेसुद्धां याच ठिकाणीं उतरले होते. आम्हीं एक घंटाभर जगांतील एकूणएक गोष्टींविषयीं बोललों. एका बाबीसंबंधीं ते म्हणाले—" या

हिंदुस्थानांत अत्यंत घृणा उत्पन्न करणाऱ्या गोष्टीहि आहेत, आणि अत्यंत उमद्या गोष्टीहि आहेत. तुम्हांला हव्या असतील त्या गोष्टी तुम्हीं उचला." "नाहीं" मी म्हणालों. "दोन्ही घेतलेल्या बऱ्या." गांधीजींशीं एक तास संभाषण करण्यासाठीं नेहरूंनीं मला साडेबारा वाजतां सोडलें. मी गांधीजींच्याकडे गेलों तेव्हां नेहरू तेथेंच जमिनीवर बसलेले होते. त्यांच्या चेहऱ्यावर उदासीनता पसरली होती. मी त्यांच्या शेजारींच जाऊन बसलों. गांधीजींनीं माझ्याकडे वळून "बरं मग" या शब्दांनीं बोलण्याविषयीं मला सूचना दिली!

ब्रिटिश कायदा व ब्रिटिश राजकीय आचार यामुळें पार्लमेंट व राजा यांमध्यें अत्यंत जबरदस्त सत्ता असलेली मध्यवर्ती शक्ति असते, त्याच्या उलट अमेरिकन राजपद्धतींत फेडरेशनचें (संयुक्त संस्थानांचें) तत्त्व मान्य केलेलें आहे, या गोष्टीवर टीका करून माझ्या मुलाखतीला मी सुरुवात केली. "आपल्याला असें नाहीं कां वाटत?" मी विचारूं लागलों "कीं हिंदुस्थानमध्यें विलक्षण विषमता असल्यामुळें तुम्हांला राजेमहाराजांना व मुसलमानांना मान्य होईल अशा संयुक्त संस्थानांच्या घटनेचाच अवलंब करावा लागेल असें?"

"अमुक एकच संघटना आम्हांला सोइस्कर होईल असें निश्चयात्मक रीतीनें सांगण्याची आज माझी तयारी नाहीं," त्यांनीं कबूल केलें. "आधीं ब्रिटिश इथून निघून गेले पाहिजेत. त्यानंतर आम्हीं काय करूं याविषयीं आतां तर्क करीत बसण्याची आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं. ब्रिटिशांनीं इथून गाशा गुंडाळला कीं धार्मिक अल्पसंख्यांकांचे तंटे आपोआप नाहींसे झालेले दिसतील. समजा ब्रिटिश इथून निघून गेले नि इथें अंधाधुंदी माजली, तर या अंधाधुंदींतून अमुक एक प्रकारचीच शासन-पद्धती निर्माण होईल, असें निश्चयात्मक मला सांगतां येणार नाहीं. तुम्हांला स्वतःला काय आवडेल असें जर मला कोणी विचारलें तर मी मध्यवर्ती शासनपद्धतीपेक्षां संयुक्त संस्थानपद्धतीच अधिक पसंत करीन. कोणत्यातरी प्रकारची संयुक्त संस्थानपद्धती अस्तित्वांत येणार खास. पण संयुक्त राज्यघटना (Federation) येवो वा न येवो, या प्रश्नाबद्दल माझ्या मनाला बिलकुल त्रास होत नाहीं, या माझ्या उत्तरानें तुम्हांला समाधान होईल अशी मला आशा आहे. कदाचित् तुमची घोटीव सांच्याची मनोरचना या माझ्या विचारांना हंसतही असेल! आम्ही निःशस्त्र झालेलें, व शेकडों वर्षें परकी

राजांच्या अंकित झालेले कोट्यावधि लोक निश्चित केलेल्या सत्याग्रह चळवळींत यश संपादूं शकणार नाहीं असेंही कदाचित् तुम्हांला वाटत असेल."

"नाहीं," मी म्हटलें. "मला असें नाहीं वाटत. "इतिहास झपाट्यानें पुढें जात आहे आणि थोड्या दिवसांत तुम्हीं चीनप्रमाणें स्वतंत्र व्हाल अशी मला खात्री वाटते. तुम्हीं कित्येक वर्षांपूर्वी सुरू केलेल्या झगड्याला असलीं गोड फळें आल्याशिवाय रहाणार नाहींत." "मला चीनच्या सारखें स्वातंत्र्य नको आहे." ते विशेष जोर देत म्हणाले. "आजसुद्धां चीनची फारच असहाय्य स्थिति आहे मग चियांग कायशेक त्याच्यासाठीं कितीही धडपड करीत असोत. चीननें कितीही शौर्य गाजविलें किंवा या महायुद्धांत त्यानें आपल्या सर्वस्वाचा होम जरी केला तरी तो चीन देश पूर्णतया स्वतंत्र नाहीं. चीननें इंग्लंडला व अमेरिकेला म्हणायला तयार असलें पाहिजे कीं, 'तुमच्या मदतीशिवाय आम्हीं आमच्या पायावर उभें राहूनच हें आमचें स्वातंत्र्ययुद्ध जिंकण्यास सिद्ध होऊं.' यालाच मी स्वातंत्र्य म्हणेन."

"चियांगशीं झालेल्या मुलाखतीविषयीं आपलें काय मत झालें," असें त्यांना मी विचारलें.

"फार छान !" त्यांनीं उत्तर दिलें.

"त्यांचें काय म्हणणें होतें हें आपल्याला समजलें नाहीं," मी हंसत हंसत म्हणालों, "आणि आपलें काय म्हणणें होतें हें त्यांना समजलें नाहीं."

"त्यांचें म्हणणें ओळखणें बरेंच कठीण आहे खरें." गांधीजींनीं कबूल केलें. "कदाचित् भाषेच्या अडचणीमुळेंही तसें असण्याचा संभव आहे. मादाम चियांगच्या मध्यस्थीनें आम्हाला बोलावें लागत होतें. पण फक्त भाषेचीच अडचण होती असें मला वाटत नाहीं."

"अर्थातच चीन पूर्णपणें स्वतंत्र नाहीं," मी पुनः त्या विषयाकडे वळत म्हणालों, "पण स्वातंत्र्य कांहीं एका दिवसांत मिळत नसतें. या महयुद्धांतूनच अर्थात् आम्हीं हें युद्ध जिंकलें तरच—चीन देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून घेतां येईल. आशियाचें शतक जवळ येत चाललें आहे असें वाटतें. भावी दहावीस वर्षांत हिंदुस्थान आणि चीन यांना आपला अत्यंत उज्ज्वल इतिहास निर्माण करण्याची सुसंधी मिळणार आहे. पण ब्रिटिशांना हें समजत असावें याचें चिन्हसुद्धां मला दिसत नाहीं अद्यापी. तुम्हीं सांगतां तसे ते हिंदुस्थान सोडून जाणार

नाहींत. त्यांना जसें सिंगापूर नि मलाया या ठिकाणीं आपल्या शस्त्रास्त्रांनीं आपलें संरक्षण करितां आलें नाहीं तसें त्यांना आपल्या अक्कलहुषारीनें ते हिंदुस्थानांत आपलें स्वतःचें संरक्षण करूं शकतील असें मला वाटत नाहीं. मी कोणत्याही तऱ्हेनें चीनबद्दल टीका करीत नाहीं याबद्दल आपली खात्री असूं द्या, गांधीजी विशेष जोर देत म्हणाले. "मला फक्त एवढेंच सांगावयाचें होतें कीं आम्हाला चीनचें अनुकरण करायचें नाहीं. आज जी चीनची दुर्दशा (अवस्था) झाली आहे तशी हिंदुस्थानची व्हावी अशी माझी इच्छा नाहीं. आणि त्याचसाठीं मी मुक्तकंठानें सांगतोय कीं इथें आम्हाला ब्रिटिश नि अमेरिकन सोल्जर नको आहेत. मला जपानी किंवा जर्मन सोल्जरसुद्धां इथें नको आहेत. रोज रेडियोवरून जपानी ध्वनिक्षेप करीत आहेत कीं, आम्हाला हिंदुस्थान आमच्या काबूंत ठेवायचें नाहीं, आम्हाला फक्त हिंदुस्थानला त्याचें स्वातंत्र्य मिळवून द्यायचें आहे. आम्हाला त्यांची सहानुभूतीही नको नि त्यांची मदतही नको आहे. ते मोठे दानधर्मशील आहेत असें मला वाटत नाहीं. आम्हाला कोणाही परक्याचें राज्य हिंदुस्थानांत नको आहे. आतां मी उतावळा होत चाललों आहें. मला यापुढें फारशी वाट पहातां येणें शक्य नाहीं. चीनपेक्षांही किंवा इराणपेक्षांही आमची स्थिति फार वाईट आहे. मला काँग्रेसची खात्री करून देणें शक्य नाहीं. काँग्रेस पक्षांतले अधिकारी कदाचित् त्यासाठीं सर्वस्व अर्पण करण्यास तयार होणार नाहींत. (हें बोलत असतांना गांधीजी सूचकपणानें नेहरूंच्याकडे विशेष लक्ष लावून पहात होते.) तरीसुद्धां मी आगेकूच करून जनतेला माझें म्हणणें समजावून सांगेन. पण कांहींही झालें तरी आम्हीं यापुढें पड खाणार नाहीं. आम्हीं अशी एक जागतिक योजना तयार करूं कीं सारी दुनिया आश्चर्यानें थक्क होऊन जाईल. तुम्हीं आपले पूर्वग्रह क्षणभर बाजूला ठेवून माझी कायदेभंगाची नवी योजना योग्य आहे किंवा नाहीं याविषयीं अंमळ विचार करून पहा. आणि त्यांत कांहीं दोष असले तर मला ते दाखवून द्या. (यावेळीं मला असें वाटतें कीं जरी ते माझ्याशीं बोलत असले तरी त्यांच्या म्हणण्याचा सारा रोख नेहरूंना उद्देशूनच होता आणि आजच्या या वादविवादांत गांधी आणि नेहरू यांना एकमेकांचें म्हणणें पटलेलें होतें असें मला दिसलें नाहीं.) म्हणजे मग तुम्हाला आमच्या कार्याला मदत करतां येईल, आणि थोडेंसें खुलवून सांगायचें म्हणजे

लेखक या नात्यानें तुम्हांला अधिक कामगिरी करून दाखवितां येईल. आजकाल हिंदुस्थानांत निर्माण होणारें साहित्य अगदीं निर्जीव अतःएव अगदीं निरुपयोगी आहे. त्यांत स्वतःचें असें फारच थोडें असतें. तें सारें एका साच्यांचें आहे. या विचारप्रणालींतून बाहेर या असे माझें म्हणणें आहे. मी ज्या भाषेंत माझे विचार मांडणार आहें त्याचा तुम्हीं खोल जाऊन विचार करा; तें अंमळ कठीण आहे हें मला कबूल आहे. तुम्हीं इथें आलांत ते तुमच्या साऱ्या ऐश्वर्य, विद्वत्ता, संस्कृति, आणि ब्रिटिश व अमेरिकन सदाचारसंपन्नतेच्या शस्त्रास्त्रांनीं विभूषित होऊन आलां होतात. तुमच्या विचारप्रणालीशीं आमचे विचार समरस होणार नाहींत, ते तुम्हांला समजणार नाहींत हें मला समजतें. पण त्या ठराविक साच्यांच्या विचारप्रणालीच्या चाकोऱ्यांतून तुम्हाला बाहेर पडतां आलें नाहीं तर तुमचे सेवाग्राममधील दिवस वाया गेले असें मला वाटेल. "

" होय, " कांहीं वेळ थांबून मी म्हणालों. या एवढ्या अवधींत माझ्यासाठीं गांधीजी काय म्हणाले होते नि नेहरूंच्यासाठीं काय म्हणाले होते याची मी मनांतल्या मनांत विल्हेवाट लावीत होतों. " पण आपण जी नवी प्रथा ( New Order ) म्हणतां त्याचा अर्थ मला समजावून सांगाल का ? या नव्या प्रथे-विषयीं माझे स्वतःचे असे कांहीं ठाम सिद्धांत नसल्यानें मला आपलें म्हणणें खोडून काढतां येणें शक्य नाहीं, कीं तें टाकाऊ आहे असेंही मला म्हणतां येणार नाहीं. जगाला देण्यासारखें हिंदुस्थानजवळ अद्यापी पुष्कळच आहे, पण भावी घटनांविषयीं आपल्याला काय वाटतें ? "

"असें पहा !" गांधीजी सांगूं लागले, " साऱ्या अधिकारसूत्रांचें केंद्र हें सध्यां दिल्लीला आहे, किंवा कलकत्त्याला किंवा मुंबईला आहे म्हणजे सारी सत्ता मोठ्या शहरांत केंद्रीभूत झालेली आहे. ती सारी सत्ता हिंदुस्थानांतील सात लाखांपैकीं एकूण एक खेड्यांतून एकसारखी वांटली गेली पाहिजे असें माझें मत आहे. त्याचा अर्थच असा कीं त्या सत्तेचा पूर्ण अभाव होय. सरळ भाषेंत सांगायचें म्हणजे आज जे इंग्लंडच्या इंपीरियल बँकेंत सात लाख डॉलर्स अनामत ठेवण्यांत आलेले आहेत ते काढून घेऊन येथील सात लाख खेड्यांतून ते वांटून दिले जावेत. म्हणजे दरेक खेड्याला एकेक डॉलर मिळेल आणि मग तो इथें सुरक्षित राहूं शकेल."

"हे सात लाख डॉलर्स" गांधीजी पुढें सांगू लागले, "हिंदुस्थानच्या इंपीरियल बँकेंत अनामत ठेवलेले हे सात लाख डॉलर्स जपानी विमानांतील एखाद्या बॉंबनें खाक होऊन जातील. पण तेच सात लाख जर खातेदारांच्या कडे वांटले गेलेले असले तर कोणालाही तें द्रव्य अपहरण करतां येणार नाहीं. अर्थात त्यामुळें आपोआपच या सात लाख युनिटसमध्यें ऐच्छिक सहकारिता उत्पन्न होऊं शकेल. ऐच्छिक सहकारिता, नात्सीपद्धतीनें निर्माण केलेली सहकारिता नव्हे. या ऐच्छिक सहकारितेमुळें खरें स्वातंत्र्य प्रस्थापित होईल व त्यायोगें नवी प्रथा—सोव्हिएट रशियांतील नव्या प्रथेच्या पेक्षां किती तरी पटीनें उच्च दर्जाची—निर्माण होऊं शकेल. कोणी म्हणतात कीं रशियांत भयंकर निर्दयता आहे म्हणून. पण ती खालच्या वर्गाच्यासाठीं व दलितांच्या हितासाठीं दाखविली जात असल्यानें ती फार चांगली आहे असें म्हणतात. माझ्या दृष्टीला त्यांत चांगलें असें कांहींच दिसत नाहीं. कधीं काळीं याच निर्दयतेपासून अशी कांहीं भयंकर स्वरूपाची अराजकता निर्माण होईल कीं आतां-पर्यंत जगांत ती कुठेंही पहायला मिळाली नसेल. पण ही अराजकता आपण इथें टाळूं शकूं अशी मला खात्री वाटते. पुढील हिंदी समाजाचें स्वरूप कशा प्रकारचें होईल याची कल्पना करणें माझ्या आंवाक्याबाहेरचें आहे, हें मला कबूल करायला पाहिजे. पण मी सांगितली या प्रकारची पद्धती हिंदुस्थानांत प्रचलित होती. तिच्या-मध्यें कांहीं दोष असले पाहिजेत खास. नाहींतर मोंगलांच्या व ब्रिटिशांच्या अंमला-खालीं ती खचली नसती. पण माझी अशी समज आहे कीं त्या पद्धतीचे कांहीं अंश अद्याप बाकी राहिलेले आहेत; कांहीं असलें तरी ब्रिटिश सत्तेच्या घातुक दबावाखालीं-सुद्धां त्याचीं मुळें अद्यापी जिवंत आहेत. ब्रिटिश राजसत्ता हिंदी लोकांच्या हातांत येईल तेव्हां एकाएकीं पाऊस पडल्याप्रमाणें हीं दबून बसलेलीं मुळें एकदम जोमानें तरारून वृक्षरूपानें बाहेर येतील. पण हा वृक्ष कोणतें स्वरूप धारण करील हें मला आतां सांगतां येणार नाहीं. दुर्दैवानें, अहिंसावृत्तीचे वारे आतांशा फारसे वाहतांना दिसत नसले तरी गेल्या पंचवीस वर्षांत नवचैतन्य निर्माण करण्यासाठीं केलेली कष्टाची कामगिरी अगदींच वाया गेली असें माझ्यानें म्हणवत नाहीं. ही नवी प्रथा प्रस्थापित करण्यासाठीं कॉंग्रेस पार्टीच्या प्रभावाचा व मुस्लिम लीग पार्टीच्या प्रभावाचा अत्यंत उपयोग होईल अशी मला खात्री वाटते."

ही जी सात लाख डॉलर्सची कल्पना सांकेतिक स्वरूपांत आपण मांडली

तिचा आपण खोलपणें विचार करा, असें मी सुचविलें. "समजा इंपीरियल बँके-मधून एकेक डॉलर परत येऊन तो आपल्या खेड्याला मिळाला तर तें खेडें त्याचा कसा उपयोग करून घेईल?" मी प्रश्न केला.

"एक गोष्ट घडून येईल" गांधीजी म्हणाले. "आज कोणाही हिस्सेदाराला (शेअर होल्डर) कांहीं फायदा मिळत नाहीं. मधले लोक तो खाऊन जातात. शेतकरी जर आपल्या डॉलर्सचे मालक झाले तर त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणें ते त्याचा उपयोग करूं शकतील."

"शेतकरी हा पैसा जमिनींत पुरून ठेवीत असतो," मी सुचविलें.

"ते आपला पैसा जमिनींत पुरून ठेवणार नाहींत," गांधीजी म्हणाले. "कारण त्यांना जिवंत रहायचें आहे. ते आपला पैसा घेऊन आपल्या बँकेकडे जातील व बँकेच्या सल्लयानें त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणें ते आपल्या पैशाचा विनियोग करतील; ते मग पवनचक्क्या बांधोत कीं वीज निर्माण करोत, कीं त्यांना वाटेल तें ते करोत. मध्यवर्ती राज्यव्यवस्था निर्माण होईल खरी पण त्या सरकारला लोकांच्या इच्छेनुसार राज्यसूत्रें हलवावीं लागतील व त्यांच्या इच्छेच्या बळकट पायावरच तिची इमारत रचली जाईल."

"मला वाटतें" मी म्हणालों, "कीं मध्यवर्ती सरकार नवे नवे कारखाने निर्माण करील व औद्योगिक दृष्ट्या देशाची चांगलीच भरभराट होईल."

"पण मध्यवर्ती सरकार म्हणजे ब्रिटिश सैन्याच्या दबावाखालीं सूत्रें हलविणारें सरकार नव्हे, असलें चित्र तुम्हीं आपल्या डोळ्यापुढें आणा," गांधीजी बजावून सांगूं लागले. "आणि ब्रिटिश सैन्याच्या आधाराशिवाय जर आमचें मध्यवर्ती सरकार बळकट राहिलें तर तीच नवीन प्रथा समजायची. हें एक ध्येय आहे, आणि हें ध्येय साध्य करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न केले गेले पाहिजेत. हें ध्येय कांहीं काल्पनिक स्वरूपाचें नाहीं, तें सुसाध्य आहे."

"मला अगदीं कबूल" मी म्हणालों. "दहा वर्षांखालीं मी ही गोष्ट कबूल केली नसती, पण मला रशियांत व इतर ठिकाणीं जे अनुभव आले त्यावरून मला असें वाटूं लागलें आहे कीं ज्या ठिकाणीं वैयक्तिक स्वातंत्र्याला मूठमाती दिलेली आहे असें एखादें जबरदस्त राष्ट्र निर्माण झालें तर जगावर भयंकर

प्रसंग ओढवेल. खरोखरी भांडवलशाही आर्थिक-योजनेमुळें सरकारच्या हातीं आर्थिक बाबतींत ढवळाढवळ करण्याची सत्ता दिलेली आहेच. यामुळें सरकारच्या हातीं अधिकच सत्ता आलेली आहे. अशा या सरकारावर नियंत्रण कसें घालायचें व अधिकारसूत्रें समतोल कशीं ठेवायचीं हे प्रश्न पुढील पिढीला अगोदर सोडवावे लागतील. आतां एक प्रश्न उत्पन्न होतो. अत्यंत प्रबळ सत्ताधारी राज्यांत वैयक्तिक स्वातंत्र्याचें रक्षण आपण करूं शकतों किंवा नाहीं ? दुसरा प्रश्न असा आहे, कीं आंतर-राष्ट्रीय योजनेप्रमाणें राष्ट्रें एकमेकांशीं सहकार्य करण्यास तयार होतील काय ? किंवा आंतरराष्ट्रीयत्व टाकून देऊन पुनः आम्हीं समरभूमीचें अवलंबन करणार ? "

" माझा प्रश्न असा आहे " गांधीजी म्हणाले, " कीं या प्रचंड राष्ट्रांना अधिक बलवान होऊं द्यायचें नाहीं, तर तें कसें साध्य करतां येईल ? म्हणूनच तर मित्रराष्ट्रांनीं ( Allied powers ) फॅसिस्ट राष्ट्रांची पद्धती अनुसरावी असें मला वाटत नाहीं. आणि म्हणूनच तर मी त्यांना सांगतोंय कीं ज्याची आज हिंदुस्थान मागणी करीत आहे तें अगदीं यथायोग्य आहे, असें तुम्हीं जाहीर करा. आपण एवढें उड्डाण करूयां आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊन टाकूंया, आणि जरूर लागलीच तर हिंदुस्थानांतच हें महायुद्ध चालूं असेतोंपर्यंत हिंदुस्थान ठरवील त्या अटीवर इथेंच राहूंया, नि हिंदी जनतेचें आपल्याला स्वयंस्फूर्त सहकार्य मिळतें कीं नाहीं याचा पडताळा पाहूंया. "

" माझी अगदीं पक्की खात्री आहे, " मी कबूल केलें, कीं " आपल्याला स्वातंत्र्य हें मिळालेंच पाहिजे. त्यामुळें आपलेंही कल्याण होईल व आमचें साऱ्यांचेंही कल्याण होईल. ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं कीं ब्रिटिश लोकांनीं आपल्या साम्राज्याचें रक्षण करण्याची फारशी अव्वल दर्जाची अक्कलहुशारी जगाच्या निदर्शनाला आणून दिलेली नाहीं, कीं त्या साम्राज्याची सहानुभूतीही मिळविण्याची खटपट केलेली नाहीं. "

" या गोष्टी तुम्हीं अमेरिकेला जाऊन सांगा, " गांधीजी म्हणाले.

" हो मी जरूर सांगेन, " मी जोर दिला, " पण आपण सांगतां त्या शब्दांत मात्र नव्हे. हल्लीं आम्हीं ( अमेरिका ) ब्रिटनला एकूण एक युद्धसामुग्री–दारूगोळा खरीद करण्यासाठीं द्रव्यसाहाय्य करीत आहोंत. यंदां आम्ही साठहजार विमानें तयार

करीत आहोंत. पण १९४३ सालीं आम्हीं एक लक्ष चाळीस हजार विमानें तयार करणार आहोंत. अमेरिका व हिंदुस्थान यांच्या हितसंबंधाविषयीं बोलतांना मला हें कबूल करावें लागेल कीं आणीबाणीचा प्रसंग ( Crisis ) अंमळ अपेक्षेच्या फार आधीं आला, ( सर्वजण हसले ). आज जर आम्हीं दरसाल एक लक्ष चाळीस हजार विमानें तयार करीत असलों आणि युद्धआघाडीवर आमचे जर वीस लाख सैनिक हजर झाले तर लंडनमध्यें आमच्या म्हणण्याला विशेष किंमत येण्याचा संभव आहे. आज आशियांत काय घटना घडून येत आहेत याचा ब्रिटनला बरोबर अंदाज नाहीं. उद्यां कदाचित् अमेरिकेच्या मदतीनें तें कळूं लागेल."

"आणि म्हणूनच माझें म्हणणें, कीं–" गांधीजी म्हणाले, "आणि मी तें अगदीं स्पष्टपणें मांडतों–जोंपर्यंत आम्हीं सामोपचारानें ब्रिटनला या गोष्टी पटविण्याची खटपट करीत जाऊं तोंपर्यंत त्यांना त्या मुळींच पटणार नाहींत. पण आम्हीं कृती करूं लागलों कीं मात्र आमच्या मागण्यांचा न्यायीपणा व उपयुक्तता यांची साक्ष त्यांना पटल्याशिवाय रहाणार नाहीं. ब्रिटिश इतिहास तें आम्हाला सांगतो आहे. कृतीमुळेंच त्यांच्या मनावर परिणाम होऊं शकतो आणि म्हणूनच आतां आम्हाला ताबडतोब कार्याला लागलें पाहिजे. तूर्त मला आमच्या जनतेच्या मनावर, लोकमतानुसार निर्माण करण्यांत आलेल्या **राष्ट्रीय सरकारची** कल्पना पूर्णपणें बिंबविली पाहिजे आणि या कल्पनेंत अद्भुत किंवा अशक्य कांहीं नाहीं हें सिद्ध करायला हवें. ही माझी कल्पना अहिंसेच्या महा तत्त्वाच्या भक्कम पायावर उभारण्यांत आलेली असल्यानें माझ्या ध्येयाचा भक्कमपणा सिद्ध करण्यासाठीं मला अहिंसा तत्त्वाचा अवलंब करण्याची आवश्यकता नाहीं. जरी मी हिंसा-वादी असतों तरी माझ्यापुढें आज तेंच ध्येय उभें असतें. जरी मी हिंसा-वादी असतों तरी मी हेंच म्हटलें असतें कीं, 'जा, हिंदुस्थान आपल्या युद्धकार्याची प्रस्थानभूमी म्हणून तुम्हीं वापरूं नका पण आज मी स्पष्टपणें म्हणतोंय कीं तुम्हांला जर हिंदुस्थान युद्धकार्याची प्रस्थानभूमी म्हणून वापरण्याची आवश्यकता असली तर–तुम्हीं जरूर तिचा तसा उपयोग करा–नाहीं तर दुसरें कोणी तरी ती पटकावून बसेल. आणि गुण्यागोविंदानें इथें रहा, कोणाचा घातपात करूं नका. मी आणखी याच्याहीपुढें जाऊन असें सांगेन कीं हिंदुस्थान ज्या राज्यपद्धतीला मूर्तस्वरूप देईल ती जर हिंसावादी ( military minded ) असेल तर ब्रिटिश लोकांना तिच्यापासून मदतही मिळेल."

" समजा ब्रिटिश लोकांनीं दबावामुळें तुमचें म्हणणें कबूल केलें, " मी पुढें सांगूं लागलों, " तर तुम्हीं तुमच्या सात लाख खेड्यांची प्रजासत्ताक राज्यपद्धती कशी प्रस्थापित कराल ? "

" आज मला तुम्हांला माझी कल्पना मसूद्याच्या मूर्तस्वरूपांत देतां येणार नाहीं," गांधीजी म्हणाले, " मला ती आजच्या आज मांडून दाखवितां येणार नाहीं. ती कल्पना अद्यापी अनुमानमूलकच आहे ( theoretical ). लोकांच्या प्रतिनिधी मंडळापुढें त्या कल्पनेवरून तयार केलेला मसुदा मांडला जाईल. एखाद्या स्वप्नसृष्टींत वावरणाऱ्या ध्येयवादी व्यक्तीच्या डोक्यांतून तयार झालेल्या कल्पनेला फारशी किंमत येणार नाहीं. "

" ठीक तर, " मी म्हणालों, " या कल्पनेचें अंतरंग न समजण्याइतका कांहीं मी मठ्ठ डोक्याचा नाहीं. हातविणीची खादी किती अमोल आहे याची मला चांगली कल्पना आहे. "

" पण तुम्हाला भाज्यांची किंमत कुठें कळते आहे ? " गांधीजी म्हणाले.

" मला दुपारच्या जेवणाला व रात्रींच्या जेवणाला त्याच त्या भाज्या असलेलें आवडत नाहीं ही गोष्ट खरी आहे. " ते हंसले व आम्हीं सारेजण हंसलों. आमचें जेवण संपून आम्हीं उठलों.

पाहुणघरांतल्या एका खोलींत मी व नेहरू आज दुपारचे तीन तास विचार-विनिमय करीत बसलों होतों. ते आपल्या खाटेवर मांडी घालून बसले होते नि मी त्या खोलींतल्या एकुलत्या एकव्या खुर्चीवर बसलों होतों. आम्हीं मानवीसौख्य, संस्कृती, समाजाची सुधारणा कशी करतां येईल कीं ज्यामुळें मानवी जीवन अधिक सात्विक बनूं शकेल, अमेरिका, रशिया, हिंदुस्थान या विषयांवर खूप खूप खल केला. ते जेवढे पूर्वी सोव्हिएटच्या बाजूचें होते तेवढे ते आज नाहींत. पण ते चीनचे विलक्षण पक्षपाती आहेत आणि आज ते गांधीजींच्या बरोबर चीनविषयीं बरेंच बोलत होते. त्यांच्या वादविवादांत बरीच देवघेव ( give and take ) होऊन गांधीजी नेहरूंना आपल्या मताकडे खेंचून नेतील व कायदेभंगाच्या चळवळीच्या आवश्यकतेविषयीं त्यांचें मन वळविल्याशिवाय रहाणार नाहींत. नेहरू इथें आले त्यावेळीं त्यांचें मन बरेंच साशंक होतें. प्रेसिडेंट रूझव्हेल्टनीं

हिंदुस्थानविषयक बाबतींत ब्रिटनशीं रदबदली करावी अशी त्यांची अपेक्षा होती. पण युद्ध चालू असेतोंपर्यंत हिंदुस्थानसंबंधीं आपण कांहीं एक विचार करणार नाहीं अशी हटवादी वृत्ती ब्रिटननें स्वीकारल्यामुळें गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाचा अवलंब करून ब्रिटनवर दबाव आणायचा, या कल्पनेला नेहरूंसारख्या राष्ट्रीय वृत्तीच्या पुरुषाला त्यांतील अपरिहार्यत्व एकदम पटलें.

मी नेहरूंना अमेरिकेस जाऊन प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्याशीं या बाबतींत विचारविनिमय करण्याची सल्ला दिली. मी त्यांना असेही सांगितलें कीं कोणत्याही देशाच्या स्वातंत्र्याच्या मागणीबद्दल अमेरिकन जनतेंत पूर्ण सहानुभूती असलेली आढळून येईल. अमेरिकेचे हिंदुस्थानांतील आर्थिक हितसंबंध ब्रिटनच्यापेक्षां किती तरी निराळे आहेत ही गोष्टही मी त्यांना समजावून सांगितली.

आम्हीं हिंदुधर्मावरही खूप चर्चा केली. हिंदुधर्म हा कांहीं मूलतः **आग्रही** धर्म नाहीं ( fundamentalism). त्यामुळें एखादा हिंदू सुधारकासारखा वागूं लागला तर त्याला धर्माच्या कायद्याखालीं शिक्षा ठोठावतां येणार नाहीं, किंवा त्याला धर्मबाह्यही करतां येणार नाहीं. " माणूस हिंदू असून अनीश्वरवादी असणें शक्य आहे, " ते म्हणाले. " आज सकाळीं गांधीजी म्हणाले त्याप्रमाणें तुम्हीं जातपात मानीत नाहीं किंवा अस्पृश्यता जुमानीत नाहीं. म्हणून तुम्ही हिंदू नाहींत असें म्हणतां येणार नाहीं. त्याच प्रमाणें तुम्हीं अगदीं धार्मिक वृत्तीचे सनातनी हिंदू असून-सुद्धां तुम्हाला येशू ख्रिस्ताचें चित्र आपल्या भिंतीवर टांगायला कांहीं एक अडचण पडणार नाहीं, कीं ख्रिस्ती तत्त्वांचा अवलंब करण्याची तुम्हांला हरकत केली जाणार नाहीं. "

जून ८, १९४२

माझ्यापासून तीन फूट अंतरावर असलेल्या खाटेवर नेहरू झोंपीं गेले. रात्रीच्या आवाजामुळें आपली झोंपमोड झाली असें ते म्हणाले. आश्रमांतील आपल्या कांहीं मित्रांशीं वादविवाद करून रात्रीं सव्वानवाच्या सुमारास ते परत आल्याचें मला सांगत होते. त्यांना माझ्याशीं वादविवाद करायचा होता. पण मला अगदीं गाढ झोंप लागलेली होती.

आज पहाटें सहा वाजतां नेहमीं भोंवतालीं असणाऱ्या आठदहा शुभ्रवस्त्र परिधान केलेल्या परिवारांतील मंडळींच्या समवेत गांधीजी बाहेर फिरावयास निघाले

होते. आज त्यांचा मौनाचा दिवस होता. मला त्यांनीं आगाशींत उभा असलेला पाहिलें. तेव्हां त्यांनीं हात उंच उचलून मला अभिवादन केलें. मी माझा सकाळचा वेळ नेहरूंशीं संभाषण करण्यांत व टंक करण्यांत घालविला.

दुपारच्या सुमारास आरण्यकम् माझ्याकडे आले. त्यांनीं कोलंबिया युनिव्हर्सिटींत ड्यूई व थॅर्नडाइक यांच्या समवेत अभ्यास केलेला होता. त्यांनीं एडिंबरो, केंब्रिज व ऑक्स्फर्ड या युनिव्हर्सिट्यांतून डिग्र्या मिळविल्या होत्या. त्यांनीं माझ्यासाठीं एक पांढरा स्वच्छ हातविणीचा खादी सूट व चपला आणून दिल्या. कारण सेवाग्रामच्या वाळूनें व गोट्यांनीं माझ्या चपलांना भोकें पडलीं होतीं. आपल्या अमेरिकेंतील शिक्षणाविषयीं बोलत असतांना त्यांनीं मला "एस्. एस्. बेरेंगारिया" या बोटीवरून न्यूयॉर्कला केलेल्या आपल्या प्रवासाची एक मजेदार आठवण सांगितली. आपण काळे असल्यामुळें आपल्याला स्वयंपाकघरांतील वाढप्यानें ( Steward ) वाढायचें साफ नाकारलें अशी त्यांची तक्रार होती. ही गोष्ट त्यांच्या जिवाला भिनली होती. त्यांचें विशिष्ट कार्य म्हणजे मूलभूत शिक्षणपद्धती ( Basic Education ). त्याचा अर्थ असा कीं खेड्यापाड्यांतील मुलांना हातकाम शिकविणें हा होय; मुख्यतः सूत कांतणें, विणणें व शेतीवाडीचें काम. त्यांनीं असें सांगितलें कीं १९३७ ते १९३९ पर्यंतच्या अवधींत निरनिराळ्या इलाख्यांतून कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ असतांना त्यांनीं या मूलभूत शिक्षणपद्धतीस बरीच चालना दिलेली होती. पण ब्रिटिश लोकांनीं या शिक्षण पद्धतीला प्रोत्साहन दिलें नाहीं. ब्रिटिश शिक्षणपद्धती हिंदुस्थानांत निष्फळ ठरली हें सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धतीवरील सरकारी ब्रिटिश रिपोर्टांतील उतारे काढून दाखविले. हिंदुस्थानांतील शिक्षणयोजनेचा उपयोग म्हणजे ब्रिटिश राज्याला उपयोगी पडतील असले कारकून तयार करायचे व ऑफिसर्सही तयार करायचे असा त्यांचा दावा होता. खालच्या वर्गांतील लोकांना शिक्षण देण्याविषयीं ब्रिटिश सरकारला कांहीं फायदा वाटत नाहीं. त्यांना फक्त आपल्या उपयोगी पडेल एवढाच मध्यम वर्गांतील कांहीं भाग सुशिक्षित करावयाचा आहे. त्यामुळें हिंदुस्थानांत मध्यमवर्गीय राष्ट्रीयत्व निर्माण झालें. नुकत्याच ब्रिटिश सरकारनें कांहीं ट्रेनिंग कॉलेजच्या इमारती आपल्या ताब्यांत घेतल्या आहेत.

नेहरू, आतांपर्यंत आरण्यकम्चें म्हणणें ऐकत होते व तें त्यांचें म्हणणें त्यांना मान्यही होतें. ते म्हणाले, शांतीच्या काळांत जो पैसा ब्रिटिश सरकार लष्करासाठीं खर्च करीत असतें त्यांतला थोडासा अंश जरी खेडूतांच्या शिक्षणासाठीं त्यानें खर्च केला असता तरी आज खेडूत इतका अशिक्षित असलेला आढळून आला नसता. ब्रिटिश सरकार नेहमीं आपल्यापाशीं पैसा नाहीं अशी सबब पुढें करीत असतें, त्यामुळें त्याला पुरेशा शाळा काढणें शक्य होत नाहीं, असें आरण्यकम्चें म्हणणें आहे. त्यांनीं मला सरकारी खानेसुमारीचे कांहीं आंकडे दाखविले. १९२१ सालीं हिंदुस्थानांतील प्रजेच्या साक्षरतेचें प्रमाण शेंकडा सात होतें; १९३१ सालीं तें प्रमाण आठावर गेलें. " अहो थोडा विचार करून पहा, " आरण्यकम् उपरोधी स्वरांत म्हणाले–आणि या उपरोधामुळें त्यांच्या अंतःकरणाला व्यथा होत होती हें स्पष्टपणें दिसून येत होतें–" दहा वर्षांत शेंकडा एक या प्रमाणांत आमच्या साक्षरतेची प्रगति आहे. " १९४१ सालचे खानेसुमारीचे आंकडे पहातां ते खात्रीलायक नाहींत असें समजलें.

आज गांधीजींचें मौन अंमळ लवकर संपलें नि मला दुपारचे तीन वाजतां माझ्या नेहमींच्या मुलाखतीसाठीं त्यांना भेटायला जाणें शक्य झालें. " हिंन्दुस्तानच्या अत्यंत कठिण प्रश्नाविषयीं आपण अद्याप बोललोंच नव्हतों, " अशी मी बोलायला सुरुवात केली, " आणि हा प्रश्न सोडविणें अत्यंत कठिण दिसतें. "

" कोणता तो प्रश्न ? " गांधीजींनीं विचारलें. " हिंदुस्थानची लोकसंख्या, " मी म्हणालों. " ही दर वर्षी पन्नास लाखांनीं वाढते आहे. ब्रिटिश सरकारी आंकडेपत्रकावरून असें आढळून येतें कीं १९३१ सालीं हिंदुस्थानची लोकसंख्या ही तेहतीस कोटि ऐंशी लक्ष होती ती १९४१ सालीं ३८ कोटी ८० लक्ष झाली. आणखी पन्नास लाख लोकांचीं पोटें भरायचीं नि आणखी पन्नास लाखांना वस्त्र-प्रावरणाची सोय करून द्यायची. आणखी दहा वर्षांत पांच कोटींनीं वाढ ! आपण हा प्रश्न कसा हाताळणार आहांत ? " " यांतील एक उत्तर संतति–नियमन " गांधीजी म्हणाले. " पण मी स्वतः संतति नियमनाच्या विरुद्ध आहें. " " मी नाहीं, " मी म्हणालों. " हिंदुस्थानासारख्या मागासलेल्या राष्ट्रांत संतति-नियमनासारख्या उपायांचा फारसा फायदा होणार नाहीं. "

" मग एखादी रोगराई आली पाहिजे, " गांधीजी हंसले.

" किंवा एखादें आपापसांतील युद्ध, " मी विषण्णतेनें सुचविलें. " पण " मी म्हणालों, " सोव्हिएट रशियांत दुष्काळ होते, रोगराई होती, आपापसांतील युद्धें होतीं तरीसुद्धां तिची प्रजा खूप जोमानें वाढतच होती. त्यासाठीं १९२८ सालीं बोल्शेव्हिकांना कांहीं आर्थिक उपायांची योजना करावी लागली होती. "

" हिंदुस्थानांत जलदी उद्योगधंद्यांची वाढ झाली पाहिजे, असें तुम्हीं जबरदस्तीनें माझ्याकडून वदवायचें ठरविलेलें दिसतें, " गांधीजी म्हणाले. " मी जबरदस्तीनें अशी कबूली देणार नाहीं. ब्रिटिश राज्य हिंदुस्थानांतून काढून टाकणें हा आम्हांपुढें आज मुख्य प्रश्न आहे. म्हणजे आम्हीं स्वतंत्र होऊं, हिंदुस्थानाला आवश्यक असलेल्या गोष्टी करण्यासाठीं आम्हीं मोकळे होऊं व बाहेरच्या अडचणींना आम्हीं जुमानणार नाहीं. ब्रिटिशांनीं आम्हांला कांहीं कारखाने चालविण्याची मुभा दिली आहे तर कांहीं काढण्याची मना केलेली आहे. छेः ! माझ्यापुढचा मुख्य प्रश्न म्हणजे हिंदुस्थानांतून ब्रिटिश सत्तेचें उच्चाटण करणें हा होय. "

खरोखरी याच प्रश्नासंबंधीं त्यांना मुख्यतः बोलवयाचें होतें. पुढील अस्पष्ट भविष्याविषयीं त्यांना कळकळ वाटत नव्हती. " बरें " मी विचारलें, " आपल्याला आपल्यापुढें असलेल्या कायदेभंगाच्या चळवळीविषयीं काय वाटतें ? ती चळवळ कोणतें स्वरूप धारण करील ? "

गांधीजी सांगूं लागले, " खेड्यापाड्यांतून लोक सरकारसारा देण्याचें साफ नाकारतील. सरकारी बंदी असतांहि लोक मीठ तयार करूं लागतील. दिसायला ही गोष्ट लहान दिसते खरी; कारण मिठावरील करापासून फारच क्षुल्लक रक्कम सरकारी खजिन्यांत जात असते. पण आपण कर देण्याचें साफ नाकारूं शकतों या गोष्टीमुळें आपण एखादी गोष्ट स्वतंत्रपणें करण्यास सिद्ध आहोंत ही जाणीव खेडूतांच्या अंतःकरणांत निर्माण होते. त्याची दुसरी पायरी म्हणजे जमिनी आपल्या ताब्यांत घेणें. "

" जबरदस्तीनें ? " मी विचारलें.

" होय, जबरदस्तीही करावी लागेल, पण पुनः जमिनींचे मालक सहकार्य करण्यास सिद्ध होतील. "

" आपण आशावादी आहांत, " मी म्हणालों.

" ते पळून जाऊन सहकार्य करतील, " गांधीजींनीं उत्तर दिलें.

नेहरू आतांपर्यंत अगदीं शांतपणें माझ्यापाशीं बसले होते. ते आतां म्हणाले, आपल्या पायांनीं ते जमिनी हिसकावून घ्याव्या असें आपलें मत देतील. तुम्ही आपल्या मेन अँड पॉलिटिक्स या ग्रंथांत म्हटलें आहेना, कीं लेनिननें म्हटल्या-प्रमाणें १९१७ सालीं रशियन सोल्जरनें आपल्या पायांनीं तह व्हावा असें आपलें मत दिलें–म्हणजे तो खंदकांतून पसार झाला. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील जमिनीचे मालकसुद्धां आपल्या खेड्यांतून पळून जाऊन जमिनी हिसकावून घेतल्या जाव्या या प्रश्नावर आपलीं मतें देतील. "

" किंवा, ते जबरदस्तीनें प्रतिकार करण्यासही सिद्ध होतील, " मी म्हणालों.

" पंधरा एक दिवस बंडाळी होईल, " गांधीजी विचार करूं लागले, " पण आम्ही लवकरच या बंडाळीचा बींमोड करूं शकूं अशी मला उमेद आहे." "मग आपल्याला हें एकंदरींत कबूल आहे कीं कांहीं एक नुकसानभरपायी न देतां जमिनी जबरदस्तीनें जप्त करायला कांहीं हरकत नाहीं, " मी विचारलें. " अर्थातच, " गांधीजींनीं कबूल केलें. " जमिनीच्या मालकांना नुकसानभरपायीचे रुपये देणें आर्थिक दृष्टीनें अशक्यच होईल कोणालाही. "

" ही झाली खेड्याची गोष्ट, " मी म्हणालों. " पण खेडीं म्हणजे कांहीं सारा हिंदुस्थान नव्हे. "

" नव्हे, " गांधीजी म्हणाले. " शहरांतील कामकरी कारखाने सोडून देतील. आगगाड्या बंद पडतील. "

" सार्वत्रिक हरताळ, " मी स्वतःला प्रश्न केला. मी म्हणालों, " मला माहीत आहे कीं आपल्याला पूर्वी या बाबतींत खेडूतांचा खूपच पाठिंबा मिळालेला होता, पण त्या मानानें शहरवासी कामकऱ्यांचा आपल्याला तितकासा पाठिंबा नाहीं. "

" नाहीं, " गांधीजींनीं कबूल केलें. " हो तेवढा पाठिंबा नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण या खेपेला मात्र कामकरीसुद्धां या कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेणार आहेत, कारण प्रत्येकाला, हिंदूला, मुसलमानाला, अस्पृश्याला, शिखाला, कामकऱ्याला, खेडूताला, कारखानदाराला, हिंदी सिव्हिल सर्व्हंटला आणि राजेरज-वाड्यांना सुद्धां आज स्वातंत्र्य हवें आहे. साऱ्या राष्ट्राला आज काय हवें आहे

याची मला चांगली अटकळ आहे. राजेलोकांना आज देशांत नवे वारे वाहाताहेत हें कळून चुकलें आहे. आतांपर्यंत गोष्टी चालल्या तशाच यापुढेंही चालणार नाहींत. ज्या युद्धामुळें ब्रिटिशांचें राज्य आम्हावर कायमचें लादले जाईल असल्या युद्धाला आम्ही मदत करणें शक्य नाहीं. हिंदुस्थान स्वतः प्रजासत्ताक ( democratic ) नसतांना आम्हाला जपानच्या, जर्मनीच्या व इटलीच्या प्रजासत्ताक राज्यपद्धतीसाठीं कसें भांडतां येईल ? मला चीनला वांचवायचें आहे. चीनचें कोणत्याही प्रकारचें नुकसान व्हावें असें मला वाटत नाहीं. पण सहकार्य करण्यासाठीं आम्हीं स्वतः स्वतंत्र असणें अपरिहार्य आहे. गुलाम कांहीं दुसऱ्याच्या स्वातंत्र्यासाठीं लढत नसतो ! "

मी विचारलें, " आपल्या कायदेभंगाच्या चळवळींत आपल्याला मुसलमानांचा पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा आहे का ? "

" आरंभीं आरंभीं कदाचित् नसेल मिळणार, " गांधीजी म्हणाले. " पण चळवळीला यश मिळत चाललें असें पाहिल्याबरोबर ते त्यांत सामील होतील. "

" या तुमच्या चळवळींत विघ्नें उत्पन्न करण्यासाठीं किंवा ती अजीबात बंद पाडण्यासाठीं मुसलमानांचा उपयोग केला जाणार नाहीं असें आपल्याला वाटतें काय ? "

" निःसंशय, " गांधीजींनीं कबूल केलें. " त्यांचे पुढारी किंवा सरकार त्या बाजूनें खटपट करतील, पण करोडो मुसलमान स्वातंत्र्य-प्राप्तीच्या विरुद्ध नाहींत, आणि त्यासाठीं ते आमच्या चळवळीला विरोध करणार नाहींत; कारण त्यांना हवें असलेलें स्वातंत्र्य या चळवळीपासून प्राप्त होणार आहे. कॉंग्रेसच्या एकमेवध्येयाविषयीं— हिंदुस्थानच्या पूर्ण स्वातंत्र्याविषयीं मुस्लिम जनतेच्या अंतःकरणांत सहानुभूती आहे. याच पक्क्या खडकाच्या भक्कम पायावर हिंदु-मुस्लिम एकीची इमारत बांधली जाईल.

आमच्या वादविवादाचा रोख पुनः एकवार हिंदुस्थानच्या वाढत्या लोकसंख्येवर व्हावा म्हणून मी अगदीं शेवटचा प्रयत्न चालविला. त्याला त्यांनीं फक्त एवढेंच उत्तर दिलें, " खूप मोठ्या प्रमाणावर हिंदुस्थानांत उद्योगधंद्याची वाढ व्हावयाची असेल तर त्यासाठीं मध्यवर्ती सरकारनेंच कंबर कसायला हवी. "

संध्याकाळीं मी महादेव देसायांच्या झोपडींत गेलों नि त्यांचें सूत कांतणें मोठ्या औत्सुक्यानें पहात बसलों. ते " हरिजन " चे संपादक आहेत.

" हरिजन " म्हणजे गांधीजींचें इंग्रजी भाषेंतील साप्ताहिक. त्यांनीं गांधीजींना " आत्मवृत्त " लिहिण्यास मदत केली होती. आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षीं त्यांनीं आपली वकिली सोडल्याचें मला सांगितलें, आणि तेव्हांपासून त्यांचा गांधीजींशीं अगदीं निकट संबंध आलेला आहे. १९३९ सालापासून गांधीजींच्या कोणाही परदेशस्थ गृहस्थाशीं झालेल्या मुलाखतीपेक्षां तुमची मुलाखत अत्यंत महत्त्वपूर्ण होती असें त्यांनीं मला सांगितलें. गांधीजी जें जें बोलतात त्या साऱ्यांचीं ते टांचणें करून ठेवीत असतात. त्यांनीं माझ्या संभाषणांचीं टांचणेंसुद्धां तयार केलेलीं होतीं. खालीं जमिनीवर बसून सूत कांतणें किती आरामाचें व सौख्यदायी असलें पाहिजे त्याचा मी स्वतः खालीं बसून अनुभव घेतला.

मी देसायांना म्हणालों, " इतके दिवस मी गांधीजींचीं भाषणें अत्यंत काळजीपूर्वक ऐकत आलों आहें नि त्यांच्या मुलाखतींचीं टांचणेंही मी तयार करून ठेविलेलीं आहेत. तीं मी पुनः पुनः वाचून काढलेलीं आहेत व त्यावर मी खूप विचार केलेला आहे आणि गांधीजींच्या विलक्षण प्रभावाची गंगोत्री कुठें आहे याचा मी काळजीपूर्वक शोध चालविला आहे. माझा असा निर्णय झाला आहे कीं गांधीजींच्या प्रभावाचें मुख्य कारण म्हणजे त्यांच्या अंतःकरणांतील तीव्र तळमळ होय. "

" अगदीं बरोबर," देसाई म्हणाले.

" त्यांच्या या तीव्र तळमळीचें मूळ काय ? " असा मी प्रश्न केला.

" या तळमळीचें मूळ सर्व शारीरिक भोगांचा व वासनांचा संपूर्ण संन्यास यांत आहे. "

" कामवासना ? "

" कामवासना, राग लोभ, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा. आपल्या हातून चूक झाली तर ते ती तेव्हांच कबूल करतील. ते स्वतःला दंड करूं शकतात व दुसऱ्यांच्या पातकांसाठींही स्वतःला शासन करायला ते मागें पुढें पहात नाहींत. एकदां कायदेभंगाच्या चळवळीनें हिंसक स्वरूप धारण केलें म्हणून त्यांनीं ती चळवळ ताबडतोब थांबविली. गांधीजींचा आपल्यावर संपूर्ण ताबा आहे. यामुळें त्यांच्या शरीरांत विलक्षण शक्ति व तळमळ उत्पन्न होत असते. "

# जून ९, १९४२

माझी अशी खात्री झाली आहे कीं पाश्चिमात्य लोकांपेक्षां हे हिंदी लोक अधिक प्रामाणिक आहेत. ते स्वतःविषयीं अधिक प्रामाणिकपणानें बोलत असतात. ते आत्मविश्लेषण व आत्मसमीक्षण करण्यांत अधिक तरबेज आहेत.

जून ९, १९४२

उद्या हैदराबादला जाण्यासाठीं निघायचें मी ठरविलें आहे. ही हैदराबाद संस्थानची मुख्यराजधानी असून तेथें निझाम इंग्रजांच्या साहाय्यानें एक कोटि साठ लाख लोकांवर राज्य करीत असतो. मला इथें ( सेवाग्रामांत ) आणखी कांहीं दिवस रहायला मुळींच हरकत नाहीं. गांधीजींनीं मला तसा आग्रहही केला. पण मी सेवाग्रामला फक्त दोन किंवा तीन दिवसच रहाण्याचा बेत करून आलों होतों. आतां मला निघेलेंच पाहिजे. पहाटें साडेपांच वाजतां मी दाढी केली व न्याहारी आटोपून गांधीजी आंब्याचा आस्वाद घेत बसले होते त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचलों. " मी एकदा बंगालमध्यें खूप काम करीत असतां नुसत्या आंब्यावरच गुजारा करीत असें, " असें ते म्हणाले.

" एखादा इंग्रज किंवा एखादा अमेरिकन इतके परिश्रम करता तर तो बीफस्टेक ( गोमांसभक्षण ) वर ताव मारता. "

" हाच तर मुख्य फरक आहे, " गांधीजी म्हणाले. " ब्रिटिशांच्या शाकाहारांत तरी बदल कुठें असतो ? बटाटे नि कोबीच नेहमीं. "

आम्हीं बोलत बसलों असतां गांधीजींचा पुतण्या कनू गांधी यानें आमचे फोटो घेतले.

आम्हीं फिरायला निघालों तेव्हां मी वाटेंत म्हणालों, " आपण आपल्या कामाविषयीं व साऱ्या जगाविषयीं सुद्धां इतक्या स्वत्वशून्यवृत्तीनें वागत असतां असें मला आढळून आलें आहे. म्हणून मला आपल्याला असें विचारावेंसें वाटतें कीं आपल्या स्वतःविषयीं इतक्या स्वत्वशून्यतेनेंच वागा. हा माझा आपल्याला वैयक्तिक प्रश्न नसून तो राजकीय स्वरूपाचा आहे. आपला जो जनतेवर एवढा प्रभाव आहे तो कशामुळें ? "

" तुम्हीं हा प्रश्न कोणत्या उद्देशानें केलेला आहे हें माझ्या ध्यानांत आलें, " गांधीजींनीं उत्तर दिलें. " मला वाटतें कीं मी सत्याचा पाठलाग करीत असतों म्हणून माझा जनतेवर प्रभाव असूं शकेल. तें माझें ध्येय आहे. "

"सत्याचा प्रभाव किती आहे हें मी केव्हांही नाकबूल करीत नाहीं," मी वाद करूं लागलों. "पण हें उत्तर कांहीं बिनतोड नाहीं असें मला वाटतें. कारण हिटलरसारखे **नेताजी** जगांत खोटें बोलूनच आपली सत्ता गाजवीत असतात. याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं आपल्याला सत्याचा आश्रय करून जगावर प्रभाव गाजवितां येणार नाहीं. पण इथें किंवा जगांत इतरत्र कोठेंही सत्याचा नेहमीं जय होतोच असें आढळून येत नाहीं." मी पुढें विचारूं लागलों, "आपल्या-पाशीं अधिकारसूत्रें नाहींत, प्रभाव गाजविण्यास उपयुक्त असें एकही साधन आपल्यापाशीं नाहीं. आपलें सरकार नाहीं कीं आपल्या हाताखालीं पोलीस नाहीं, आपल्यापाशीं सत्तेचें अवडंबर नाहीं कीं प्रचंड सामर्थ्यवान संघही नाहीं. कारण मी असें ऐकलें आहे कीं कॉंग्रेस ही संस्था कांहीं कडक शिस्तीच्या पायावर उभारलेली संस्था नव्हें—मग हें आपण कसें साध्य केलेंत कीं ज्यामुळें कोट्यावधी जनतेवर आपला एवढा प्रभाव प्रस्थापित व्हावा, कीं ज्यामुळें कोट्यावधी लोक आपलें स्वार्थी सौख्य कुरबान करून आपल्या जिवाला जीव द्यायला तयार व्हावेत?"

"सत्य म्हणजे कांहीं शब्दनिष्ठ वस्तू नव्हे." गांधीजी म्हणाले. "सत्य म्हणजे सत्यजीवन." ते बोलण्याचे थांबले—आपण अगदीं साधें जीवन व्यतीत करीत असतों त्याचें मी मनन करावें अशी त्यांची इच्छा असावी असें मला वाटलें. "माझ्यापाशीं कांहीं साधनसामुग्री नाहीं हें मला कबूल आहे. माझें शिक्षणही फारसें झालेलें नाहीं. मीं कांहीं फारसें वाचीत पण नसतों." इथें ते थांबले.

"जेव्हां आपण हिंदुस्थानला स्वातंत्र्य पाहिजे असें म्हणतां तेव्हां आपण प्रत्येक हिंदी अंतःकरणाच्या सूक्ष्म धाग्यावर आघात करून त्या ठिकाणीं निनाद उत्पन्न करतां हें खरें आहे ना? गवईसुद्धां असलाच कांहीं तरी परिणाम आपल्या श्रोतृवृंदाच्या अंतःकरणावर करीत असतो. आपण जें गीत वाजवितां त्याचे सूर ऐकण्यासाठीं कितीतरी हिंदी लोक एकसारखी वाट पहात आहेत. लोकांना जें गाणें आवडतें त्याचे आलाप पुनः पुनः ऐकण्यास ते उत्सुक असतात. एखाद्या व्याख्यानांतसुद्धां जे विचार जनतेला आवडलेले असतात त्यांचाच पडसाद वक्त्याच्या तोंडून बाहेर पडला तर श्रोतृवृंद टाळ्यांचा गजर करीत

असतो. लोकांना आपण जें बोलावें व करावें असें वाटतें तेंच आपण बोलतां व करतां हें खरेंना ?" "होय, तें तसें असेल कदाचित्" गांधीजी म्हणाले. "ब्रिटिशांबद्दल माझ्या अंतःकरणांत राजनिष्ठा होती पण पुढें मी बंडखोर बनलों. मी १८९५ पर्यंत राजनिष्ठ होतों."

"आपण १९१४ ते १९१८ च्या दरम्यानसुद्धां राजनिष्ठच होतात नव्हे का ?"

"होय, एका परीनें होतों खरा मी राजनिष्ठ !" त्यांनीं कबूल केलें. "पण तें खरें नव्हतें. १९१८ च्या सुमारास हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्य हें परकी राज्य आहे असें मी प्रतिपादूं लागलों होतों—आणि या राज्याचा अंत झाला पाहिजे." ते पुन्हां स्तब्ध राहिले. आम्हीं पुढें चालतच होतों. अखेरीस ते म्हणाले, "ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडून निघून जावें असें मी कां हट्टानें म्हणूं लागलों त्याची कारण-मीमांसा मी तुम्हांला सांगतों. तें १९१६ साल होतें. मी लखनौ येथें कॉंग्रेससाठीं काम करीत होतों. हिंदुस्थानच्या इतर कोणत्याही खेडूतासारखा दिसणारा एक खेडूत माझ्यापाशीं आला—गरीब व दुबळा, कृश झालेला. तो म्हणाला, 'माझें नांव राजकुमार शुक्ला आहे. मी चंपारण्य जिल्ह्याचा असून आपल्याला आमच्या जिल्ह्यांत येण्यास आमंत्रण देण्यासाठीं मी मुद्दाम इथें आलों आहें.' त्यानें आपल्या गरीब दीन खेडूतांच्या दुर्दशेचें वर्णन करून मला सांगितलें कीं मेहेरबानी करून आपण या जिल्ह्यांत एकदां पायधूळ झाडाच. तो मला स्वतः आपल्या बरोबर घेऊन जाण्यासही सिद्ध होता. चंपारण्य हें लखनौपासून शेंकडों मैल लांब होतें. त्यानें माझी इतकी मनधरणी करून सतत विनवणी केली कीं शेवटीं मी जाण्याचें कबूल केलें. त्याला मी नक्की कधीं निघणार याची तिथि निश्चित करायला हवी होती. पण मला ती निश्चित तिथि देतां येईना. आठवड्यामागून आठवडे, मी जाईन तिथें राजकुमार शुक्ला हिंदुस्थानभर माझ्याबरोबर हिंडत होता. मी ज्या ठिकाणीं मुक्कामास राहीन त्या ठिकाणीं तो मुक्काम करीत होता. शेवटीं १९१७ च्या अखेरीस मला कलकत्त्याला जावें लागलें. राजकुमार माझ्याबरोबर निघाला आणि शेवटीं त्यानें माझें मन वळविलें नि मी त्याच्याबरोबर कलकत्त्याहून चपारण्याकडे जाणाऱ्या आगगाडींत जाऊन बसलों. चंपारण्य जिल्ह्यांत नीळ पिकविली जाते. या ठिकाणीं मी हजारों किसानांच्या गांठीभेटी घ्यायच्या असें ठरविलें व त्याबरोबरच दुसऱ्या बाजूच्या

चित्राचेंही यथातथ्य आकलन व्हावें म्हणून मी येथील ब्रिटिश कमिशनरलाही भेटायचें असें ठरविलें. मी कमिशनरला भेटायला गेलों असतां तो मला दमदाटी दाखवूं लागला, व हा जिल्हा सोडून ताबडतोब निघून जाण्याविषयीं मला उपदेश करूं लागला. मी त्याच्या उपदेशाचा फायदा करून घेतला नाहीं, पण हत्तीवर स्वार होऊन मी एका खेड्याकडे जाण्यासाठीं निघालों. माझ्या पाठोपाठ एक पोलीस जवान माग काढीत येऊन त्यानें आम्हाला गांठलेंच. त्यानें चंपारण्य ताबडतोब सोडून जाण्याचा हुकूम माझ्यावर बजावला. मी ज्या घरीं उतरलों होतों त्या घरापर्यंत माझ्याबरोबर चालण्याची मी त्या पोलीस जवानाला विनंति केली. त्या ठिकाणीं मी सत्याग्रह करण्याचें निश्चित केलें. मी तो जिल्हा सोडून जाण्यास तयार नव्हतों. लोकांच्या प्रचंड झुंडीच्या झुंडी त्या घराभोंवतीं गोळा झाल्या. या झुंडीची नीट व्यवस्था ठेवण्यासाठीं मी त्या पोलीस शिपायाशीं सहकार्य केलें. त्याबरोबर माझ्यामध्यें नि त्या पोलीस शिपायांमध्यें एक प्रकारचा सलोखा–स्नेहभाव निर्माण झाला. हा चंपारण्यांतील माझा दिवस सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा माझ्या आयुष्यांतील दिवस ठरला. माझ्यावर खटला भरण्यांत आला. सरकारी वकील या खटल्याची तारीख पुढें ढकलण्याविषयीं मॅजिस्ट्रेटशीं वादविवाद करीत होता. पण मी खटल्यास सुरुवात करा अशी मागणी करीत होतों. माझ्यावरचा चंपारण्य सोडून जाण्याचा हुकूम मी जुमानीत नाहीं असें मला जगजाहीर करायचें होतें. मी त्यांना सांगितलें कीं या ठिकाणीं वसत असलेल्या दुर्दशेची प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठीं मी इथें आलेलों असल्यानें अर्थातच मला ब्रिटिश कायद्याचें उल्लंघन केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. कारण मी उच्चतर कायद्यानें बांधला गेलेलों होतों. माझ्या सदसद्विवेकबुद्धीच्या हुकुमाची तामिली करणें अत्यंत आवश्यक होतें. ब्रिटिशांच्या विरुद्ध माझा हा पहिला सत्याग्रह होता. माझ्या मातृभूमी हिंदुस्थानच्या कोणत्याही विभागांतून निघून जा असें सांगण्याचा इंग्रजाला अधिकार पोहोंचत नाहीं असें दाखविण्याची माझी इच्छा होती. मीं शांतिदूत या नात्यानें या ठिकाणीं आलों होतों. " मी गुन्हा केला आहे " हा माझा हट्ट सोडून देण्याविषयीं सरकार मला बजावून बजावून सांगत होतें. मॅजिस्ट्रेटनें खटला काढून टाकला. सत्याग्रहाचा जय झाला. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं आमच्या हातीं एक साधन सांपडलें.

हिंदुस्थानांतील आपल्या अढळ स्थानाचा मला वाटतें हाही एक मार्गदीप आहे. " मी केली ती गोष्ट अगदीं साधी होती, " ते मला मध्येंच थांबावून म्हणाले. " मला माझ्या देशांत वाटेल तिकडे सळो किंवा पळो करण्याचा ब्रिटिशांचा अधिकार नाहीं हें मी जाहीर केलें. "

" गोष्ट साधी असेल खरी," मी म्हणालों " पण ती साध्य करणारे आपण पहिले म्होरके होतां. कोलंबस आणि अंडें या गोष्टीसारखीच आहे ही गोष्ट. "

" ती कोणती गोष्ट ? " त्यांनीं विचारलें. आपण कधीं कोलंबस आणि अंडें ही गोष्ट ऐकली नाहीं ? " मी गांधीजींना विचारलें.

" नाहीं ! " त्यांनीं कबूल केलें. " सांगा मला. " मीं त्यांना ती गोष्ट सांगितली. ते खूप हंसले. " अगदीं बरोबर, " ते म्हणाले, " हो, माझ्या स्वतःच्या देशांत मला वाटेल तिथें जाण्याचा अधिकार आहे असें म्हणणें ही साधी गोष्ट आहे खरी, पण यापूर्वी कोणी तसें म्हटलें नव्हतें. "

आतांपर्यंत आम्हीं गांधीजींच्या वसतिगृहापर्यंत येऊन पोहोंचलों होतो.

बरोबर तीन वाजतां मी माझ्या नेहमींच्या मुलाखतीसाठीं येऊन पोहोंचलों. गांधीजी नेहरूंच्या बरोबर जवळ जवळ एक तास बोलत होते. आणखी दहा मिनिटें थांबण्याविषयीं त्यांनीं मला विनंती केली. त्यांना शौचास जावयाचें होतें. शौचास जाऊन आल्यावर ते आपल्या आसनावर बसले तेव्हां त्यांच्या एका सेक्रेटरीनें नुक्तेंच आलेलें एक पत्र त्यांच्या पुढें केलें. गांधीजींनीं तें पत्र घेऊन वाचण्यास सुरुवात केली. वाचतां वाचतां ते हंसत होते. दोन पानें उलटल्यावर त्यांत एक घडी केलेला गाण्याच्या नोटेशनचा कागद मला दिसला. त्या खोलींत बसलेल्या खुर्शेदना हंसत हंसत ते म्हणाले, हं हें घ्या गाणें. मला गाऊन दाखवा पाहूं. त्यांनीं कांहीं ओळीं गुणगुणून गाण्यास सुरुवात केली. मी तें पत्र व गाणें मागून घेतलें. तें त्यांनीं मला दिलें. तें मी माझ्याबरोबर अमेरिकेस घेऊन आलों आहें. त्या पत्रावर " युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका, हॉलिवुड, कॅलिफोर्नियां, १५३५ नॉर्थ होबार्ट बुलेवार्द, मार्च १०, १९४२, असें लिहिलें होतें. पत्त्यावर " महात्मा गांधी, इंडियन नॅशनल काँग्रेस, इंडिया, " असें असून खालीं सही मारिउस् मॅन्निक अशी होती. पत्र असें होतें. " मत्प्रिय महात्माजी, मी एक प्रजा-

सत्ताक या नात्यानें आपल्याकडे हें पत्र पाठवीत आहें. आपणही तें त्याच नात्यानें वाचाल अशी मला उमेद आहे. मी फार दिवसांपासून आपली चहाती आहें. आपली......इत्यादि. गाण्याचें नांव "चला आपण ॲक्सिसला ठोकूं या." असें असून ते डग्लस मॅकार्थर आणि त्यांची फौज यांना अर्पण करण्यांत आलें होतें. कोरस असें होतें.

"चला चलारे परजूंया, परशू हे आमुचे या,
दुष्ट गटाला ठोकाया, चला चलारे परजूंया !
विश्वास आमुचा, कार्य आमुचें आणि करही दिलेला आमुचा
उपयोगी पडेल शत्रूला आमुच्या थोपवाया.
चला चला तर परजूंया परशू हे आमुचे या !
नोमपासून दमास्कस पर्यंत, हाणूंया कर्दन काळाला !

हसणें अंमळ ओसरल्यावर गांधीजी माझ्याकडे वळून म्हणाले, हं आतां चालू द्या तुमचा धूमधडाका.

"गांधीजी ती म्हणजे हिंसा होईलना," मी म्हणालों. "कां बरें आपण कांहीं हिंसेच्या विरुद्ध नाहीं !" त्यांनीं विचारलें.

"पण मी हिंसावादी आहे किं अहिंसावादी आहे याविषयीं आपण एक चकार शब्दही ऐकला नसेल माझ्या तोंडून असें मला वाटतें," मी म्हणालों. "तुम्हालां तें मला सांगावयालाच पाहिजे असें नाहीं," ते हंसत हंसत म्हणाले. "तुमच्याकडे पाहिलें कीं समजून येतेंच तें."

"समजा आपल्या कायदेभंगाच्या चळवळीनें हिंसक स्वरूप धारण केलें—गेल्या कांहीं खेपेस तसें झालें होतें हें आपल्याला चांगलें माहित आहे, तर आपण ती चळवळ एकदम बंद कराल कीं नाहीं ? आपण पूर्वी ती चळवळ बंद केलेली आहे."

"आजच्या परिस्थितींत" त्यांनीं उत्तर दिलें, "मी कायदेभंगाची चळवळ मागें खेंचणार असा प्रसंग उद्भवणार नाहीं असें म्हणणें चुकीचें ठरेल. मी पूर्वी अत्यंत काळजीपूर्वक वागत आलों आहें. तें माझ्या स्वतःच्या व माझ्याशीं सहकार्य करणाऱ्या लोकांच्या शिक्षणासाठीं अत्यंत इष्ट होतें. पण मी पूर्वी वागलों त्याप्रमाणें आतां वागणार नाहीं."

## जून ९, १९४२

"आतां मी लवकरच या आपल्या खेड्यांतून जाणार असल्यानें," मी विचारूं लागलों, "आपले विचार बरोबर समजले आहेत किंवा नाहींत हें जाणण्याची माझी इच्छा आहे. मला आपल्याला असें विचारायचें आहे कीं आपण ज्याची मागणी करीत आहांत आणि कांहीं गोष्टी आपल्याला ब्रिटिश सरकार देऊं करीत आहे यामध्यें कांहीं तडजोड घडवून आणणें शक्य आहे किंवा नाहीं? समजा क्रिप्सच्या योजनेंत (देणगींत) कांहीं फेरफार केला गेला तर ती योजना आपल्याला मंजूर होईल किंवा नाहीं?

"नाहीं," गांधीजींनीं जबाब दिला. "क्रिप्सच्या योजनेनुसार असलेली देणगी आम्हाला मुळींच मंजूर नाहीं. आम्हाला ब्रिटिशांनीं येथून कायमचें निघून जावें व तेंसुद्धां त्यांत बिलकूल बदल होणार नाहीं अशा तऱ्हेनें, हें आम्हाला हवें आहे. मी नेहमीं तडजोडप्रिय असलेला इसम आहें. याचें कारण असें कीं माझें म्हणणें नेहमींच बरोबर असतें असें मला वाटत नाहीं. पण आतां माझ्या अंतःकरणांत भविष्यकालीन न डळमळणारी प्रगति प्रामुख्यानें उभी आहे. निघून जायचें किंवा न निघून जायचें यामध्यें आतां तडजोड नाहीं हें खास. ब्रिटिशांनीं इथून सहीसलामत चालतें व्हावें अशी माझी मागणी नाहीं. पण राजकीय हक्क हे ब्रिटिशांच्या हातां-तून हिंदी लोकांच्या हातीं आलेच पाहिजेत असा माझा हट्ट आहे."

"पण वेळेची कांहीं मर्यादा आहे किंवा नाहीं?" मी प्रश्न विचारला. "समजा आपण कायदेभंगाची चळवळ सुरू केली, आणि ब्रिटिश हरले तर त्यामुळें राजकीय हक्क आपल्याला मिळणें शक्य होईल का?"

"ब्रिटिशांनीं येथून दोन दिवसांत किंवा दोन आठवड्यांत निघून जायचें कांहीं कारण नाहीं. पण त्यांनीं राजकीयरीत्या इथून ताबडतोब संपूर्ण व कायमचें निघून जायला हवें यांत शंका नाहीं."

"समजा कीं, ब्रिटिश म्हणूं लागले आम्हीं हें युद्ध संपल्यावरच येथून निघून जाऊं तर?" मी विचारलें.

"मग मात्र माझ्या मागणीचा बराचसा जोर कमी होतो खरा. त्यांनीं आतांच निघून चालतें व्हावें अशी माझी मागणी आहे म्हणजे आम्हाला रशियाला व चीनलाही मदत करतां येईल. आज त्यांच्या मदतीसाठीं धावणें माझ्या पूर्ण आवांक्या-

बाहेरची गोष्ट आहे. माझ्या अंतःकरणांतील परोपकारबुद्धीनेंच हा मार्ग मला सुचविला आहे. तूर्त हिंदुस्थान माझ्या दृष्टीसमोरून अदृश्य झाला आहे. मला स्वातंत्र्य हें स्वार्थी बुद्धीनें फक्त हिंदुस्थानासाठींच नको आहे. कूपमंडुकवृत्ति स्वीकारावी अशी माझी केव्हांही इच्छा नव्हती."

"आपल्याला यापूर्वी असें कधीं वाटलें नव्हतें, गांधीजी," मी म्हणालों.

"हे विचार माझ्या अंतःकरणांत एकसारखे फुलून निघत असतात. ब्रिटिशांनीं येथून चालतें व्हावें हा विचार मला एकाएकीं सुचला. क्रिप्सयोजनेचा बोजवारा उडाल्यामुळेंच ही कल्पना मला सुचली. ते येथून निघून गेल्याबरोबर या कल्पनेनें माझ्या मनाची पकड घेतली.

"अगदीं नक्की केव्हां सुचली ही कल्पना आपल्याला ?" मी विचारलें.

"क्रिप्स परत गेल्यानंतर लगेच. मी होरेस अलेक्झांडर (हिंदुस्थानचे ब्रिटिश मित्र) यांना एक पत्र लिहिलें. तें त्यांच्या पत्राचें उत्तर होतें. त्यानंतरच या कल्पनेनें माझ्या मनाची पक्की पकड घेतली. मग प्रचारकार्याला सुरुवात झाली. नंतर मी ठरावाचा मसूदा तयार केला. क्रिप्सच्या योजनेचा बोजवारा उडाला याला आपल्यापाशीं कांहींतरी उत्तर पाहिजे असें मला प्रथम वाटलें.

क्रिप्सच्या योजनेचा बोजवारा उडालेला, आणि आमच्यापाशीं स्वतःची अशी योजना नाहीं तर काय फजिती होईल आमची ? मी त्यांना निघून जाण्यास सांगतों आहें. हे विचार आमच्या मनांत मुख्यतः उद्भवण्याचें कारण असें कीं आमच्या साऱ्या आशा-आकांक्षांची राखरांगोळी झालेली होती. जवाहरलालांच्याकडून व इतर सद्‌गृहस्थांकडून मला क्रिप्सविषयीं माहिती मिळालेली होती तरीसुद्धां त्यांचें मिशन अगदीं थंडें पडलें. मी स्वतःला प्रश्न विचारला कीं आतां याला काय उपाय करावा बरें ? ब्रिटिश इथें असल्यानेंच आमची कुचंबणा होते आहे. सोमवारच्या दिवशीं मी मौनव्रत धारण केलें असतां हा विचार मला सुचला. माझ्या मौनांत कितीतरी विचारांचा जन्म झालेला आहे. मौनाचा माझ्या विचारांवर पगडा बसला नि विचारांचा माझ्यावर पगडा बसला, त्यामुळें रशिया, चीन व हिंदुस्थान यांच्यासाठीं मला कंबर कसण्याची आवश्यकता वाटूं लागली. चीनसाठीं माझें अंतःकरण तिळतिळ तुटतें. चियांग कायशेक व त्यांच्या सुविद्य पत्नी

यांच्याबरोबर घालविलेले पांच तास मी विसरणें शक्य नाहीं. निदान चीनकरतां तरी मला एवढें केलेंच पाहिजे. जगाच्या दु:खानें माझ्या विचारांवर मी केवढा तरी भार लादतों आहें."

"पण हें आपलें कार्य युद्ध संपेपर्यंत कां थांबूं शकणार नाहीं बरें ?" मी विचारलें.

"कारण आतां हें युद्ध चालू असतांच मला कामाला लागलें पाहिजे म्हणून," त्यांनीं उत्तर दिलें. "आपली चळवळ चालविण्यासाठीं आपल्यापाशीं कोणती एकादी राजकीय संस्था वगैरे कांहीं आहे कीं नाहीं ?" मी विचारलें.

"आमची राजकीय संस्था म्हणजे कॉंग्रेसपक्ष (पार्टी)," त्यांनीं उत्तर दिलें ! "पण कॉंग्रेस जर माझ्या मदतीस धावली नाहीं तर माझ्यापाशीं दुसरी एक संस्था आहे—आणि ती म्हणजे मी स्वतः ! विचारांनीं पूर्णपणें पछाडलेला असा मी एक इसम आहें. अशा इसमाच्या मदतीला एखादी संस्था न धावली तर तो स्वतःच संस्था बनूं शकतो."

आजची जी जनतेच्या विचारांची प्रणाली आहे तिच्यावर आपला पूर्ण विश्वास आहे का ? जनता आपल्या मागोमाग येईल ? या आपल्या कायदेभंगाच्या चळवळीमुळें आपल्याला जनतेसाठीं भयंकर स्वार्थत्याग करावा लागेल. आपल्या विचारांच्या विरुद्धही कोणी तरी असेलच कीं ?"

"आजच राजगोपालाचाऱ्यांचें मला एक पत्र आलें आहे," त्यांनीं मला सांगितलें.

"ते एकच माझ्या विरुद्ध आहेत. मला त्यांचे विचार माहीत आहेत. पण पाकिस्तानच्या योजनेला मूठमाती देण्याच्या हेतूनें ते मुस्लिमलीगला मदत करणार आहेत. तेव्हां मुस्लिमलीग त्यांच्याशीं सहकार्य करील अशी त्यांना अपेक्षा तरी कां असावी ?"

"जिन्हांचा पाकिस्तान योजनेसंबंधी दृढनिश्चय झालेला आहे असें आपल्याला वाटतें का ? हिंदु-मुसलमानांचें सहकार्य घडवितां आलें तर देवाण-घेवाण म्हणून उभी केलेली पाकिस्तानची योजना ते मागें घेतील ?"

"मी तुम्हाला पूर्वी सांगितलेंच आहे," गांधीजी सांगूं लागले, "कीं ब्रिटिश येथून निघून गेले कीं त्यांनीं ही योजना मागें घेतलीच म्हणून समजावें. म्हणजे त्यांच्याबरोबर किफायतीचा सौदा करण्यासाठीं कोणी रहाणारच नाहीं."

" म्हणजे आपण केव्हां आपली चळवळ सुरू करणार हें आपण ब्रिटिशांना अगाऊ कळवणार एकंदरींत ? " मी म्हणालों.

" होय ! " त्यांनीं दुजोरा दिला.

" आपण ही गोष्ट त्यांना फार अगाऊ न सांगितलेली बरी, " मीं हंसलों.

" ही आपली गुपित सूचना आहे वाटतें ? " ते हसूं लागले.

" नाहीं " मी म्हणालों.

" त्यांना योग्य वेळीं कळेल, " त्यांनीं माझी खात्री केली.

" ऐतिहासिक वास्तवतेच्या दृष्टीनें याकडे आपण पाहिलें तर आपण एक अद्भुत व चमत्कृतिजनक घटना घडवून आणीत आहांत—आपण एका साम्राज्याचा पायाच समूळ खणून काढताहांत, " मी म्हणालों.

" एखाद्या लहान मुलालाही तें करतां येईल, " ते म्हणाले. " मी जनतेची उपजतबुद्धी जागृत करीन. मी त्यांच्यामध्यें हक्कांची जाणीव उत्पन्न करीन. "

" प्रयत्न करून पाहूं या, " मी सुचविलें. " साऱ्या जगभर याची काय प्रतिक्रिया होते हें आपण पाहूं या. आपले खुद्द मित्रच चीन आणि रशिया आपण ही चळवळ सुरू करूं नये अशी आपल्याला विनंति करतील. "

" त्यांना खुशाल मला विनंति करा म्हणावें. माझें मन पालटेलही कदाचित्. पण त्याच्या उलट मी त्यांच्या मनावर आधीं परिणाम करूं शकलों, तर मला त्यांचें मत पालटतां येईल. येथील अधिकारारूढ लोकांशीं तुमचें जर सूत असेल तर त्यांना तसें समजावून सांगा. तुम्हीं गोष्टी ऐकून घेण्यांत मोठे पटाईत आहांत. तुमच्याशीं कोणाची गडबड चालायची नाहीं. या माझ्या चळवळीबद्दल त्यांच्याशीं वादविवाद करा आणि माझ्या योजनेंत कांहीं दोष असले तर ते मला दाखवा म्हणावें. "

" आपण मला सर्वाधिकार देताहांत ? " मी विचारलें. " मी हें व्हाइसरॉयनां सांगूं ? "

" होय आपल्याला माझी परवानगी आहे, " ते अगदीं निश्चयानें म्हणाले. " त्यांना माझ्याशीं बोला म्हणावें; माझे विचार पालटतील. मी तसा बुद्धिवादी माणूस आहें. माझ्या चळवळीमुळें चीनचें जर नुकसान होणार असेल तर मी एक पाऊलही पुढें टाकणार नाहीं. "

" किंवा अमेरिकेचें, " मी सुचविलें.

" अमेरिकेचें नुकसान झालें तर साऱ्यांचेंच नुकसान होईल, " ते म्हणाले.

" आपल्या योजनेविषयीं प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना सांगावें अशी आपली इच्छा आहे ? "

" होय, " ते म्हणाले, " मला कोणाचेंही मन वळवायचें नाहीं. माझे बेत, माझे विचार प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना कळावेत अशी माझी इच्छा आहे आणि मी तडजोड करावयासही राजी आहें हेंही पण त्यांना कळूं द्या. माझें मन पालटावें अशी माझी इच्छा आहे असें तुम्हीं तुमच्या प्रेसिडेंटला सांगा. "

" आपण चळवळीला सुरुवात केलीत कीं दडपशाहीला सुरुवात होईल अशी आपली अपेक्षा आहे का ? " मी विचारलें.

" होय, " त्यांनीं उत्तर दिलें. " आतां सुरुवात होईल एक दोन दिवसांत. मी तयार आहें. मला पकडतील हें मला ठाऊक आहे. मी तयार आहें. "

महादेव देसाई गांधीजींचे सेक्रेटरी मला भेटण्यासाठीं आज दुपारीं आले. येतांना त्यांनीं माझ्यासाठीं गांधीजींच्या आत्मचरित्राची एक प्रत बरोबर आणली होती. मी येथून निघून गेल्यानंतर गांधीजी काय करणार आहेत याविषयीं आपल्याशीं गांधीजींनीं केलेल्या वादविवादासंबंधी ते मला सांगत होते, आणि गांधीजींच्या माझ्याशीं झालेल्या संवादापैकीं जो कोणता मजकूर व्हाइसरॉयांना किंवा प्रेसिडेंटांना सांगायचा असेल तो तुम्हीं खुशाल सांगा, असा गांधीजींचा निरोपही त्यांनीं मला कळविला. खुर्शेदबेन म्हणाल्या कीं गांधीजींची व्हाइसरॉयांच्याबरोबर वादविवाद करण्याची इच्छा आहे.

मी येथून गेल्यानंतर दोन गोष्टी होतील असें गांधीजींनीं मला जेवणाच्या वेळीं सांगितलें. " खुर्शेद बेनला फार चुकल्या चुकल्यासारखं वाटेल, कारण काळजी घेण्याला योग्य असें आतां कोणी इथें असणार नाहीं, आणि मला चुकल्या चुकल्या-सारखं वाटेल, कारण तुमच्याशीं दुपारीं ठरलेल्या वेळीं बोलायला माझ्यापाशीं कोणी असणार नाहीं. " मी आणखी कांहीं दिवस मोठ्या आनंदानें इथें राहिलों असतों असें मी गांधीजींना सांगितलें, आणि असेंही सांगितलें कीं कॉंग्रेसचें कार्यकारीमंडळ वर्धा येथें जमेल व तेथें कायदेभंगाच्या चळवळीच्या या निश्चयासंबंधीं कार्याची

दिशा आंखेल त्यावेळीं मी हजर राहीन, "पुढील पंधरवड्यांतच बैठक होईल," गांधीजींनीं मला माहिती दिली. "पण तुम्ही वाटेल तेव्हां येऊं शकतां." सेवाग्रामला तुम्हाला झोंपबीप चांगली लागत होती कीं नाहीं याविषयीं गांधीजी मला विचारीत होते. आज कित्येक वर्षांत आली नाहीं इतकी चांगली झोंप मला सेवाग्रामला आली असें मी सांगितलें.

"उघड्या जागीं तारांच्या छताखालीं निजणें मोठें मजेचें असतें नाहीं?" ते म्हणाले. "फारच उत्तम. पण ही गोष्ट रशियांत अशक्य असली पाहिजे." रशियाच्या कांहीं भागांत फार गरम असतें असें मी त्यांना सांगितलें.

"अरे वा!" ते उद्गारले "रशियांत नेहमीं थंड असतें अशी माझी कल्पना होती."

मी पाहुणघरांत खुर्शेद व नेहरूंच्या बरोबर बसलों होतो. ते दोघेही हिंदी तुरुंगांत कैक वेळां जाऊन आले होते. तुरुंगांतील जीवनाविषयीं त्यांनीं सांगावें अशी माझी इच्छा मी दाखविली. मोठ्या माणसांची चांगली बडदास्त ठेविली जाते व गांधीजींची तर विशेषच काळजी घेतली जाते व त्यांना हवें असलेलें अन्न त्यांना दिलें जातें. त्याचप्रमाणें गांधीजींचा तुरुंगाबाहेरच्या जगाशीं चाललेला पत्रव्यवहारही तसाच चालूं ठेवण्यांत येत असतो. पण इतरांना मात्र स्वतंत्र लोकांशीं पत्रव्यवहार करण्याची परवानगी देण्यांत येत नाहीं. तुरुंगांत डांबले गेलेले काँग्रेसचे सभासद कधींहि बाहेर पळून जाण्याचा प्रयत्न करीत नाहींत– नेहरू सांगूं लागले, कारण ते स्वतः होऊन उघडपणें कायदेभंगाच्या चळवळीचा पुरस्कार तुरुंगाच्या दारांत नेहमीं उभे राहून करीत असतात. गांधीजींच्या इंग्रजी राज्याच्या विरुद्ध चालविलेल्या चळवळींत गुप्त किंवा भुयारांतील असें कांहीं नाहीं. पहिल्यांदा काँग्रेसनें प्रतिकार करायचा असें ठरविलें नि प्रतिकार केला, आणि काँग्रेसचा कैदी पळालाच तर लगेच पुनः कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेण्यासाठींच म्हणून समजावें. म्हणजे अर्थातच तो पुनः तुरुंगांत डांबला जाणार.

भावी चळवळीविषयीं नेहरू गांधीजींशीं पूर्णपणें सहमत होते. आतांपर्यंत त्यांची प्रेसिडेंट रूझवेल्ट, किंवा चियांग कायशेक किंवा आणखी कोणीतरी हिंदी राजकारणाच्या कुजत पडलेल्या डावाविषयीं कांहीं मध्यस्थी करील अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांच्या मध्यस्थीनें हिंदी राजकारण पुनः सुरळीत झालें असतें व ब्रिटिशांच्या

विरुद्ध उभारलेल्या सशास्त्र चळवळीची आवश्यकताच उरली नसती. लोकशाही राष्ट्रांतील मोठमोठाल्या अधिकाऱ्यांच्या आधींच नेहरू हें ॲक्सिसविरोधी होते. ते जपानच्या, मुसोलिनीच्या व हिटलरच्या सपशेल विरुद्ध आहेत हें जगप्रसिद्धच आहे. ॲक्सिसच्या विरुद्ध ब्रिटिशांनीं चालविलेल्या युद्धांत व्यत्यय आणण्याची त्यांची इच्छा नाहीं पण अतिपूर्वेस जी ब्रिटिशांची दुर्दशा झाली तशी इथें हिंदुस्थानांत होऊं नये म्हणून व त्यांच्यावरील हा भावी प्रसंग टळावा म्हणून ही त्यांची सारी खटपट होती. ब्रिटिशांना आपल्या सैन्याच्या सहाय्यानें हिंदुस्थानचें योग्य रीतीनें संरक्षण करतां येईल असें नेहरूंना वाटत नव्हतें. यासाठीं शहाणपणा करून हिंदी जनतेची पूर्ण सहानुभूति मिळेल व हिंदुस्थानचें त्यामुळें पूर्ण संरक्षण होईल अशी त्यांनीं तजवीज करायला हवी.

जून १०, १९४२

सेवाग्रामांतील आजचा माझा अखेरचा दिवस. मी पहाटें पांच वाजतांच उठलों. नेहरू केव्हांच उठून गांधीजींशीं वादविवाद करण्यासाठीं निघून गेले होते. ते सात वाजतां परत आले नि सांगूं लागले कीं मी स्वतः व प्रेसिडेंट आझाद हे दोघेही आजच वर्ध्याला जाणार असून लवकरच गांधीजीसुद्धां कांहीं खाजगी वादविवादासाठीं लवकरच आमच्या पाठोपाठ निघणार आहेत. मीसुद्धां त्यांच्या बरोबर वर्ध्यास जावें असें ठरविलें आणि तेथून हैदराबादेस जाणारी गाडी घ्यावी असा माझा बेत होता. आश्रमांतील रहिवाशी माझा निरोप घेऊं लागले. त्या साऱ्यांची वृत्ति फारच प्रेमळ होती आणि माझ्याशीं सारेजण अत्यंत ममताळूपणानें वागले. महादेव देसायांनीं येऊन मला अंमळ बाजूला ओढलें व गांधीजींना पकडण्याच्या शक्यतेविषयीं ते बोलूं लागले. जूनच्या १७ तारखेला गांधीजींना पकडण्यांत येणार अशी अफवा उठली असल्याचें त्यांनीं मला सांगितलें. पण मला त्याविषयीं शंका आहे असें मी त्यांना सांगितलें. कारण कायदेभंगाच्या चळवळीचा ठराव पास होईपर्यंत ब्रिटिश सरकार कांहीं एक करणार नाहीं अशी माझी खात्री होती. मी लगेच दिल्लीला जाणार नव्हतों याबद्दल त्यांना वाईट वाटलें. कारण गांधीजींच्या मनांतून व्हाइसरॉयांना भेटायचें होतें आणि मी या मुलाखतीची व्यवस्था करावी अशी त्यांची इच्छा होती. देसाई म्हणाले कीं व्हाइसरॉयांशीं

वादविवाद झाला तर कांहींतरी तडजोड करतां येईल अशी गांधीजींची अपेक्षा आहे.

दुपारीं उष्णतेचें मान ११० अंशावर गेलेलें होतें. आझाद, नेहरू आणि मी असे कारमध्यें बसलों आणि गरम धुळीनें भरलेल्या रस्त्यावरून निघालों, व वर्धा येथील कॉंग्रेस वसतिगृहांत येऊन पाहोंचलों. पांच मैलांचें अंतर होतें. आझाद हे एक भव्य व जाडजूड गृहस्थ आहेत. त्यांचें डोकें खूप मोठें, छोटीशी खरबरीत बुरणुशी दाढी, व पांढरे छोटे केस व भला मोठा आवाज. बऱ्याच हिंदी माणसांपेक्षां त्यांचा वर्ण गोरा आहे. त्यांचें कुटुंब चारशें वर्षांखालीं अरबस्तानांतून हिंदुस्थानांत आलें. हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध मुसलमानांत त्यांची गणना होते. त्यांनीं कुराणाचें उर्दूत भाषांतर केलें आहे आणि अरबी वाङ्मय व इस्लामी इतिहास या विषयांतील ते एक अधिकारी तज्ज्ञ समजले जातात. त्यांना सारेजण "मौलाना" या नांवानें संबोधतात. याचा अर्थ विद्वान् मुस्लिम असा असून मोठे ईश्वरभक्त असा आहे.

आम्हीं तिघांनींही या वसतिगृहांतील थंडशा खोलींत दुपारचें भोजन केलें. गेल्या आठवड्यांत पहिल्यानेंच आज मला विजेच्या पंख्याची ताजेतवानें करणारी स्वच्छ हवा मिळाली. जेवण झाल्यावर मी आझादांची मुलाखत घेतली. नेहरूंनीं दुभाष्याचें काम केलें. आझादांना इंग्रजी येतें पण ते बोलायला कचरतात. म्हणून माझ्या प्रश्नांचें भाषांतर न करतां नेहरू त्यांच्या उत्तरांचेंच तेवढें भाषांतर करून मला सांगत होते. आझादनीं क्रिप्सच्या वाटाघाटींत मुख्य भाग घेतला असल्यानें ते मला म्हणाले कीं क्रिप्समुळें आमची अत्यंत निराशा झाली. क्रिप्स हे हिंदुस्थानचे मित्र आहेत अशी आमची कल्पना होती. क्रिप्सनीं आम्हाला खास सांगितलें होतें कीं नवीन राष्ट्रीय सरकार निर्माण होऊन तें जबाबदार सरकार या नात्यानें राज्यकारभार चालवील आणि इंग्लंडमधील राजाप्रमाणें व्हाइसरॉय त्यांच्या कार्यांत मुळींच ढवळाढवळ करणार नाहीं. आणि याच तत्त्वानुसार आमच्या सर स्टॅफर्डबरोबर वाटाघाटी झाल्या. हिंदुस्थानचें संरक्षणकार्य ब्रिटिश कमांडर-इन-चीफ व हिंदी संरक्षणमंत्री यांच्या दरम्यान बरोबर वांटून द्यायचें या मुद्यावर दोनही पक्षांचें एकमत झालेलें होतें. पण एकाएकीं एप्रिलच्या नऊ तारखेला, आझाद सांगूं लागले, क्रिप्स सांगूं लागले कीं व्हाइसरॉयनीं आपला "नकार" (Veto) अधिकार

सोडायला तयार व्हावें असें ब्रिटिश सरकारला वाटत नाहीं. त्यानंतर क्रिप्स-बरोबरच्या वाटाघाटी एकदम बंद पडल्या. आझादनां वाटलें कीं पहिल्यानें क्रिप्सनीं वचन दिलें. पण त्यांना लवकरच आढळून आलें कीं लंडनला त्यांना तें वचन पाळूं द्यावयाचें नव्हतें. हिंदुस्थान व ब्रिटन–आझादनीं सांगितलें, यांच्यामधील कराराचा पाया म्हणजे कामचलाउ सर्वपक्षीय मंत्रिमंडळ ( Cabinet ) स्थापन करणें होय. आपल्या कॉंग्रेसपक्षांतील लोकांचें या कॅबिनेटमध्यें आधिक्य ( मेजॉरिटी ) होईल अशी अपेक्षा नाहीं. आझाद म्हणाले.

क्रिप्स-वाटाघाटी बुडाल्यानंतर जनतेवर त्याची काय प्रतिक्रिया झाली, असा मी प्रश्न केला. त्यांनीं उत्तर दिलें–अंशतः असहाय्यतेचीच प्रतिक्रिया दिसून आली. कांहीं ठिकाणीं त्याविषयीं नाराजी पण निर्माण झालेली आहे. पण मुख्यतः अशी सर्वत्र भावना निर्माण झालेली आहे कीं ब्रिटिश सरकारशीं तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करणें अगदीं व्यर्थ आहे. आपल्या हक्कांपैकीं कांहींएक द्यायचें नाहीं असा ब्रिटिशांचा निश्चय झालेला आहे. पुष्कळ मुसलमानांनासुद्धां असेंच वाटतें.

आझाद म्हणाले कीं हल्लींच्या हिंदुस्थानांतील राजकीय वातावरणांत, कोणताही मुसलमान पूर्ण स्वातंत्र्याच्या विरुद्ध नाहीं. मुस्लिम लीग, ते म्हणाले, ही बंडखोर आहे व ती सर्वस्वी जमीनदारांच्या साहाय्यावर अवलंबून आहे. हिंदुस्थानांतील मुसल्मान हे शेंकडा ९५ टक्के हिंदूंच्या वंशाचेच आहेत. उरलेले पांच टक्के मुसलमान माझ्याबरोबर आलेले आहेत, पण तेसुद्धां–खुद्द (आझाद) माझ्यासहित–आतां सारे हिंदीच झालेले आहेत. गांधीजींनीं सांगितलें होतें त्याचा पुनरुच्चार करून आझाद म्हणाले, कीं बंगालमध्यें हिंदू व मुसलमान दोघेही बंगाली ही एकच भाषा बोलतात व त्यांचा पेहराव पण एकसारखाच असतो व राहाततातही सारखेच. मद्रास इलाख्यांत प्रत्येकजण तामीळच बोलतो. खेड्यापाड्यांतून निरनिराळ्या धर्मांच्या लोकांच्यामधील फरक फारच थोडा आहे. जिन्हांना पाकिस्तान नको आहे. आझाद जोरानें प्रतिपादूं लागले–पण हिंदूंच्या विरुद्ध अधिक हक्क संपादन करण्यासाठीं उभा केलेला सौदा ( bargain ) आहे, आणि इंग्लंडनें हें शस्त्र मोठ्या उपकारबुद्धीनें त्यांच्या हातीं दिलें आहे.

नेहरू व आझाद या दोघानींही सांगितलें कीं मुसलमानांना नको असेल तर त्यांना हिंदी संयुक्त-संघांतून ( Indian union ) फुटून निघण्याचा अधिकार आहे. " तरीसुद्धां—आझाद म्हणाले—मला लग्नाआधीं घटस्फोटाची कल्पना मान्य नाहीं. समजा हिंदु व मुसलमान हे एकत्र राहाण्याचा प्रयत्न करून त्यांत फसले तर त्यांची फारकत व्हायला हवी. पण मुसलमानांच्या पैकीं कितीतरी लोकांना अखंड हिंदुस्थानची कल्पनाच पसंत आहे, आणि याचा पूर्ण अनुभव घेतल्याशिवाय या कल्पनेला मूठमाती द्यायला कोणीही तयार नाहीं. "

दुपारीं तीन वाजतां गांधीजी एकाएकीं या वसतिगृहांत दाखल झाले. मी प्रवेशद्वाराशींच उभा होतों, ते आले त्यावेळीं. त्यांच्या चेहऱ्यावर हास्याच्या सुरकुत्या दिसत होत्या. ज्या कारमधून नेहरू, आझाद आणि मी वर्ध्याला आलों होतों ती परत सेवाग्रामला जाऊन गांधीजींना आणि देसायांना घेऊन आली होती. वर्ध्यापासून साधारण पाऊण मैल अंतरावर कार बंद पडली. गांधीजी कारमधून बाहेर पडले व दुपारच्या जळजळीत उन्हांत पायींच चालत आले. वसतिगृहांत येऊन पोहोंचल्यावर त्यांना जितं असें वाटलें व ते म्हणाले, " या तुमच्या आधुनिक यंत्रयुगांतील यंत्रांच्यावर माणसांना विसंबून रहातां येणें अशक्य आहे. "

थोड्याच मिनिटांत गांधीजी, आझाद व नेहरू आपापसांत कांहीं बोलत बसले. उघड्या दारांतून मी खोलींत प्रवेश केला, पण ते हिंदुस्थानींत बोलत होते, म्हणून मी तेथून निघालों. नंतर हिंदुस्थानांतील असोशियेटेड प्रेस कॉरेस्पांडंट मि. ग्रोव्हर मुलाखतीसाठीं त्या ठिकाणीं आले. गांधीजी त्यांना म्हणाले, हिंदुस्थानचें हल्ली नुस्तें मढें राहिलें आहे. म्हणून हें मढें युद्ध जिंकण्यासाठीं कशी काय मदत करणार ? ब्रिटिशांच्या राजकीय मगरमिठींतून सुटून हिंदुस्थान स्वतंत्र झालें पाहिजे आणि मग हिंदुस्थान आत्मसंरक्षण करण्यासाठीं सज्ज होऊन आपल्या पायांवर उभें राहील.

रात्रीं साडेनऊ वाजतां मी वर्धा सोडलें. मी निरोप घेत असतां गांधीजींनीं जोरानें माझ्याशीं हस्तांदोलन केलें व त्यांनीं मला परत येण्याविषयीं खूप आग्रह केला.

मी हिंदुस्थानांतून न्यूयॉर्कला पोहोंचण्यासाठीं विमानानें निघालों. मी परत येऊन पोहोंचल्यावर थोड्याच दिवसांनीं एक वार्ताहर मला भेटायला आले.

गांधीजींना एक **सुंदरसें** ( पोटभर ) पत्र लिहिलें कीं नाहीं अशी त्यानें पृच्छा केली. पण तसें लिहावें असें मला सुचलें नव्हतें.

## कांहीं टीकाभाष्यें

मी सेवाग्राम सोडून गेल्यानंतर गांधीजींनीं मला प्रेसिडेंट रूझवेल्टसाठीं एक पत्र धाडलें. या पत्रासोबत त्यांनीं आपल्या हस्ताक्षरांत चिठ्ठी लिहिली असून त्यांतील मजकूर असा होता. " तुम्हांला जर माझें हें पत्र आवडलें नाहीं तर तुम्ही तें खुशाल फाडून टाका. तुम्हाला याव्यतिरिक्त आणखी दुसरें कांहीं हवें असेल तर तुम्हीं तसें मला लिहून कळवा. " गांधींजींना अभिमान नाहीं.

आपली चूक कबूल करण्यास गांधीजी कधींही कचरत नाहींत आणि विशेषतः ती ते अगदीं जाहीरपणें कबूल करीत असतात. १९४२च्या मे महिन्यांत सर स्टॅफर्ड क्रिप्सचें मिशन थंडावल्यानंतरच गांधीजींनीं घोषणा केली कीं " ब्रिटिशांनीं चालतें झालें पाहिजे. त्यांनीं आपलीं सैन्येंसुद्धां काढून नेलीं पाहिजेत." नाहीं तर आपण कायदेभंगाची चळवळ सुरू करणार अशी त्यांनीं धमकी दिली. पण जूनमध्यें त्यांनीं आपला निर्णय फिरविला, " माझ्या पहिल्या लिखाणांत एक उणीव राहून गेली होती, खरें पहातां," त्यांनीं हरिजनमध्यें लिहिलेल्या एका अग्रलेखांत कबूल केलें, " ती माझी उणीव मला माझ्या मुलाखती घेणाऱ्या अनेक मित्रांपैकीं एकाकडून कळून आल्याबरोबर ती मी भरून काढली. अहिंसातत्त्वाला माणसानें अत्यंत प्रामाणिक असावें लागतें. मग त्यासाठीं काय वाटेल त्या गोष्टीचा त्याग करावा लागला तरी तो त्यानें पत्करायला हवा. त्यामुळें जनतेला माझ्या दौर्बल्याचीं कडू फळें चाखावीं लागतात—हो तें दौर्बल्य असेल तर ! दोस्त राष्ट्रांना ( Allies ) अमुक एका तऱ्हेनेंच वागा म्हणजे अनायासेंच तुमचा नक्की पराभव होईल—असें विचारण्याचा दोष कोणी मला देणार नाहीं.... दोस्त राष्ट्रांचीं सैन्यें जर हिंदुस्थानांतून तडकाफडकीं काढून नेण्यांत आलीं तर खात्रीनें जपान हिंदुस्थानावर झडप घातल्याशिवाय रहाणार नाहीं, आणि चीनची त्यामुळें धुळधाण उडायला अवधी लागणार नाहीं. माझ्या कृतीपासून अशी कांहीं तरी भयंकर आपत्ति कोसळेल याची मला अंशतः सुद्धां कल्पना नव्हती. म्हणून माझें म्हणणें ब्रिटननें घटकाभर कबूल केलें असें जरी गृहीत धरलें तरी ( हिंदुस्था-

नाला स्वतंत्र करण्याचें ) जपान्यांनीं हिंदुस्थानावर आक्रमण करूं नये म्हणून दोस्त राष्ट्रांनीं हिंदुस्थानांत रहाणें अत्यंत इष्ट आहे........."

सर्वसाधारण राजकारणी पुरुष, जेव्हां आपल्या स्वतःसाठीं एखादी मोठी अधिकाराची जागा शोधीत असतो किंवा आपल्या नीतितत्त्वांचा प्रचार करण्याची खटपट करीत असतो तेव्हां तो शांतता, धनधान्यसमृद्धी, कमी कर, अधिक फायदा–खरोखरी पहातां चंद्र तारे–सारें सारें कांहीं देईन असें वचन देत असतो. गांधीजींच्या आयुष्यांतील ध्येय म्हणजे " हिंदुस्थानचें स्वातंत्र्य. " यासाठीं त्यांनीं इंग्लंडची व पर्यायानें साऱ्या जगाची खात्री करून देण्यासाठीं असें म्हणायला हवें होतें कीं माझें अंतिमध्येय हें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य, तें मिळालें कीं तिथें सारी आबादी आबाद होईल. त्याच्या उलट ते म्हणतात, " ब्रिटिश येथून निघून गेल्यानंतर इथें सर्वत्र बेबंदशाही पसरणार नाहीं अशी मला खात्री देतां येत नाहीं. बेबंदशाही माजेल. मी असें म्हणालों आहें कीं " हिंदुस्थानांतून ब्रिटिशांना निघून जाऊं द्या आणि होऊं द्या हिंदुस्थान खुशाल ईश्वराधीन ! तुम्हाला अशी अवास्तव भाषा आवडणार नाहीं. त्याला तुम्हीं वाटेल तर बेबंदशाही–अंदाधुंदी म्हणा ! याच्यापेक्षां अधिक काय होईल ? " या त्यांच्या लिखाणावरून गांधीजींच्या टीकाकारांना असें म्हणतां येईल कीं ब्रिटिश हिंदुस्थानांतून निघून गेले तर अंदाधुंदी माजेल असें गांधीजी भाकित करतात.

गांधीजी जोरानें प्रतिपादन करतात कीं ब्रिटिशांनीं आपलीं अधिकारसूत्रें हिंदी लोकांच्या स्वाधीन केलीं कीं हिंदी सैन्याला रजा देण्यांत येणार. पण त्याच्या अगोदर थोड्याच वेळापूर्वी ते म्हणाले: कोणालाही सैन्यांत रंगरूट या नात्यानें आपली सेवा अर्पण करण्यास किंवा आर्थिक मदत करण्यास कोणीही मना करणार नाहीं. आणखी एके ठिकाणीं ( हरिजन, ऑगस्ट ६, १९४२ ) त्यांनीं लिहिलें: " हिंदुस्थानांतील कोट्यावधि लोकांमधून असंख्य शिपाई तयार करणें अशक्य होईल काय ? जगांतील कोणत्याही राष्ट्राच्या बरोबरीचें युद्धोपयोगी साधन ते बनूं शकणार नाहींत काय ? " या साऱ्या लिखाणांचा अर्थ काय ? गांधीजी परस्परविरोधी गोष्टी लिहीत असतात काय ? नाहीं. पोटाची खळगी भरण्यासाठीं ज्यांनीं स्वतःची सैन्यांत भरती करून घेतली असल्या लोकांचें सैन्य त्यांना खलास करावयाचें आहे. ते बिचारे उपाशी मरत होते. सैन्यांत भरती झालों तर निदान

शिपाई या नात्यानें पोटभर खायला तरी मिळेल या आशेनें सैन्यांत भरती झालेल्या लोकांची हिंदुस्थानला जरूरी नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. यावरून आपल्याला स्पष्टपणें दिसून येईल कीं गांधीजींच्या लिखाणांतल्या संदर्भरहित तुटक्या वाक्यांचीं अवतरणें घेऊन वाटेल तसा खोटा अर्थ निष्पन्न करणें कसें शक्य आहे तें !

गांधीजींशीं खराखुरा बुद्धिशाली वादविवाद करण्यांत जो आपल्याला आनंद लुटतां येतो तो त्यांच्या मनाचा पूर्ण विकास होत असतांना आपल्याला दिसून येतो म्हणून, व त्यांची मुलाखत घेणाऱ्या इसमाला त्यांच्या अंतरंगांतील मानसिक क्रियेचा साक्षात्कार होत जातो म्हणून. बहुतेक सारे लोक जेव्हां वादविवाद करीत असतात तेव्हां ते आपले कायम ठशाचे बनलेले विचारच एकसारखे बोलत सुटत असतात असा आपल्याला अनुभव येत असतो, म्हणजे त्यांच्यावर हल्ला करणें अशक्य होतें. पण गांधीजींचें तसें नाहीं. ते आपल्या विचारमालिकेंतील प्रत्येक पावलागणिक उत्पन्न होणाऱ्या विचारांना प्रगट स्वरूप देत जात असतात. जसा एखादा लेखक आपल्या गोष्टीचा पहिला मसूदा छापून झाल्यावर, दुसरा, तिसरा नि अखेरचा मसूदाही छापून काढील त्याप्रमाणें गांधीजींच्या विचारांचें दर्शन होत जातें. वाचक लोक ओरडतील कीं गोष्टींतील संविधानकांत फरक झाला, किंवा गोष्टींतल्या नायकाला खलनायक बनविण्यांत आलें—वगैरे वगैरे. गांधीजी असल्या तक्रारीकडे लक्षसुद्धां देणार नाहींत. ते खुशाल म्हणतील-होय माझें मन पालटलें. खरें सांगायचें म्हणजे ते मोठ्यानें विचार करीत असतात, म्हणजे त्यांच्या मनावरील एकूण एक प्रतिक्रियेचें चित्रीकरण करणें सोपें जातें. यामुळें बऱ्याचशा लोकांचा चांगलाच घोटाळा उडतो नि ते गांधीजी परस्परविरोधी गोष्टी बोलतात असा त्यांच्यावर आरोप करतात, किंवा ते ढोंगी आहेत असेंही ते प्रतिपादितात. गांधीजी त्याची पर्वा करीत नाहींत. कदाचित् ते आतां बरेच वयोवृद्ध झाले असतील व पूर्णतया संन्याशी वृत्तीचे बनले असतील त्यामुळें ते आपल्या बोलण्यानें लोकांवर आपण काय परिणाम करीत असतों याच्याबद्दल अगदीं बेफिकीरही असतील. हिंदुस्थानांतील कितीतरी हिंदी इसमांनीं व इंग्रजांनींसुद्धां आपण जें कांहीं बोलतों आहोंत तें प्रसिद्ध करण्यासाठीं नाहीं असें मला बजावून सांगितलें होतें पण मी गांधीजींविषयीं

काय लिहीन किंवा काय अवतरणें घेईन याविषयीं ते पूर्णपणें बेफिकीर होते. ते माझ्याकडे वळून बोलत नसत, ते माझ्याशीं बोलत असत. मी महंमद अली जिन्हा यांच्याबरोबर कितीतरी तास घालविले असतील. ते हिंदुस्थानांतील मुस्लिम लीगचे अध्यक्ष आहेत. ते मोठे चाणाक्ष वादविवादपटु व विवादांतील छक्केपंजे जाणणारे जबर वक्ते आहेत, आणि निःसंशय निर्भेळ राजकारणी गृहस्थ आहेत. पण ते माझ्याकडे वळून बोलत असत. ते माझी खात्री करण्याचा प्रयत्न करीत असत. पण मी त्यांना एखादा प्रश्न केला कीं लगेच ग्रामोफोनची रेकॉर्ड सुरू झाली म्हणजे जसें वाटतें तसें मला वाटूं लागे. त्यांचें सारें म्हणणें मी पूर्वी ऐकलेलें तरी होतें किंवा त्यांनीं पुरविलेल्या साहित्यांत तरी तें मला वाचायला मिळालें असतें. पण तेंच मी गांधीजींना एखादा प्रश्न केला कीं मानसिक सृजन क्रियेचें यंत्र भराभर चालू झाल्याचा मला अनुभव येई. मला त्यांचें मन कसें काय काम करतें हें दिसत असे, ऐकूं येत असे. पण जिन्हा बोलूं लागले कीं ग्रामोफोनच्या तबकडीवर सुई घासल्याची आठवण होई. जिन्हा मला नेहमीं आपला अखेरचा निर्णय निवेदन करीत. पण गांधीजींच्याबरोबर वादविवाद करूं लागले कीं ते कसकसे अखेरच्या निर्णयाकडे येत जातात तें मला अनुभवण्यास मिळत असे. अर्थातच जिन्हांच्यापेक्षां गांधीजी मला जास्त स्फूर्तिदायक वाटले. तुम्हीं जर त्यांच्या अंतः-करणाची तार बरोबर छेडलीत तर गांधीजींच्या मनाचा कप्पा उघडा झालाच म्हणून समजावें. त्यांच्याशीं मुलाखत म्हणजे एक संशोधन करण्यासाठीं काढलेलें जल-पर्यटणच होय. आपण कधीं कधीं काय बोलून जातों याचें त्यांनाच विलक्षण आश्चर्य वाटत असतें. कधीं कधीं गांधीजी कांहींतरी चमत्कारिक बोलून जातात याचें त्यांच्या सेक्रेटरींनाही आश्चर्य वाटत असते. आणि म्हणूनच मला गांधीजींच्याविषयीं गोष्टी समजल्या व त्या गांधीजींच्यापासूनच शिकण्यास मिळाल्या. त्यांनीं मला फक्त सत्य व मतें अशीं कधींच दिलीं नाहींत. ते एकसारखे स्वतःच्या विरुद्ध तयार केलेला दारूगोळा प्रतिपक्ष्याच्या हातीं खुशाल देत. उदाहरणार्थ गांधीजींना मला सांगावें लागत नसे कीं आपल्यामध्यें जे कांहीं विशिष्ट गुण आज आढळून येत आहेत ते सारे आपल्या मौनदिनामुळें होत, कारण त्या मौनदिनांत ती शक्ति नव्हती हें त्यांना माहीत होतें. पण गांधीजी म्हणजे हे असे आहेत. त्यांच्या मेंदूला निळया पेन्सिलीची आवश्यकता नसते; किंवा ते स्वतःवर कधींही नियंत्रण

( censor ) घालीत नसतात. त्यामुळें कांहीं कांहीं राजकारणी पुरुषांना ते एक गूढ तरी वाटतात किंवा एक भयंकर उपद्रवी ( irritating ) तरी वाटतात. उदाहरणार्थ, ते असें म्हणतात कीं, " मला जर शक्य झालें असतें तर मी जपानला जाईन व हें युद्ध थांबविण्याचा प्रयत्न करीन. त्यांना माहीत आहे कीं ते कधींही जपानला जाणार नाहींत, आणि ते लगेच म्हणतात कीं " मी जपानला जाणार नाहीं, आणि गेलों तरी जपान तह करणार नाहीं. " मग ते मी जपानला जाईन असें कां म्हणाले बरें ? कारण त्यांना तसें वाटलें म्हणून. शांततेचे भोक्ते या नात्यानें त्यांना खरोखरीच जगांतील वैमनस्यें नाहींशीं व्हावींत असें वाटतें. पण ही गोष्ट घडवून आणणें दुर्घट आहे म्हणून त्याचा उच्चारही करूं नये असें गांधीजींना वाटत नाहीं.

कांहीं कांहीं वेळां गांधीजींना दुर्घट व पुराण्या विचारांचा काथ्याकूट करण्यांत मोठी गंमत वाटत असते. आधुनिक शोध त्यांना तुच्छ वाटतात. घड्याळाचे कांटे मागें फिरवितां येणार नाहींत, हें त्यांना छान माहीत आहे. त्यांना मोटारचा उपयोग न करणें अशक्य आहे. तरीसुद्धां ते तिची चेष्टा केल्याशिवाय रहाणार नाहींत. संयुक्त राज्यपद्धती ( federal administration ) ही आवश्यक आहेच असें नाहीं. संयुक्तराज्यपद्धती नसली म्हणजे नाना तऱ्हांचीं विघ्नें निर्माण होतील असें जरी आपण त्यांना समजाऊन सांगितलें तरी त्यांची कांहीं केल्या खात्री होत नाहीं. आपण आपलें पुढें वादविवाद करीत जावें तर ते अखेरीस म्हणूं लागतात, " माझे विचार कांहींही असले तरी मध्यवर्ती सरकार निर्माण होणार हें मला स्पष्टपणें दिसतंय. " गांधीजींच्या स्वभावांतील हें एक वैशिष्ट्य आहे. ते एक तत्त्व पुढें मांडतात, त्याचें प्रतिपादन करतात व शेवटीं तें प्रचारांत आणणें अशक्य अशी कबूली पण देतात. त्यांचें मन मऊ व पाण्यासारखें प्रवाही आहे. त्यांना क्रिया हवी असेल तर ते हुकूम-शहा ( dictator ) बनण्यासही कमी करीत नाहींत. मग ते आपल्या प्रतिपक्षाला तर्कशक्तीनें व जनतेचा त्यांना पाठिंबा आहे या जोरावर अगदीं चीत करून सोडतात. पण त्यांच्या विचारांत मात्र हुकूमशाही मुळींच आढळून येत नाहीं. कोणीही हुकूमशहा आपलें चुकलें असें कधींही कबूल करीत नसतो. गांधीजी करूं शकतात; पुष्कळ वेळां ते करतातही.

गांधीजी हे पक्के हिंदू आहेत. हिंदूधर्म हा परमतसहिष्णु व स्पंजासारखा ( परमतग्राही ) धर्म आहे. हिंदू हे एकेश्वरवादी आहेत. कोणी तर ख्राइस्टवरही

श्रद्धा ठेवतात. कांहीं तर अनीश्वरवादी आहेत. ते जगांत ईश्वर नसून हिंदूधर्म हा एक जीवनाचा धर्मग्रंथ ( Code ) आहे असें मानतात. कांहीं मूर्तिपूजा करतात व त्यांची भक्ति करतात. कांहीं तर पर्वत, नद्या व देव यांची पूजा करतात. ते एकेकाळीं माणसें होतीं अशी त्यांची समजूत आहे. एकेश्वरवाद किंवा मूर्तिपूजा या गोष्टी परस्परविरोधी आहेत असें त्यांना वाटत नाहीं. नायगाराचा धबधबा हिंदुस्थानांत असता तर–एक हिंदू गृहस्थ मला म्हणाले, त्या धबधब्याला आम्हीं देव मानलें असतें. हिंदूंच्या ( कैलास ) ऑलिंपस पर्वतावर दाट वस्ती आहे तरीसुद्धां हिंदूंची अशी श्रद्धा आहे कीं गांधीजींच्या साठीं एक जागा तेथें खास राखून ठेविलेली आहे.

गांधीजींच्याविषयीं सर्वसाधारण लोकमत असें आहे कीं त्यांनीं आपलें सारें आयुष्य जनतेसाठीं अर्पण केलेलें आहे. ते अगदीं साध्या जनतेसारखे रहातात व त्यांच्या हालअपेष्टांचे मोठ्या आनंदानें वाटेकरी होतात. त्यांच्यापाशीं पैसाही नाहीं नि वतनवाडीही नाहीं. त्यांना फक्त एक गोष्ट हवी आहे–हिंदुस्थानचें संपूर्ण स्वातंत्र्य. आणि ज्याअर्थी कोट्यावधी लोकांना पण आज तेंच हवें आहे त्याअर्थी गांधीजी हे जनतेच्या मागणीचें एक प्रतीक बनले आहेत.

जेव्हां जेव्हां कोणी एकादा हिंदी इसम ब्रिटिशांच्या विरुद्ध बोलूं लागे तेव्हां तेव्हां तो ब्रिटिशांच्या विरुद्ध कां बोलतो हें मी विचारीत असें. मी सिव्हिल सर्व्हिस-मधील एका थोर मुसलमान अधिकाऱ्याला विचारलें: " इतके हिंदी लोक ब्रिटि-शांच्या विरुद्ध कां ? "

" आम्ही कां त्यांच्या विरुद्ध असूं नये बरें ? " ते सांगूं लागले. " त्याच्या-ऐवजीं तुम्हीं असा प्रश्न विचारायला हवा होता, आपल्यावर राज्य करणाऱ्या कोणत्याही परकी राष्ट्रांवर कोणीही प्रेम करीत नसतें. " ते म्हणाले. गांधीजींच्या अनुयायांमध्यें मुसलमान आहेत, हिंदू आहेत, पार्शी आहेत, हरिजन ( अस्पृश्य ) आहेत. त्यांचा गांधीजींच्यावर पूर्ण विश्वास आहे याला कारण त्यांनीं आपलें राष्ट्र मुक्त करण्यासाठीं आज कित्येक वर्षें इतर कोणीही केली नाहीं इतकी मेहनत केलेली आहे. कितीतरी लोकांचें गांधीजींशीं मतैक्य नाहीं. कितीतरी मुसलमान त्यांच्यावर उघड उघड आरोप करतात कीं तुम्हाला हिंदूंचें राज्य स्थापायचें आहे.

पण राष्ट्रीय मुक्ततेसाठीं त्यांनीं सतत जिवापाड मेहनत केली आहे हें मात्र कोणीही नाकबूल करीत नाहीं. आधुनिक युगांतील राष्ट्रीयतेकडे ओढा असणें हें मूलभूत, स्वाभाविक व स्वभावजन्य आहे. आणि गांधीजी या ओढ्याचे अत्यंत प्रभावी प्रतिपादक आहेत.

गांधीजींचा असा विश्वास आहे कीं आपण स्वतः सेवाग्रामांत बसल्या बसल्या पत्र-व्यवहार पहात असतांना, आपल्या भेटीस आलेल्या लोकांशीं संवाद करीत असतांना हिंदी जनतेच्या भावना व प्रार्थना ऐकूं शकतों. त्यांना नक्की काय हवें आहे हें आपल्याला छान माहीत आहे असा त्यांचा विश्वास आहे, आणि म्हणूनच त्यांच्या-साठीं कार्य करण्याचा त्यांना हक्क पोहोंचतो. गांधीजी पूर्णपणें हिंदुस्थानांत मग्न झालेले आहेत. ते हिंदुस्थानशीं एकरूप झालेले आहेत. हिंदुस्थानचे सारे आवाज ऐकूं यावे म्हणून त्यांचीं कर्णेंद्रियें अगदीं तीक्ष्ण झालेलीं आहेत. त्यांना ते आवाज ऐकूं येतात. त्यांचा अर्थ पण त्यांना अगदीं बरोबर समजतो, अशी त्यांना खात्री वाटते. अशा प्रकारची खात्री ही पुढाऱ्यांची स्फूर्तिदेवता व तारक तारा बनत असते. अर्थशास्त्र व समाजशास्त्र याविषयीं गांधीजींच्या मनांत अनेक शंका असतील. ते केव्हांही मार्ग व वेळापत्रकें बदलण्यास राजी असतात. पण ते आपल्या मध्यवर्ती विचारांत...म्हणजे हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याविषयींच्या विचारांत मात्र स्थितप्रज्ञ, कधींही हार न जाणारे व कांहींएक तडजोड करण्यास तयार नसलेले असे आहेत. हिंदी जनता तुम्हाला सांगेल कीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठींच गांधीजींचा अवतार झालेला आहे. ते त्यासाठीं मरण्यासही तयार आहेत. स्वार्थ-त्याग व स्वार्थसंन्यास या गोष्टी हिंदी सद्गुणांत अत्यंत उच्चकोटीच्या समजल्या जातात.

गांधीजींचें शहाणपण, त्यांची धूर्तता, यामुळें व संपूर्ण धार्मिक वृत्ति राष्ट्रांत असल्याशिवाय राष्ट्रीयधर्म उच्च कोटीचा असणार नाहीं, असा त्यांचा विश्वास असल्या-मुळें त्यांना जें अत्यंत उच्च स्थान प्राप्त झालें आहे तें कां याचें उत्तर मिळेल. पण राष्ट्राला संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें पाहिजे हा त्यांचा जगाला दिलेला संदेश व तें ध्येय संपादन करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न, यावरील त्यांचा विश्वास यामुळें त्यांच्यावर जनतेचा विश्वास अधिक बसतो. इतर साऱ्या गोष्टींपेक्षां हिंदी स्वातंत्र्य या गोष्टीला त्यांच्या अंतःकरणांत त्यांच्या अहिंसा तत्त्वाव्यतिरिक्त मुख्य स्थान आहे असें मला

वाटतें.—एवढें मात्र खरें कीं ते अत्यंत स्नेहभावानें व सहकार्यानें नेहरू, आझाद, राजगोपालाचारी अशांसारख्या लोकांशीं वागूं शकतात. हे लोक शांततावादी नाहींत अशी त्यांची खात्री आहे. पण हिंदी स्वातंत्र्याविरुद्ध असलेल्या शत्रूशीं सहकार्य करण्यासाठीं ते केव्हांही तयार होणार नाहींत.

स्वातंत्र्य मिळविण्याच्या कार्यांत गांधीजी व असंख्य जनता यांच्या दरम्यान अत्यंत मधुर एकतानता निर्माण झालेली दिसून येते. मोठ्या पुढाऱ्यांच्या मध्यें असली एकतानता असणें अत्यंत आवश्यक असते. त्यांच्या प्रभावाचें तें उगमस्थान आहे. विन्स्टन चर्चिल यांनीं आपल्या अनेक व्याख्यानांत ती व्यक्त केलेली आहे. जे विचार अनेक इंग्रज लोक साध्या ओबडधोबड भाषेंत आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्याशीं किंवा स्वतःशींच व्यक्त करतात तेंच ते ( चर्चिल ) सुंदर सुटसुटीत भाषेंत व्यक्त करतात. आपण एकाद्या पुढाऱ्याचे अनुयायी बनतों याचें कारण असें कीं आपण त्यांच्यामध्यें आपल्या स्वतःची चांगली सुधारून वाढविलेली आवृत्ति आहों असें समजत असतों. म्हणून लाखों, करोडो, अर्धनग्न, अर्धपोटी असणाऱ्या गरिबांचे गांधीजी हे वडील आहेत, बंधू आहेत. हे बिचारे गरीब लोक फारसे बुद्धिवान नसतील, पण ते फक्त शेतकरी, कामकरी असले तरी त्यांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्यप्राप्तीची विलक्षण तळमळ लागलेली आहे. त्यांचेच ते एक अंश आहेत. त्याचप्रमाणें ते असंख्य सुसंस्कृत हिंदी लोकांचे व सामर्थ्यवान कारखानदारांचे प्रार्थना-संगीत पण ऐकून घेत असतात. त्यांना परकी राष्ट्राचें जूं असह्य वाटतें किंवा परकी धन्याचें अस्तित्वही त्यांना असह्य होतें.

गांधीजींचें जीवन आपलें सरळ एकमार्गी आहे; त्यांना संपूर्ण स्वतंत्र हिंदुस्थान हवें आहे, हेंही एक थोर लोकांचें वैशिष्टयच आहे. चर्चिलची अत्यंत बलिष्ट तळमळ म्हणजे ब्रिटन साऱ्या राष्ट्रांचा अग्रणी असला पाहिजे अशी आहे. रशियाला प्राथमिक स्थितींतून बाहेर काढून उच्चपद प्राप्त करून द्यावें अशी लेनिनची तळमळ होती. हिटलरची जहांगीर बनण्याची आहे. एखाद्या सुंदर पुतळ्याप्रमाणें थोर माणूस हा अखंड दगडाचा बनलेला असावा लागतो.

[ समाप्त ]